# हैदरचें चरित्र

१९५५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
स. नं. ५६०१



यटेड पब्लिशर्स नाशिक

RLFBK-0068560

हैदर ... वकील

... सांगा कीं ... असेल तर निजाम व मराठे

यांवर ... चालून ... आणि ... माझी करामत पहा ' !

( किंमत २ रुपये )

# हैदरचें चरित्र

( लेखक )

एन्. जी. पिंगळे बी. ए. रि. डे. ए. इन्स्पेक्टर

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

९८८०

प्रकाशक

**युनायटेड पब्लिशर्स नासिक.**

( किंमत २ रुपये )

REFBK-0008560

कन्हैलाल सिताराम तिवारी

तिवारी प्रिंटींग प्रेस राजेबहादर लेन,

घ. नं. १०५७ नासिक शहर.

# निवेदन

९८२२
२६०७
२८१३।५

सन १९३३ साली पुण्यांतील एका सुप्रसिद्ध विद्यालयाचें इन्स्पेक्शन घेत असतांना इतिहासाचे शिक्षकानें "हैदर बाण व भाले घेऊन लढे व इंग्लिश तोफांनीं लढत म्हणून त्याचा पराभव झाला" असें सांगितलें. शिक्षण पद्धतिबद्दल प्रथितयश शहरांतील शिक्षकाचें हें ज्ञान पाहून आश्चर्य वाटलें व एक दोन दिवसांत हैदरवर एक लहानसा निबंध लिहून तो तेथील स्नेह्यांस दाखविला. त्यांनीं हैदरचें चरित्रच प्रसिद्ध करण्यास उत्तेजन दिल्यावरून प्रस्तुत पुस्तक लिहिलें. पुस्तक तयार होऊन कित्येक वर्षें झालीं, परन्तु हैदरचें जीवनांत जशा अनेक अडचणी उत्पन्न झाल्या त्याप्रमाणें त्याचें चरित्र प्रसिद्ध करण्याचें कामींही आल्या.

माझें इतिहासाचें ज्ञान अल्प असल्यामुळें रा. खरे शास्त्री, राजवाडे इत्यादि इतिहास-तज्ञांच्या पूर्वी प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांतूनच सर्व माहिती एकत्र आणिली आहे, माझें स्वतःचें कांहीच नाहीं. आजपर्यंतच्या लेखकांनीं मराठे व ब्राह्मण सरदाराबद्दल जे विचार प्रदर्शित केले आहेत, तद्विरुद्ध मी बरींच विधानें केलीं आहेत म्हणून माझेवर कडक टीका होईल हें मी जाणून आहे. तथापि उत्पत्स्यतेऽस्ति ममकोऽपि समान धर्मा। कालोऽयं निरवधिर्विपुला च पृथ्वी। या न्यायानें माझ्यासारखी विचारसरणी दीर्घ कालानें व कोठेंतरी उत्पन्न होईल असा माझा आशावाद आहे.

मूर्तानांच अमूर्तानां । पितॄणांदीप्ततेजसाम् ॥
शौर्याद्धि मम हिंदुत्वं । अस्मिन् राष्ट्रे प्रवर्तते ॥

शूर मराठे व ब्राह्मण यांनीं आपलें रक्त सांडलें म्हणून आज मी हिंदू आहे नाहीं तर डी सिल्हा किंवा अबदुल्ला असतो याची मला जाणीव आहे. तथापि आपल्या पूर्वजांमध्यें कोणते दोष होते हें यथार्थतः समजावें व ते दोष टाळून आपण कसें वागावें हें लक्षांत यावे याकरितां कित्येक ठिकाणीं पूर्वजांवर टीका केली आहे त्यांत निंदेचा अंशही नाहीं.

गेल्या ४५० वर्षांपैकीं १९९ वर्षे जगांत कोठेना कोठें युद्ध चालूंच होतें. भविष्यकालीं मानवी समाजांतील युद्धें बंद होतील अशी आशा बाळगणें व्यर्थ आहे. स्वराज्य पाहिजे असेल तर शस्त्र पाहिजे, शस्त्र पाहिजे असेल तर शास्त्र पाहिजे असा त्रिकालाबाधित सिद्धांत आहे. याकरितां प्रत्येक हिंदवासीयानें भूतकालीं एका समाजानें दुसऱ्या समाजावर केलेल्या आक्रमणांचीं वृत्तें अति रंजित असतात म्हणून पूर्णपणें विसरून; धर्म ही बाब वैयक्तिक असल्यामुळें तिला राजकारणांत यत्किंचितही स्थान न देतां, हिंसाहिंसेचा वाद न करितां; आक्रमणाकरितां नव्हे पण स्वसंरक्षणाकरितां शस्त्रविद्येचा व भौतिक शास्त्रांचा अभ्यास केलाच पाहिजे; आणि लष्करी शिक्षण जेथून मिळेल तेथून व जितके मिळेल तितके घेण्याची पराकाष्ठा केली पाहिजे.

शस्त्रविद्येच्या अभ्यासाकडे व भौतिक शास्त्रांच्या वाढीकडे दुर्लक्ष केल्यास स्वराज्य प्राप्ति नंतरही "भो इंग्रज इहागच्छ इह तिष्ठ मम नायव्यादिशां रक्षय" असें म्हणण्याची पाळी भारतीयांवर येईल.

# हैदरचें चरित्र.

नं. २८७३१५५
८५६०

## भाग १ ला.

चरित्र नायक हैदर अलीच्या घराण्याचा मूळपुरुष महमद बैलोल हा पंजाबांतून हैदराबाद प्रांतीं गुलबर्गा येथें येऊन राहिला. त्याला अलीमहंमद आणि वलिमहंमद असे दोन पुत्र होते. हे दोघे पुत्र प्रथमतः म्हैसोर प्रांतांतील सीरा परगण्याच्या सुभेदाराजवळ नौकरीस राहिले व तेथून कांहीं दिवसांनीं कोलार येथें गेले. कोलार येथें अलीमहमद इ. स. १६७८ मध्यें मरण पावला. त्याचा मुलगा फत्तेमहमद हा सैन्यांतील लहान मोठ्या नौकऱ्या करीत करीत म्हैसोर दरबारीं फौजदार झाला व त्याला उत्तम कामगिरीबद्दल बुदिकोट्टा नांवाची एक लहानशी जहागीरही मिळाली. हा फत्तेमहंमद १७२९ मध्यें मरण पावला. ह्याला इस्माइल ऊर्फ शाहाबाज व हैदर असे दोन मुलगे होते.

हैदरचा जन्म १७२० सालीं झाला. कांहीं इतिहासकारांनीं ह्याचा जन्म १७२२ मध्यें झाला, असें म्हटलें आहे, तर कांहींनीं तो १७१७ मध्यें जन्मल्याचें दाखविलें आहे. प्रस्तुत पुस्तकांत हैदरच्या

कर्तबगारीचाच विचार विशेषत असल्यामुळें त्याच्या जन्मसनाचा वादग्रस्त मुद्दा सं ा जन्म सन १७२० सालींच झाला असें समजून मी चालणार आहें.

१७२९ मध्यें अर्काटचा नबाब सादतउल्लाखान व दिल्लीपतीचा किंवा [०]निजामचा सिरा येथील सुभेदार अब्दुल रसूलखान यामध्यें लढाई झाली. या लढाईंत तो सुभेदार व त्याचा नोकर हैदरचा बाप फत्तेमहंमद हे दोघेही मारले गेले. फत्तेमहंमदच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलाचा व पत्नीचा शत्रूंनीं छळ केला व त्याजवळील सर्व चीजवस्त लुटून नेली. या प्रसंगामुळें हैदरच्या आईनें आपलीं दोन मुलें बरोबर घेऊन बंगलोरकडे प्रयाण केलें व तेथें ती कसें तरी करून पोट भरूं लागली.

हैदरचा भाऊ शाहाबाज हा लवकरच म्हैसोर दरबारच्या सैन्यांत नौकरीवर राहिला व आपल्या कर्तबगारीनें अल्पकाळांतच त्यानें दोनशें स्वार व हजार पायदळ यांचें आधिपत्य मिळाविलें.

इ. स. १७४९ मध्यें म्हैसूर दरबारनें शाहाबाझ ह्यास [†]देवनहल्लीस वेढा घालण्यास पाठविलें. त्यावेळीं हैदर आपल्या भावाबरोबर लष्करी कामगिरीवर गेला, व तेथें त्याच्या अंगचे शौर्यवीर्यादि लोकोत्तर गुण प्रथमतः सर्वांच्या निदर्शनास आले. म्हैसोरचा दिवाण नंदराज हा हैदरच्या गुणांवर फारच खुष झाला व पुढें जेव्हां अर्काटकडे सैन्य पाठवावयाचें ठरलें त्यावेळीं एका लहानशा लष्करी तुकडीवर त्यानें हैदरास नायक नेमिलें. अर्काटचा नबाब अन्वरुद्दीन व त्याचा मेहुणा

---

[०] निजाम हा त्यावेळीं दिल्लीपतीच्या ताब्यांतील सुभेदार होता म्हणून निजमाचा असें समजतात.

( [†] हें गांव बंगलोरच्या उत्तरेस सुमारें २३ मैलावर आहे. )

चंदासाहेब यांच्यामध्यें तंटा लागला होता. अंबूरचे लढाईत अन्वरुद्दीन मारला गेला, तेव्हां त्याचा मुलगा महंमदअल्ली त्रिचनापल्लीस पळून गेला. ह्या धांदलींत हैदरनें बरीच लूट मिळविली. यांच्या लढ्यांत इंग्लिश, फ्रेंच व मराठे यांचे संबंध आले होते, हें इतिहासज्ञास माहित आहेच. लहान सहान अनेक झगडे झाल्यावर अर्काटच्या नबाबाचा मुलगा महमदअल्ली यास त्रिचनापल्लीस पळून जाण्याची पाळी आली. यावेळीं जी धांदल उडाली, तींत हैदरनें बरीच लूट मिळविली व नंतर तो म्हैसोरला परत आला.

परत येण्यापूर्वी हैदर पांडिचेरी येथें गेला. तेथें त्यानें फ्रेंच सैन्याची शिस्त व शिक्षण यांचें सूक्ष्म निरीक्षण केलें. दारुगोळा कसा तयार करितात, नवीन शस्त्रास्त्रें कोणतीं आहेत व त्यांचा लढायांत उपयोग केल्यानें कोणते फायदे आहेत, याचाही त्यानें विचार केला. तसेंच फ्रेंच एंजिनियर्स देशीय एंजिनियर्स पेक्षां कोणत्या कामांत श्रेष्ठ आहेत, हेंही त्यानें पाहिलें; पांडेचरीचें सूक्ष्म निरीक्षण करितां क्षणींच "हिंदुस्थानांत नवीन राज्य स्थापावयाचें असल्यास आपलीं हत्यारें सुधारलीं पाहिजेत, सैनिकांत शिस्त उत्पन्न केली पाहिजे व पाश्चात्य कला उचलल्या पाहिजेत-" ह्या गोष्टी त्याचे मनावर बिंबल्या व पुढें राज्यस्थापनेचा उद्योग करितांना त्याला पांडिचेरीस मिळालेल्या ज्ञानाचा फारच उपयोग झाला. १७५१ मध्यें महमदअल्लीस मदत करण्याकरितां हैदर म्हैसोरतर्फे पुन्हां लढाईवर गेला. यावेळीं तो घोडदळाचा नायक होता. सन १७५१ ते १७५५ पर्यंत हैदर रणांगणावरच होता. एकदां पदुकोटाईजवळ एका इंग्रज सरदारचा पराभव झाला. ही संधि साधून हैदरनें कित्येक तोफा लूट करून संपादन केल्या. हैदर आपलें सामर्थ्य एकसारखे वाढवीतच होता. सन १७५५ मध्यें त्याचे जवळ १५०० घोडदळ व ३००० पायदळ

होते. या शिवाय अर्धवट ले लोकही पुष्कळ होते.

सन १७५५ मध्यें म्हैसोर दरबारनें हैदरास दिंडिगलचा फौजदार नेमिलें. लागलींच फ्रेंच कारागिरांना नौकरीस ठेवून हैदरनें दिंडिगल येथें दारुगोळा तयार करण्याचा कारखाना सुरू केला. भोंवतालच्या प्रदेशांत लुटालूट करून पैसा गोळा करणें व आपल्या सैनिकांची वाढ करणें हीं कामें त्यानें सतत चालू ठेवलीं होतीं.

हैद्राबादचा निजाम सलाबतजंग व त्याचा सरदार डि बुसी यांचें सैन्य १७५६ च्या अखेर म्हैसोरवर चालून आलें, व सलाबतजंग यानें बऱ्याच मोठ्या खंडणीची मागणी केली. म्हैसोरचा दिवाण नंदराज याला खंडणी देतां येईना. शेवटीं त्यानें पैसा मिळविण्याकरितां देवळांतील संपात्ति लुटून व दरबारचीं रत्नें देऊन निजामास कसेंबसें संतुष्ट केलें. सन १७५७ मध्यें मार्च महिन्यांत बाळाजी बाजीराव पेशवे म्हैसोरवर एकदम चालून आले. पेशव्यांची फौज ६० हजार होती त्यांस मुरारराव गुत्तीकर आपल्या ६ हजार सैन्यानिशीं मिळाला. पेशव्यानीं खंडणीबद्दल म्हैसोरकराकडे फारमोठ्या रकमेची मागणी केली. नंदराजास खंडणी देतां येईना. त्यानें खंडणी थोडी घेण्याबद्दल पुष्कळ विनंत्या केल्या, पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पेशव्यांनीं श्रीरंग-पट्टणास वेढा दिला व तोफांचा मारा सुरू केला. हा वेढा २७ दिवस चालू राहिला. नंदराजही मोठ्या हिमतीनें लढूं लागला. एके दिवशीं तोफेचा गोळा लागून श्रीरंगपट्टणमधील श्रीरंगाचें देवालयाचा कळस मोडला व त्याच वेळीं एक तोफ फुटून बरेच गोलंदाज जाया झाले. पेशव्यास हा अपशकून झाला असें वाटलें म्हणून ते तह करण्यास तयार झाले. या तहानें नंदराजानें ३२ लक्ष रु. मराठ्यांस द्यावें असें

ठरलें. यापैकीं फक्त ५ लाख रुपये रोख मराठ्यांस मिळाले व बाकीच्या २७ लाखाकरितां म्हैसोरकरांचे १४ सुपीक परगणे गहाण म्हणून मराठ्यांस मिळाले. तह झाल्यानतर मराठे म्हैसोर प्रांत सोडून गेले.

पावसाळ्याच्या आरंभीं सरदार बळवंतराव मेहेंदळे यांच्याजवळ कांहीं फौज कर्नाटक प्रांतीं ठेवून पेशवे पुण्यास आले. पावसाळ्यांत कडाप्पाच्या नबाबानें मद्रासचे इंग्रज, गुत्तीकर मुरारराव, चित्रदुर्गचा पाळेगार व दुसरे कित्येक पाळेगार यांचा संघ जमवून मराठ्यांस दक्षिणेंत बुडवावें असा बेत केला. त्यामुळें मराठ्यांचें सैन्य कडाप्याच्या नबाबा-बरोबर झुंजण्यांत गुंतलें.

नंदराजानें १४ परगणे मराठ्यांस दिलें, ही गोष्ट हैदरास मुळींच रुचली नाहीं. नंदराजास तो म्हणाला कीं, तूं जर मला दिंडिगलहून बोलाविल असतेस तर मी मराठ्यांस धूळ चारली असती. हैदरचें या वेळचें म्हणणें जरा दर्पोक्तीचें दिसतें. हैदरचें सामर्थ्य जरी यावेळीं पुष्कळच वाढलेलें होतें तरी तें मराठ्यांच्या मानानें फारच अल्प होतें. तथापि हैदरच्या उक्तीवरून त्याला आत्मविश्वास किती वाटत होता व त्याची मराठ्याबरोबर दोन हात करण्याची इच्छा किती अनावर झाली होती, तें मात्र स्पष्ट दिसतें. असो, मराठ्यांची फौज कडप्पेकरांशीं कज्जा करण्यांत गुंतली आहे, या गोष्टीचा फायदा घेण्याचें हैदरनें ठरविलें. त्यानें नंदराजास अशी मसलत दिली कीं, सध्यां कर्नाटकांत असलेल्या फौजेस कडप्पेकरांशीं चाललेली झुंज टाकून म्हैसोरकडे येतां येणार नाहीं. व पेशव्यांची मदत किंवा नवी फौज पावसाळा संपल्याशिवाय म्हैसोरकडे येऊं शकणार नाहीं. तेव्हां या संधीचा फायदा घेऊन १४ परगण्यांतील पेशव्यांचा अंमल उठवून दे. पुढें पेशवे चालून आले तर काय करावयाचें तें नंतर ठरवूं. नंदराजानें लागलीच हैदरच्या सल्ल्याप्रमाणें १४

परगण्यांतील मराठ्यांचा अम्मल उठविला व ते सर्व परगणे आपल्या ताब्यांत घेतले. ‡

बळवन्तराव मेहेंदळे यांस कडाप्याच्या नबाबाचा पराभव करण्यांतच १७५७ चा पावसाळा घालवावा लागला. त्यांना नंदराजाकडे आपला मोर्चा फिरविण्यास अवसरच मिळाला नाहीं. याचवेळीं, पेशव्यांचा निजामाशीं बेबनाव होऊन पेशव्यास निजामाबरोबर लढण्याचा प्रसंग आला, त्यामुळें बळवंतरावास आपली कर्नाटकांतील कामगिरी सोडून परत जावें लागलें. यामुळें हैदरनें नंदराजास जो सल्ला दिला होता. त्याचा पूर्ण फायदा नंदराजास मिळाला व मराठ्यांच्या हातून १४ परगणे गेले ते गेलेच.

नंदराज व त्याचा भाऊ देवराज यांचेही पटेनासें झालें. म्हैसोर दरबारला सैन्याचा पगार वेळेवर चुकता न करितां आल्यामुळें, सैन्यानें बंडाळी केली. त्यामुळें हैदरास दरबारीं बोलाविलें, हैदरनें हिशेबाची नीट छाननी केली, सैनिकांचें न्याय्य देणें देऊन टाकिलें. सुमारें ४ हजार सैनिकांना कायमची रजा दिली व बंडांतील पुढाऱ्यांना शिक्षा करून बंड मोडिलें. " म्हैसोर दरबारला हें बंड मोडतां आलें नाहीं व हिशेबाची नीट छाननी करितां आली नाहीं. यामुळें त्यास हैदरची मदत घेणें प्राप्त झालें. जें इतरांना करितां आलें नाहीं तें हैदरनें केलें. यामुळें त्याची दरबारांत प्रतिष्ठाही वाढली. अशा तऱ्हेनें हैदरचें सामर्थ्य कांहीं वेळां त्याच्या कर्तबगारीनें तर कांहीं वेळां इतरांच्या बौद्धिक कमतरतेमुळें वाढत

---

‡ यासालीं अबदल्लीनें दिल्ली काबीज केली, मथुरेवर चाल करून देवालयांचा विध्वंस केला व पुष्कळ संपत्ति लुटून नेली. नंतर राघोबानें पंजाबवर स्वारीकरून अबदल्लीचा मुलगा तयमूरशहा यास हाकून लाविलें व अटकेवर मराठ्यांचे झेंडे फडकाविले.

गेलें. म्हैसोर दरबारनें आपल्या हातचें १४ परगणे परत घेतले व वचनभंग केला याबद्दल पेशव्यांना राग आला व त्यांनीं म्हैसोरवर स्वारी करण्याकरितां सन १७५९ मध्यें गोपाळ हरी पटवर्धन यांस मोठ्या सैन्यानिशीं रवाना केलें. म्हैसोर दरबारास यावेळीं स्वसंरक्षण करण्याचें सामर्थ्य नव्हतें. दरबारनें हैदरास मदतीस बोलाविलें. हैदर हाच कायतो यावेळीं म्हैसोरचा त्राता होता. म्हैसोरच्या भोंवतालची सर्व भौगोलिक परिस्थिति त्यानें सूक्ष्मपणें पाहिली होती. त्यामुळें नद्या, नाले, अरण्यें व पर्वत यांतील निरनिराळ्या वाटा व अडचणीच्या जागा यांची त्यास पूर्ण माहिती झाली होती. हैदर फ्रेंच लोकांपासून कवायती फौजेचा उपयोग करण्यास शिकला व त्यानें नवीन पद्धतीचीं ( तोफा वगैरे ) शस्त्रें निर्माण केलीं व अशा तऱ्हेनें पाश्चात्य युद्धकला त्यानें आत्मसात् केली. त्याचप्रमाणें मराठ्यांच्या गनीमी काव्यांतही तो वाकब बनला होता. तेव्हां म्हैसोर दरबारचें पाचारण येतांच हा वीर हर्षोद्रेकानें दंड थोपटीतच मराठ्यांशीं टक्कर देण्यास पुढें सरसावला.

युद्ध सुरूं होण्यापूर्वी हैदरनें मादूर व मालवल्लि या दोन किल्ल्यांची उत्तम व्यवस्था केली. मादूर येथें लतीफअली बेग नांवाच्या सरदारास ठेविलें. मराठ्यांनीं चेन्नापट्टण हें ठाणें काबीज केलें होतें तें परत घेण्याचें काम लतीफकडे आलें. त्यान मराठ्यांस अनेक प्रकारच्या हुलकावण्या दाखविल्या व एकें दिवशीं, हलकेच आपलें सैन्य चेन्नापट्टणजवळ नेऊन मराठे साखरझोपेंत असतांना किल्ल्यास शिड्या लावून तो सर केला. किल्ला सर केल्याबरोबर हैदरनें आपले मोठें सैन्य तेथें नेलें व बंदोबस्तानें राहिला. मराठे व हैदर यांजमध्यें अनेक चकमकी झडल्या पण जयश्री निश्चितपणें कोणासच वरीना.

मराठ्यांचें बळ विशेषतः घोडदळांत असें. सन १७५५ मध्यें

पेशव्यांचा मुक्काम कुकडी नदीवर असतांना जेव्हां डीबुसीनें तोफांचा मारा केला त्यावेळीं पेशव्यांस व इतर मराठे सरदारांस तोफांचें व कवायती फौजेचें महत्व प्रथमत: कळालें. तोफ ही काय वस्तु आहे हें मराठ्यांस तों पर्यंत माहीत नव्हतें असा अर्थ नव्हे. पेशव्याजवळ तोफा असत परन्तु त्या पाश्चात्य लोकांच्या तोफा इतक्या कार्यक्षम नसत. दुसरें असें कीं, प्रत्येक स्वारींत पेशवे आपला तोफखाना जवळ बाळगीत नसत. त्यांची मोठी भिस्त घोडदळावर असे. मराठ्यांची लढण्याची पद्धति अशी असे कीं, घोडदळाच्या चार सहा तुकड्या करावयाच्या व एकदम शत्रूच्या मुलखांत शिरून जाळपोळ व लुटालूट करीत जावयाचें. घोडदळ चाळीस पन्नास मैलांच्या मजलाही कित्येक वेळां सहज मारीत असे. या पद्धतीमुळें शत्रूची जेव्हां उघड सामना करण्याकरितां मैदानावर गांठ पडे तेव्हां मराठ्यांना निश्चितपणें जय मिळत असे. शत्रूचा तोफखाना कितीही कार्यक्षम असला व शत्रू कितीही प्रबळ असला तरी तो लवकरच हैराण होई. हैदरनें मराठ्यांबरोबर अगदीं नवीन तऱ्हेनेंच युद्ध चालाविलें.

कर्नाटकांतील अनेक बिकट स्थानांची हैदरास पूर्ण माहिती होती त्यामुळें तो आपली छावणी अशा बिकट ठिकाणीं नेऊन ठेवी कीं, मराठ्यांच्या घोडदळास त्या ठिकाणावर हल्ला चढाविणें अत्यंत कठीण पडे. या शिवाय छावणी भोंवतीं खंदक खणून सभोंवार ठिकठिकाणीं बातेऱ्या बांधून आपला तोफखाना जय्यत ठेवी. दिवसा सहसा तो बाहेर पडत नसे. रात्रीं एकदम केव्हां तरी बाहेर पडे व लांबचा मजल मारून मराठ्यांवर अचानक हल्ला करून नुकसान करी. अशा तऱ्हेनें मराठ्यांचा गनीमी कावा तो मराठ्यांच्याच मानगुटीवर बसवूं लागला.

यावेळीं अनेक लहान सहान चकमकी उडाल्या पण निश्चितपणें सरशी कोणाचीच होईना व दोन्ही पक्ष युद्धास कंटाळल्यामुळें तह झाला

या तहानें असें ठरलें कीं, म्हैसोर दरबारनें पेशव्यांस ३२ लक्ष रुपये खंडणी द्यावी व मराठ्यांनीं १४ परगण्यांवरील आपला हक्क सोडावा. हा तह होतांच खंडणी तावडतोब देऊन टाकण्याबद्दल हैदरनें नंदराजाकडे तगादा लाविला. नंदराजाजवळ पैसा नव्हता. लष्करी मदतीकरितां नंदराजाला जशी हैदरची मनधरणी करावी लागली त्याप्रमाणें पैशा-करितांही त्याला हैदरच्याच तोंडाकडे पहावें लागलें. मराठ्यांकडे पूर्वीं गहाण ठेविलेले १४ परगणे हैदरकडे गहाण ठेवावे व हैदरनें मराठ्यांचे खंडणीबद्दलचे पैसे देऊन टाकावे असें ठरलें. हैदरनें १४ परगणे ताब्यांत घेतले पण प्रत्यक्ष रक्कम पेशव्यांच्या पदरांत टाकिली नाहींच. मराठ्यांच्या सावकारांनीं पैसे भरण्याबद्दल हैदरची जामिनकी पत्करिली व अशा तऱ्हेनें हें युद्ध थांबलें.

या युद्धामुळें म्हैसोर दरबारीं व इतर पाळेगारांत हैदरचें वजन फारच वाढलें. म्हैसोर दरबारनें हैदरास 'फत्तेमहंमद' असा बहुमानाचा किताब दिला व म्हैसोरचा त्राता असा त्याचा सर्वत्र गौरव झाला. दक्षिणेंतील सर्व लहान मोठ्या संस्थानिकांना मराठ्यांचा धाक वाटत असे व म्हणून ते मराठ्यांशीं उघड सामना देण्यास भीत असत. पण आपणाला मराठ्यांशीं यशस्वितेनें उघड सामना देतां येतो ही गोष्ट हैदरनें या युद्धांत सिद्ध केली. यामुळें मराठ्यांचा वचक नाहींसा झाला. शत्रूची भीति न वाटणें व शत्रू पादाक्रांत करणें अशा विजयाच्या दोन पायऱ्या आहेत, यापैकीं पहिल्या पदावर हैदर स्थिर झाला. हैदरची जामिनकी मराठा सावकारांनीं पत्करिल्यामुळें प्रत्यक्ष मराठ्यांमध्येंही त्याची कांहीं विवक्षित अशी योग्यता प्रस्थापित झाली. हैदरकडे पूर्वीं कोइमतूर, दिंडिगल, बंगलोर वगैरे परगणे होतेच त्यांत मराठ्यांनीं सोडलेल्या १४ परगण्यांची भर पडली. यामुळें तो म्हैसोरच्या अर्ध्या राज्याचा मालकच

बनला. एवंच या युद्धामुळें हैदरचें सामर्थ्य व लौकिक चांगलाच वाढला. हैदरला खच्ची करण्याचा हा गोपाळ हरीचा प्रयत्न " विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम् " या म्हणीचें उत्कृष्ट उदाहरण होय.

कॅ. विल्कस् यानें या स्वारींत मराठ्यांचा पराजय झाला असें आपले मत दिलें आहे. नानासाहेब पेशव्यांनींही ' हैदरनें तुमचें स्वरूप नेलें (तेज नष्ट केलें)असें पत्र लिहून गोपाळरावास हिणविलें आहे.' कै. खरे शास्त्री मात्र असें म्हणतात कीं," आपण हारीस आलों हें गोपाळराव बिलकुल कबूल करीत नाहींत. आम्हांकडून हैदरास चांगली तंबी पोहोंचल्या शिवाय कांहीं त्यानें आम्हांस खंडणी दिली नाहीं हा गोपाळरावांच्या पत्रांतील मुद्दा अगदीं खरा आहे. आपला आतां कांहीं एक उपाय चालत नाहीं अशी पक्की खात्री झाल्याशिवाय नुसत्या अवडंबरास भिऊन कोणास खंडणी देणारा मनुष्य हैदर नाईक नव्हता."

स्वजातीय योध्याबद्दलचा अभिमान वाटत असल्यामुळें त्या अभिमानाच्या भरांत गोपाळरावांची सरशी झाली असें कै. खरे शास्त्री यांनीं आपलें मत दिलें आहे एवढेंच. कॅ. विल्कस् हा योद्धा होता. व नानासाहेब पेशवे हे मुत्सद्दी होते. या दोघांसही वरील तहामुळें हैदरचें सामर्थ्य वाढलें असें स्पष्टपणें दिसलें व म्हणून त्यांनीं हैदरची सरशी झाली असें आपलें मत दिलें आहे.

हैदर हा फार धोरणी होता. नमण्याचे प्रसंग आणि ताठ होण्याचें प्रसंग तो बरोबर ओळखीत असे. खंडणी देण्याचें कबूल केल्यानें जर युद्धाची कटकट कांहीं काल थांबते, आपला लौकिक व सामर्थ्य वाढतें, अधिक लष्करी तयारी करण्यास फुरसद सांपडते तर खंडणी देण्याचें कबूल करण्यांत त्याचें कोणतेंच नुकसान नव्हतें. बरें प्रत्यक्ष खंडणी दिली म्हणावी तर तेंही नाहीं. खंडणी देण्याचा हवाला परस्पर मराठ्यांच्या सावकाराकडेच.

२०७ ३/५५

सावकारांना तुमचे मी कार्डाचेंही देणें लागत नाहीं हें कसें. व केव्हां म्हणावें हें हैदरास पूर्णपणें ठाऊक होतें. म्हणून खंडणी देण्याचें कबूल करण्यांत हैदरास कांहींच वाटलें नाहीं.

सन १७६० मध्यें मराठ्यांचें सैन्य निघून गेल्यावर हैदरास सर्वच रान मोकळें झालें. हैदरजवळ खंडेराव नांवाचा ब्राह्मण होता त्याजवर हैदरचा अत्यंत विश्वास असे. त्याचे मार्फतीनें एक नवीनच कारस्थान रचण्यांत आलें. या ब्राह्मणाकरवीं हैदरनें म्हैसोरच्या राजाकडून दिवाण नंदराज याचा सर्व अधिकार काढून घेतला व त्यास राजधानी बाहेर काढून देण्यांत आलें. हैदर दळवाई म्हणजे सेनापति झाला. दिवाण नंदराज याला राजानें अधिकारच्युत केलें होतें तेव्हां तो राजाची मनधरणी करूं लागला. राजासही हैदर हा सर्वसत्ताधिकारी झाला हें आवडलें नाहीं. त्याला पुन्हां नंदराजाची मदत घ्यावी असें वाटलें. यामुळें नंदराज दिवाण व म्हैसोरचा राजा यांनीं संगनमत केलें. तथापि या दोघांतही हैदरास नमविण्याचें सामर्थ्य नव्हतें. सन १७६० मध्यें गोपाळराव पटवर्धन व विसाजीपन्त बिनीवाले हे कर्नाटकांत खंडण्या उकळीत फिरत होते. त्यांस कांहीं पैसे देऊन म्हैसोरच्या राजानें व नंदराज दिवाणानें वश करून घेतलें व सर्वांनीं मिळून हैदरचें पारिपत्य करावें असें ठरलें. त्या मसलतींत हैदरचा दिवाण खंडेराव हाही सामील झाला.

यावेळीं हैदरचें सैन्य मखदुम अली नांवाच्या सरदाराबरोबर अर्काटकडे गेलें होतें. हैदर चार पांच हजार सैन्या समवेत कावेरीच्या तीरीं श्रीरंगपट्टण येथें स्वस्थ होता. पावसाळा असल्यामुळें तुंगभद्रा नदी तुडुंब भरलेली होती व हैदरला इकडे तिकडे हालण्यास फारसा मुळींच अवसर नव्हता. हैदरला नंदराजाचें किंवा म्हैसोरच्या राजाचे बेताबद्दल यत्किंचित्ही सुगावा लागला नव्हता. भर पावसाळ्यांत अत्यंत अडचणीच्या

वेळीं खंडेरावानें सन १७६० आगष्ट २२ रोजीं हैदरवर हल्ला केला. पण कांहीं अडचणींमुळें मराठ्यांचे सैन्य आगष्ट २२ रोजीं न येतां तारीख २३ रोजीं आलें. हैदरनें ता. २२ रोजीं शरण आल्याचें सोंग केलें व तहाचें बोलणें लाविलें व ता. २२ रोजीं नावेंत बसून कावेरी पार झाला व सतत २० तास घोड्याच्या पाठीवर बसून ९८ मैलावर बंगलोरकडे एकटाच निघून गेला. वकीली, डाक्टरी, किंवा लेक्चरी करणारांनीं एकदा ८।१० मैल घोडा भरधांव फेंकून पहावा म्हणजे त्यांना सतत २० तास घोडदौड करण्यास कोणते गुण लागतात याची कल्पना येईल.

कसलाही बिकट प्रसंग आला तरी यत्किंचित्‌ही न डगमगणें हा सद्‌गुण हैदरमध्यें असल्यामुळें या प्रसंगीं 'मी आतां कसें करूं' हा विचार त्याचे मनास शिवला नाहीं. बंगलोरकडे जातांच त्यानें नवी फौज ठेवण्यास सुरवात केली व अर्काटहून मखमुद अल्लीस परत बोलाविलें. तो परत येऊं लागला तोंच गापाळहरी व विसाजीपंत यांनीं त्यास घेरिलें. मराठ्यांशीं झुंज देत देत तो पुढें सरकतच राहिला व अगदीं बंगलोर जवळ २४ मैलावर येऊन ठेपला. शेवटीं मराठ्यांनीं त्यास पूर्ण वेढा घातला म्हणून हैदरनें मिरफैजुल्ला यास चार हजार फौज व पांच तोफा देऊन मदतीस पाठविलें. पण मराठ्यांनीं ती फौज वाटेंतच कापून काढिली. मखदुमअल्लीचा पूर्ण पराभव होण्याची वेळ आली. हैदरनें बंगलोरास असतांनाच प्रसंगाचें महत्व ओळखून तहाचें बोलणें लाविलें होतें. म्हैसोर दरबार व मराठे हे दोन्ही शत्रू चिडलेले आहेत. तह न झाल्यास आपला पूर्ण नाश होईल हें त्यास पक्कें माहित होतें व म्हणून तह करण्यास तो उत्सुक झाला होता. शत्रूशीं सामना देण्यापुरतें त्याजजवळ सैन्य नसल्यामुळें तो फिकीरींतच होता. मखदुलअल्लीच्या सैन्याचा बहुतेक धुव्वा उडालेला होता व तो दोन चार आठवड्यांत मराठ्यांच्या हातीं

लागला असता किंवा शरण आला असता. अशा रीतीनें संपूर्ण यशाचा पेला मराठ्यांच्या ओठास लागलेला होता पण तोंड उघडून मराठ्यांनीं तो चाखण्याचें नाकारिलें. त्यानीं तीन लक्ष रुपये व बारा महाल प्राप्त घेण्याचें ठरवून शहाजणें वाजवीत शहाणपणानें पुण्यास जाण्याचें ठरविलें. हैदरनें तीन लाख रुपये पदरांत टाकतांच ते रुपये खुळखुळ वाजवीत खुळेपणानें शत्रूची पूर्ण खोड मोडण्याची सुसंधि गमावून ते पुण्याकडे निघून गेले.

पानपतच्या पराजयामुळें हैदरचा उदय झाला असें अनेक इतिहासकारांनीं लिहिलें आहे. पण मागें दिलेल्या हकीकतीचा शांतपणें विचार केल्यास असें दिसून येतें कीं, मराठ्यांशीं आपल्याला यशस्वितनें दोन हात करितां येतात ही गोष्ट त्यानें १७५९ सालीं गोपाळ हरी बरोबर संग्राम करून सिद्ध केली होती. म्हैसोर दरबारीं आपलें वर्चस्व पूर्णपणें प्रस्थापित केलें होतें. दिंडिगल येथें शस्त्रास्त्रांचा कारखाना उघडून "ज्याचें शस्त्र त्याचें राज्य" हा सिद्धांत त्यानें विशद करून दाखविला होता. फ्रेंचांच्या मदतीनें तोफखाना व कवायती फौज तयार केली होती. मिरफैजुल्ला व मखदुमअल्ली सारख्या घस्मर योध्यांचे सहाय्य मिळविलें होतें, मराठ्याची गनीमी पद्धति पूर्णपणें आत्मसात् केली होती व इंग्रजांच्या पायदळी पलटणींचा तो पूर्ण वाकबगार बनला होता. तेव्हां सन १७६१ पूर्वींच हैदरचा उदय झाला होता एवढेंच नव्हे, तर हा चंडप्रकाश क्षितिजापासून ४५° अंशावर आलेला होता व राहिलेले खमध्य पर्यंतचें ४५° अंशांचे अंतर झटकन् तोडून खमध्यावर स्थिर होणार होता. हैदर लवकरच खमध्यावर स्थिर झाल्यामुळें त्याच्या प्रखर तापानें इंग्रज, मराठे व निजाम हे कमकसे होरपळून निघाले तें पुढें यथावकाश येईलच.

"हैदरचा पूर्ण पराभव होण्याची संधि सोडून मराठ्यांचे सरदार एकदम निघून गेले हें खरें, पण परिस्थितीच अशी होती कीं, त्यांस परत

जाणें भाग होते" असें इतिहासकार म्हणतात. म्हणून ह्या एका मुद्याचा विचार होणें जरूर आहे.

मराठ्यांचा उदय शिवकालीं झाला व महाराजांचे पश्चात् मराठ्यांच्या सत्तेला औरंगजेबाच्या स्वारीमुळें फारच मोठें आंदोलन मिळालें. तथापि पहिले बाजीराव व चिमाजी आप्पा हे कर्ते व शूर पुरुष होते. त्यांचे पश्चात् नानासाहेबा सारखा पुरुष कारभार पाहूं लागला. तेव्हां सन १७२० ते १७६० पर्यंतच्या कालांत मराठ्यांचें सामर्थ्य एकसारखे वाढतच होते. पानिपतचा पराभव फारच मोठा होता यांत शंका नाहीं, तथापि मराठ्यांच्या वाढीला ४० वर्षांचा काल मिळाला होता. सतत ४० वर्षे जी सत्ता वाढत होती त्या सत्तेला पानपतची मसलत अंगावर येतांच व निजामानें थोडी गडबड करतांच कर्नाटकांतील फौजांना तावडतोब पुण्यास परत बोलाविण्याची पाळी पुणें दरबारास यावयास नको होती. निजाम जेव्हां प्रत्यक्ष चाल करून आला तेव्हां त्याजबरोबर सामना देतांना राघोबाजवळ निजामाच्या दीडपट किंवा दुप्पट फौज होती. तेव्हां कर्नाटकांतील फौजा परत आणण्याचें कारणच नव्हतें. पुणें येथें कर्नाटकांतील सरदारास बोलावणें दरबारास जरूरच होतें असे मानिलें तरी म्हैसोरपासून पुणे फार दूर असल्यामुळें प्रत्यक्ष रणक्षेत्रावर काय परिस्थिति आहे हें समजणें पुणें दरबारास अशक्य होतें. रणक्षेत्रावरील प्रसंग काय आहेत तें पाहून, आपण रणांगण सोडून गेलो तर त्याचे इष्ट किंवा अनिष्ट परिणाम काय होणार आहेत याचा अंदाज ठरवून आपलें धोरण निश्चित करणें हें सरदारांचे काम होतें. पुणें दरबारचे बोलावणें आलें म्हणून एकदोन आठवड्यांत जी कामगिरी होण्यासाखी होती ती न करितां पुण्याकडे पळत सुटण्याचें कारणच नव्हतें. म्हणून सरदारांनीं धावळटपणा करून परत जावयास नको होतें. कर्नाटकांतील सरदार २।३ आठवड्यांत

आपला कार्यभाग उरकून यश संपादन करून गेले असते तर त्यांजबद्दल हुकूम न पाळण्याचा आरोप येण्यासारखे कांहींच नव्हतें व कर्नाटकांतील सरदारांना परत येण्यास दोन तीन आठवड्यांचा कालावधि लागला असता तर ते येईपर्यंत पुणें दरबाराला शत्रूशीं यशस्वितेनें दोन हात करतां यावयास पाहिजे होते. आणि एवढेंही सामर्थ्य जर पुणें दरबारांत नसेल तर सन १७२० पासून १७६० पर्यंत मराठे व ब्राह्मण यांनीं काय केलें? इंग्लिश गव्हरनर्सनीं आपल्या डायरेक्टरांचे युद्ध न करण्याचें किंवा थांबविण्याचें हुकूम खिशांत ठेवूनही युद्धें केलीं व यश संपादन करून राज्य मिळविलें. सन १७६१ ते १८०० मधील मराठ्यांचे सरदार व इंग्लिश सरदार यांच्या वागणुकीची तुलना केली तर प्रसंगाचे महत्व ओळखून त्याप्रमाणें झटकन् कार्यसिद्धि करून घेण्याची बुद्धि मराठा सरदारांत कमीच होती असें, मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें.

असो. याप्रमाणें तह करून मराठे परत फिरले. त्यांच्या हातांत हैदरनें तीन लक्ष रुपये टाकिले. बारा महाल मराठ्यांस देण्याचें ठरविलें पण तो प्रांत त्यानें कधींच दिला नाहीं. सन १७६१ सालीं पानपतावर मराठ्यांचा पराजय झाला. उत्तर हिंदुस्थानांत लक्षावधि लोकांचा संहार झाला. महाराष्ट्रांत त्यामुळें घरोघर रडारडी सुरूं झाली. पण या पराजयानें महाराष्ट्रांतील लोकांत शत्रूबद्दल द्वेष, झालेल्या चुकांबद्दल पश्चाताप व या पश्चात्तापामुळें त्यागवृत्ति, स्वकीय जनाबद्दल प्रेम व सहानुभूति उत्पन्न होऊन आपलें हिंदूंचें राज्य हिंदुस्थानांत कसें टिकेल? हिंदुपद पादशाहीचे पूर्व वैभव कसें कायम राहील? याचाच विचार सर्वत्र व्हावयास पाहिजे होता. उत्तरेकडे रोहिले व अफगाण शेर होऊन त्यांनीं मराठ्यांस हांकून देण्याचा विडाच उचलल्या सारखें झालें होतें. दाक्षिणेंत हैदर उत्पन्न होऊन तो स्वतःचें राज्य स्थापण्याचा प्रयत्न करीत होता. हैदर हा

'असामान्य' शत्रू आहे हें सर्व मराठे व ब्राह्मण सरदारांना माहीत होतें. इंग्रज, व फ्रेंच या दोन सत्ता हिंदुस्थानाचे किनाऱ्या किनाऱ्याचे लचके तोडीत होत्या. अशा वेळीं औरंगजेबाच्या स्वारीच्या वेळेप्रमाणें ब्राह्मण व मराठे सरदारांनीं आपलें सामर्थ्य एकवटून एकोप्यानें वागावयास पाहिजे होतें. विजयानगरचें साम्राज्य डोईजड होतांच, अदिलशाही, कुतबशाही इत्यादि मुसलमानसत्तांनीं आपलें सामर्थ्य एकवटून विजयनगराची राखरांगोळी केली हा इतिहास सर्वांच्या डोळ्यापुढें होता. संकटाचे वेळीं शत्रूशत्रूसुद्धां मित्र बनतात, पण १७६१ नंतर महाराष्ट्रात मात्र निराळाच देखावा दिसूं लागला. सन १७६१ ते सन १७६३ या सालांतील महाराष्ट्रांतल्या घडामोडींचा स्थूल इतिहास नीट समजावून घेतला तर मराठे व ब्राह्मण हे राज्य करण्यास व सांभाळण्यास कितपत समर्थ होते, हिंदूंमध्यें हिंदु ह्मणून जगण्याचें सामर्थ्य व इच्छा कितपत होती व हैदरला या परिस्थितीचा फायदा कसा घेतां आला या गोष्टी नीट समजून येतील ह्मणून त्या करितां १७६१ नंतरच्या महाराष्ट्रांतील घडामोडींचा संक्षिप्त इतिहास येथें सांगणें जरूर आहे.

उदगीरच्या लढाईचें उट्टें काढण्याची निजाम वाटच पहात होता. तेव्हां पानपत येथें मराठ्यांचा पराभव झाल्याचें ऐकिल्यावर निजामानें मराठ्यांवर स्वारी केली. त्यानें जाधवराव, उदाजी चव्हाण व लाला ब्रिजदास या तिघा हिंदु सरदारांस पेशव्यांच्या मुलखावर स्वारीस पाठविलें. त्यांनीं मालखेड, आळंद, गुंजोटी वगैरे सर्व प्रांत लुटून फस्त केले. निजामही ५०-६० हजार फौज घेऊन थेट पुण्याचे रोखानें चालला. वाटेंत त्यानें टोकें क्षेत्र उध्वस्त केलें. तेव्हां मात्र रामचंद्र जाधव यास निजामाची सरदारी पत्करल्यामुळेंच आपण टोकें क्षेत्र विध्वंसाच्या पातकाचें भागदायी झालों असें वाटलें व तो मराठ्यांचे बाजूस आला. राघोबादादा व माधव-

राव यांचे जवळ निजामाचे दीडपट किंवा दुप्पट फौज होती. परन्तु मराठे सरदारांत "आपण हिंदू ह्मणून जगावें, हिंदूंचें राज्य राखावें" ही कल्पनाच शिल्लक नसल्यामुळें निजामाचा मोड न होतां नोव्हेंबर १७६१ मध्यें तो थेट उरळी कांचन ( पुण्यापासून १८-२० मैलावर ) येथें आला. तेव्हां मात्र क्षणैक शुद्धीवर येऊन मराठा सरदारांनीं त्यास गराडा घालून जेर केले व जेर होतांच निजामानें तहाचें बोलणें लाविलें. बाबूजी नाईक बारामतीकर, ( मोरोपंत कवीचे आश्रयदाते. ) गोपाळराव पटवर्धन, रामचद्रराव जाधव यांचे ह्मणणें असें पडलें कीं, " निजाम हातीं लागलाच आहे तर त्यास समूळ बुडवावा, निदान त्याचा पुष्कळसा मुलूख घेऊन त्यास खच्ची करावा. " परन्तु राघोबा व सखाराम बापू यानीं उलट २७ लक्षांचा मुलूख त्यास दिला.

विशेष नवलाची गोष्ट अशी कीं, या तहामुळें कोणत्याही ब्राह्मण किंवा मराठा सरदारास अत्यंतिक चीड आली नाहीं. सखाराम बापूला किंवा राघोबाला या मूर्खपणाबद्दल कोणी प्रायश्चित्त दिलें नाहीं. अशा अडचणीचे प्रसंगीं इतर लोक कसे वागत तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

टिपूवरील दुसऱ्या मोहिमेंत लार्ड कार्नवालीस यानें घाईनें तह उरकून घेतला व टिपूचे मुलगे इंग्लिशाकडे ओलीस ठेवण्याचे ठरलें. 'कार्नवालीसनें, टिपूचा निःपात केला नाहीं, इंग्रज लोकांची त्यानें इभ्रत राखिली नाहीं या कल्पनेनें जनरल मेडोझ् रुष्ट झाला व टिपूचे मुलगे इंग्लिशांच्या छावणींत येतांच त्यानें आपल्या मस्तकांत बंदुकीची गोळी घालून आत्महत्या केली. हें कृत्य आततायीपणाचें होतें. यांत शंका नाहीं. तथापि " **माझा देश, माझे लोक व माझ्या लोकांचें कल्याण**" ही एकच भावना त्याच्या आत्महत्येच्या मागें होती. ही भावना उत्कटतेनें असलेले इंग्लिशामध्यें अनेक मेडोझ् होऊन गेले व ह्मणूनच सातांसमुद्रापलीकडील देशांवर त्यांना राज्य

स्थापितां आलें. ब्राह्मण किंवा मराठा सरदारांपैकीं एकासही सुखासुखी २७ लाखांचा मुलूख निजामाच्या घशांत गेल्यामुळें वाईट वाटलें नाहीं. खरोखर पाहिलें तर कोणी तरी सरदारानें सखाराम बापू व राघोबा यांस गोळी घालून ठार करावयास पाहिजे होतें. पण सर्वच मिळमिळीत. किंबहुना स्वार्थी व राष्ट्रहानीची कदर न बाळगणारे ! तुपाबरोबर वरणभात बुळ-बुळीत करून खावयास सवकलेले ब्राह्मण, व मुसलमानांनीं कापून दिल्याशिवाय ‘ बोकड ’ न खातां येणारे अडाणी मराठे यांनां संकटकालीं कसें वागावें हें समजणार तरी कसें ?

याप्रमाणें एखाद्यास राग येऊन त्यानें सखारामबापू व राघोबा यांना पक्के कैद करून टाकिलें असतें, तर पुढील सर्वच कारस्थानें बंद पडलीं असतीं. हैदरचें चरित्र पाहिलें तर असें दिसते कीं, त्याच्या मार्गांत जो विघ्न करील त्याचा तो काटा काढीत असे.

सन १७६१ पासून १७६३ पर्यंतचे पुण्याकडील व्यवहार फारच गुंतागुंतीचे व भानगडींचे आहेत. त्यांचा साकल्यें करून विचार करण्याचें हें स्थल नव्हे. तथापि हैदर सारखा प्रबळ शत्रू उत्पन्न झाल्यावर व निजामही खडबडून जागा झाल्यावर मराठे दिवसें दिवस निष्प्रभ कां होऊं लागले ? जोपर्यंत बलाढ्य शत्रू उत्पन्न झाला नाहीं तोपर्यंतच राज्य कर-ण्याची मराठ्यांची व ब्राह्मणांची धमक होती काय ? त्यांमध्यें स्वार्थ विर-हित त्याग नव्हता, कीं हिंदूंचे राज्य हिंदुस्थानांत असावे ही कल्पनाच मराठ्यांत किंवा ब्राह्मणांत नव्हती ? हें स्पष्टपणें कळावें ह्मणूनच वरील हकीकत दिलेली आहे.

निजाम गेल्यानंतरही मराठे मंडळ कामाला लागलें नाहीं. सर्व हिंदुस्थान चोहोंकडून पोखरला जात होता. १७५७ मध्यें प्लासीची लढाई झाल्यामुळें बंगाल व अयोध्या हे प्रांत इंग्लिशांच्या पचनीं पडत चाललेले

होते. दिल्लीकडे नजीबखान रोहिला व जाट यांची शक्ति वाढतच होती, जयाप्पा व दत्ताजी शिंदे यानीं भरतपुर, बुंदि, कोटा वगैरे ठिकाणीं, जे मराठ्यांचे वजन बसविलें होतें तें पानपतच्या युद्धामुळें अपोआपच कमी झालें. १७५७ सालीं अबदल्लीचा मुलगा तयमूरशहा यास पंजाबांतून हाकून देऊन अटकेवर राघोबानें फडकविलेलें मराठ्यांचें निशाण १७६१ मध्येंच मुसलमानांनीं झुगारून दिलें होतें. पूर्व किनाऱ्याचे लचके इंग्लिश व फ्रेंच यांनीं तोडलेलेच होते. अंग्र्यांचा गृहकलह वाढवून पश्चिमेच्या बलाढ्य दर्यासारंगाचें बल नानासाहेब पेशव्यानीं खची करून इंग्लिशांच्या वाढत्या सत्तेला हातपाय पसरण्यास मोकळें मैदान करून दिलें होतें. म्हैसोरकडे हैदरची तरवार चमकून तिच्या तेजानें मलबार, कुर्ग, म्हैसोर वगैरे प्रांत व लहान सहान सर्व पाळेगार दिपून गेले होते. निजामासारखा हिंदुपत पादशाहीचा पक्का द्वेष्टा अगदीं पुण्याजवळच असून मराठशाहीचे तुकडे संथपणें जितके चावतां येतील, तितके चावण्यास तयारच होता. अशा प्रसंगीं सर्व ठिकाणीं काय चाललेलें आहे, याची माहीती असणारा, १७६२ सालीं निरनिराळ्या राजामध्यें होणाऱ्या संधिविग्रहांचे व जयापजयाचे परिणाम पुढील २०-२५ वर्षांचे कालांत काय होणार आहेत. हें जाणणारा, परिस्थितीच्या आकलनानंतर निघणाऱ्या अनुमानाच्या धोरणानें आदलें स्वतःचें धोरण आंखणारा व केवळ स्वार्थपरायणतेनें सर्व हिंदुस्थानभर घोडदौड करून लुटालूट व थोडीफार खंडणी गोळा करून आपली जहागीर सांभाळण्यांतच धन्यता मानणाऱ्या अनेक सरदारांना वेठीस धरून कामास लावणारा खंदा पुढारी पाहिजे होता. हिंदुस्थानच्या किंबहुना हिंदुपतपादशाहीच्या दुर्दैवानें तसा कोणीच पुढारी त्यावेळीं उभा नव्हता.

अशावेळींच पेशवाईच्या अर्ध्या वाट्याचा वाद शूर व योद्धा म्हणून गाजलेल्या राघोबानेंच उत्पन्न केला व मुत्सद्दी म्हणून साडेतीन

शहाण्यांतील एका पूर्ण शहाण्या सखाराम बापूनें तो वाढविला. समाईक छपराला चोहोंकडून आग लागली असतां चार भावांनीं तें विझविण्याचा कांहींच प्रयत्न न करितां 'अमुक एका वाशावर माझा हक्क आहे' असें भांडण करित बसणें व आपल्या डोळ्यादेखत सर्व छप्पर भस्मसात् होऊं देणें ह्यासारखाच हा खुळा वाद होता. शेवटीं राघोबा घरांतून बाहेर पडला व पुढें चुलत्या पुतण्याची घोडनदीवर लढाई झाली, तींत माधवरावानें नमते घेतलें व स्वतः राघोबाच्या स्वाधीन झाला. राघोबाच्या हातीं कारभार आल्यावर, त्यानें अनेक सरदारांस व विशेषतः पटवर्धना सारख्या राजनिष्ठास दुखावेलें. त्यांचा मिरजेचा किल्लाही घेतला. या सर्व असंतुष्ट सरदारांनीं एकत्र होऊन राघोबाची झट्दिशीं कांहींतरी व्यवस्था लावावयास पाहिजे होती. परन्तु अल्पदृष्टि, स्वार्थाचा मोह, व 'कठोर पण हितकारी' कार्य करण्यास लागणाऱ्या खंबीरपणाचा अभाव, यामुळें कांहीं सरदार राघोबास मिळाले तर कांहीं निजामाकडे गेले. निजामाला मराठ्यांचें बल कमी करावयास हवेंच होतें. त्यानें मराठा सरदारांस नाना प्रकारची आमिषें दाखविलीं, व बरेच सरदारांस आपल्या गळास गुंतविलें. व तेही खुशाल आपल्याच हिंदुपद पादशाहीवर तिलांजलि देऊन त्याच्या बाजूनें लढले.

भवानराव प्रतिनिधि, गमाजी यमाजी, पिराजी नाईक निंबाळकर गोपाळराव पटवर्धन हे सर्व सरदार निजामास जाऊन मिळले. हे सरदार निजामाकडे गेल्यावर विठ्ठल सुंदर ( निजामाचा दिवाण ) यानें सातारा व पुणें काबीज करण्याची सल्ला निजामास दिली. गमाजीचें सातारा मंडळांत वजन होतें. त्यानें निजामास सांगितलें कीं, तुह्मी साताऱ्यास चला ह्मणजे एका प्रहरांत राजा व किल्ला तुमचे हवालीं करून देतों. निजामानें जानोजी भोसल्यासही बोलावून आणिलें. निजाम व विठ्ठल सुंदर यांनीं

जानोजीस सांगितलें कीं, " आह्मी तुला मराठी राज्याचा मालक करूं " तेव्हां भोसले व निजाम यामध्यें साठचाळिसीचा तह झाला. यांत जो मुलूख व लूट मिळेल त्यापैकीं "६० भाग निजामानें घ्यावे व४० भाग भोसल्यांनीं घ्यावे" असें ठरलें. इतर मराठा सरदारांसही जहागिऱ्या व इनामें देण्याचें निजामानें कबूल केलें. त्याबरोबर एक मराठा किंवा ब्राह्मण निजामाकडे तर त्याचाच भाऊ राघोबाकडे असे सर्वजण जमीनीच्या तुकड्या करितां किंवा जहागिरी करितां "एकमेकांस मारण्या करितां" तयार झाले. घाटगे, घोरपडे, पाटणकर, पवार वगैरे शेंकडो मराठे व ब्राह्मण सरदारांच्या कुटुंबांपैकीं, भाऊभाऊही या मारामारींत कोणी निजामाकडे तर कोणी पेशव्याकडे जाऊन एकमेकांवर बंदुकीच्या गोळ्या झाडण्याच्या उद्देशानें उभे राहिले. अशी तयारी झाल्यावर निजाम थेट पुण्याचा रोख धरून चालून आला. सखारामबापू, राघोबादादा, नारोशंकर, विठ्ठल शिवदेव वगैरे मंडळींनीं निजामाशीं गनीमी काव्यानें लढण्याचें ठरविलें. निजामाचें सैन्य एक लक्षावर होतें. शिवाय जे मराठे सरदार फितूर झाले होते त्यांचें सैन्यही २५-३० हजार होते. गनीमी काव्यानें लढण्याचें ठरल्यावर चांदवड मुक्कामीं मल्हारराव होळकर होते त्यांस आणावयास विठ्ठल शिवदेव गेले, नंतर दादाचे दोन विश्वासू कारकून गेले. तिसऱ्यानदा सखाराम बापू गेले पण सुभेदार बाहेर पडताच ना. शेवटीं स्वतः पेशवे गेले. तेव्हां नवीन 'दशलक्षाची' जहागीर देण्याचे कबूल करून घेतल्यावर हा वृद्ध सुभेदार चांदवड सोडून निघाला.

उत्तर हिंदुस्थानांत अनेक स्थळीं फिरून मुसलमानी आक्रमणानें हिंदूंच्या काशीमथुरादि क्षेत्रांची काय दुर्दशा उडालेली आहे हें सुभेदारास पूण माहीत होते. पानपतीं स्वजनांची झालेली दुर्दशा डोळ्यानें पाहिलेली होती तरी हा सरदार गुळाचा खडा हातांत घेतल्या शिवाय पिकांव

शिरलेल्या जनावरांस हांकावयास न उठणाऱ्या अडाणी शेतकऱ्याच्या अडेल पोराप्रमाणें वागत होता. दक्षिण हिंदुस्थानांत डुप्ले फ्रेंच राष्ट्राचें साम्राज्य स्थापण्याच्या तयारीस लागला. त्यावेळीं फ्रान्सनें वेळोवेळीं लागणारा पैसा त्यास पुरविला नाहीं. तेव्हां डुप्ले यानें पदरचे २४ ते २८ लक्ष रुपये आपल्या राष्ट्राकरितां खर्च केलें. मल्हाररावानें पानपतची कत्तल आपल्या डोळ्यांनीं पाहिलेली होती, तरी निजामाच्या स्वारीचें अरिष्ट आलेलें पाहून दशलक्षाची जहागीर कबूल करून घेतली. या वृद्धाचें ठायीं इतकी समयज्ञता मग इतरांचे कांहीं विचारावयासच नको. होळकर निघते वेळीं मराठ्यांचे सैन्य मलकापुरास गेले होते व लुटालूट करीत चालले होते.

पेशव्यांनीं एकदम भोसले व निजाम यांच्या हद्दींत शिरून दंगा करण्यास सुरवात करावी म्हणजे आपल्या प्रदेशाचें रक्षण करण्याकरितां निजाम व भोसले यांस परत फिरावे लागेल असा कयास करून पेशव्यांनीं निजामशाहींत आणि भोसल्यांच्या प्रांतीं दंगल उडवून दिली. याचा परिणाम उलटाच झाला. इकडे भोसले वगैरे सरदारांनीं निजामास सल्ला दिली कीं, तुम्हीही पुणें व सातारा प्रांतीं शिरून पेशव्यांचा मुलूख स्वस्थपणें जाळा, लुटा व काबीज करा. पेशव्यांना जरूर असली तर ते पुण्याचें रक्षण करण्यास येतील. या सल्ल्याप्रमाणें निजामानें आपल्या सैन्याचे तीन भाग केले. एका भागाचे अधिपत्य विनायकदास [विठ्ठल सुंदरचा पुतण्या] यांजकडे, दुसऱ्याचे गमाजी बावाकडे व तिसऱ्याचे विठ्ठल सुंदरकडे होते. हे तीन भाग निरनिराळया दिशेनें मराठ्यांच्या राज्यांत घुसले. धायगुडे, भोसले व पटवर्धन वगैरे सरदारांस घेऊन स्वतः निजाम पुण्याकडे गेला. विनायकदासानें नासिक व त्र्यंबक वगैरे क्षेत्रें लुटून फस्त केली. गमाजी बाबानें वाई, गोकर्ण, भोर वगैरे लुटून जाळ पोळ केली. निजामानें १७६३च्या

मे महिन्यांत पुण्यास तंबी दिली. फरासखाना पार लुटला. शहरांतील देवळांतून जितक्या म्हणून मूर्ति सांपडल्या तितक्या छिन्न विछिन्न केल्या. मोठमोठाल्या हवेल्या जाळून टाकिल्या व कित्येक पेठांच्या पेठा जाळून टाकिल्या. तोफखान्याचे अधिकारी पानशे यांच्या वाड्यास आग लाविली. पुण्यांतील श्रीमंत लोक ठिकठिकाणीं पळाले होते पण त्यांची खडान्‌खडा माहिती असणारेच मराठे जर त्यांच्या पाठीमागे लागले होते तर ते जाणार कोठें ? पुण्यांतील या श्रीमंतांना नेमके हुडकून काढिलें जाई व मारहाण करून त्यांचा ऐवज उपटला जाई. चिंचवडच्या देवाकडून पंधरा हजार रुपये उपटण्यांत आले. १७६१ सालीं जानेवारींत अंगाला राख फांसून बोरीची पानें खाऊन पानपताहून परत आलेला नाना फडणवीस याचें सर्व वित्त लुटलें गेलें व त्याला लोहगडावरून एका बस्त्रानिशीं पळून जावें लागलें.

पर्वतीचा देवदेवेश्वर हा पेशव्यांचा आवडता देव, पण मोठा अपयशी दिसतो ! मंदिराचें काम चालू असतां १७६० सालीं भाद्रपदमासीं तेथील ओढ्यास पाणी येऊन पितृपक्षास आलेले दोन चारशे ब्राह्मण बुडून मेले. मंदिर १७६१ मध्यें पूर्ण झालें त्याच वर्षी सदाशिवराव, विश्वास राव, नानासाहेब असे पेशवे घराण्याचे तीन पुरुष मेले व जनकोजी शिंद्या सारखा उमदा वीर रणांगणावर पतन पावला. त्याच सालीं १०८० तोळे सोनें या देवाच्या कळसास चढविलें तर त्या देवानें दोन वर्षांत पुण्याची व स्वतःचीही धुळधाण उडविली. खुद्द नारायणराव पेशवा देवदर्शन करून परत जातांच त्याचा खून झाला. १७६३ सालीं विठ्ठल सुंदरा दिकांनीं ब्राह्मण मराठे सरदारांनींच या देवदेवेश्वराच्या मूर्ति फोडून त्यांतील सोनें व चांदी नेली.* पेशव्यांचा पर्वती वरील वाडा जाळला, ४०

* कांहीं इतिहासकार असें म्हणतातकीं या वेळीं देवदेवेश्वराच्या मूर्ति पुरंदरवर होत्या ह्मणून त्या वचावल्या.

हजार ब्राह्मणांस बसावयास केलेल्या धर्मशाळा जाळल्या, पुण्यांतील सर्व मोठमोठें वाडे व धर्मशाळा जाळल्या. फक्त शनवारवाडाच काय तो बचावला. अशा तऱ्हेनें निजाम व त्याच्या बरोबरचे मराठे सरदार यांनीं सर्व महाराष्ट्रभर जाळपोळ केली. उत्तर हिंदुस्थानांत १७६१ सालीं पानपतच्या कत्तलीनें तृप्ति न झाल्यानें सर्वभक्षक मृत्यूनें आपलें कराल मुख दक्षिणेकडेही उघडिलें. त्यावेळीं मराठ्यांनींही निजामशाहींत आणि भोसल्यांच्या वऱ्हाडी भागांत सर्वत्र जाळपोळ, लुटालूट व कत्तल ह्यांची कमाल केली होती. कर्नाटक, म्हैसोर व बेदनूर इकडील भागांत हैदरची तरवार चमकतच होती. अशा रितीनें निदान दक्षिण हिंदुस्थानभर तरी मृत्यूचें तांडव नृत्य चालूं झालें व सर्वत्र वणवा पेटून रयत पूर्णपणें डबघाईस आली.

पुण्याची उडालेली दुर्दशा ऐकून दादास अत्यंत क्रोध आला व त्यांनीं निजामाशीं समोरासमोर दोन हात करण्याचा निश्चय केला. पण सखारामबापू, गायकवाड व मल्हारराव हे अद्यापि समोरासमोर लढण्याची वेळ आली नाहीं असें म्हणत. तेव्हां दादांनीं बापूस शिव्यांची लाखोली वाहिली. गायकवाड व होळकर यांसही टाकून बोलले; व ह्मणाले कीं, " मरून गेलों तरी बेहेत्तर पण निजामाशीं लढाई करणारच. " दादांचा निश्चय झाला. निजामाकडे भोसले गेल्यामुळें निजाम जड झाला होता. तेव्हां जानोजीचा भाऊ मुधोजी यास सरसुभ्याचे पद व जहागिरी देण्याचे बोलणें सुरूं केलें. महादजी शिंद्यास वऱ्हाड उद्ध्वस्त करण्याचा हुकूम गेला. शिवाय निजाम व त्याचा दिवाण हे पुणें जाळल्यावर कृत्यकृत्य झाल्यामुळें जानोजीस पूर्वी प्रमाणें विचारीतनासे झाले. या कारणानें जानोजीही पुन्हां पेशव्यांच्या बाजूस येण्यास कबूल झाला.

पेशव्यांनीं इतर सरदारांचीही समजूत काढिली. भोसले कांहींतरी निमित्त काढून निजामापासून दूर झाला व दुसऱ्याही कांहीं फितूरी सरदारांची थोडी फार समज निघाली.

निजाम औरंगाबादेस जात असतांना गोदावरी उतरून जाऊं लागला नाहीं तोंच त्यास गांठून झुंज द्यावें असा विचार करून दादासाहेब जलदीनें निजामाच्या जवळ आले. शत्रूची फौज येतांच निजाम फार घाबरला. फितूर झालेले मराठे सरदार गेल्यावरही निजामाचें सैन्य पेशव्यांच्या सैन्या इतकेंच होतें किंबहुना तोफा व गारदी यांची जय्यद तयारी असल्यामुळें तो पेशव्यांना भारी होता. तथापि त्यास पलायना खेरीज दुसरा मार्ग दिसला नाहीं. राक्षसभुवन जवळ नदीस पूर आलेला असतांनाही तो निम्या फौजेसह नदीपार गेला. बहुतेक तोफाही त्यानें नदीपार नेल्या होत्या. आठ दहा तोफा, पांच सात हजार गारदी, व दहा पंधरा हजार निवडक स्वार यांसह विठ्ठल सुंदर नदीच्या अलीकडे होता. त्यांस गांठून पेशव्यानें झुंज दिली. हीच राक्षस भुवनची लढाई. यावेळीं दक्षिणतीरीं आपल्या सैन्याचा नाश निजामास डोळ्यांनीं पहावा लागला. सायंकाळपर्यंत तो कसाबसा थांबला. पण रात्र होतांच न जाणों कदाचित् मराठे आपणास गांठतील या भीतीनेंच तोफा, डेरे वगैरे जड सामान जागचें जागींच टाकून त्यानें औरंगाबादेस पोबारा केला. या युद्धांत प्रामुख्यानें असें दिसून येतें कीं, पाडाव झालेल्या १६ सरदारांपैकीं, (१) उदाजी पवार (२) जोत्याजी घाडगे (३) मालोजी घोरपडे (४) बाबूराव जंगी (५) माधवराव पिंगळे (६) रघुपतराव पिंगळे (७) बाबूराव जाधव (८) शहाजी सुपेकर (९) जयाप्पा जाधव (१०) बाजीराव पाटणकर (११) शिवराम पवार (१२) हणमन्तराव निंबाळकराचा पुत्र असे बारा जण हिंदू होते. शिवाय विठ्ठल सुंदर व विनायकदास हे मारले गेले. मुसलमानापैकीं (१) मुरादखान (२) अजमखान (३) महमद गाजीखान (४) मिर मुस्ताखान हे चौघे मुसलमान होते. म्हणजे पुण्यांतील देवळांतल्या मूर्ति फोडणारे नासिक, त्र्यंबक वगैरे क्षेत्रें लुटणारें हिंदूच होते, असें म्हणावयास हरकत

नाहीं. रघुनाथराव पेशव्यानें पैठण क्षेत्र लुटून पैसा गोळा केला होता तर रामचंद्रराव जाधवानें पंढरपूरची धुळधाण उडविली होती. रामचंद्रराव जाधवाचें तत्कालिन लेखकांनीं ' यवनाहून अधिक जाहला ' असें वर्णन केलेलें आहे. निजामाची राक्षस भुवनचे वेळीं जी घाबर-गुंडी उडाली त्यावरून स्पष्टपणें असें दिसते कीं, एकट्या निजामांत महाराष्ट्राची दुर्दशा-उडवण्याचें सामर्थ्य मुळींच नव्हतें; त्यास मराठे सरदार मिळाले व त्यामुळें हें कृत्य घडले. तेव्हां पुण्यांतील किंवा महाराष्ट्रांतील मूर्ति भंजनाचे अप कृत्याची जबाबदारी सर्वस्वी घरभेद्या ब्राह्मणावर व मराठे सरदारावरच पडते.

कांहीं लोक असें म्हणतात कीं, हा प्रसंग लढाईचा होता व म्हणून त्यांत जे वावगे प्रकार झाले त्यावरून मराठ्यांस किंवा ब्राम्हणास आपल्या देवतांची चाड नव्हती असें अनुमान काढणें योग्य नाहीं. हा मुद्दा अग-दींच चुकीचा दिसतो. दोघां भावांचें भांडण झालें म्हणून वडिलांनीं किंवा वंशजांनीं पवित्र मानलेल्या देवतांच्या मूर्तिची कोणीही अप्रतिष्ठा करण्याचे कारण नाहीं. त्या मूर्ति दोघांही भावांनीं पवित्र मानल्या पाहिजेत व आपत् प्रसंगीं त्यांचें संरक्षण केलें पाहिजे, तरच त्यांना स्वधर्माची चाड होती असें मानतां येईल. ह्या बाबतींत मुसलमान व खिस्ति या धर्माचा इतिहास काय सांगतो तें पहा. १७३९ मध्यें चिमाजी अप्पानें पोर्तुगीजांचा पूर्ण मोड केल्यावर मराठ्यांच्या ताब्यांत किल्ला देऊन गेले. तेव्हां त्यांनीं " पोर्तुगीज चर्चेसना उपद्रव देऊं नये व त्या मधील मूर्तींच्या अंगावरील दागदागिण्यास हात लावूं नये " असें एक कलम तहांत घातले होते यावरून परधर्मीय लोक आपल्या धर्मांतील देवळास कसें जपत तें दिसून येतें.

असो या लढाईच्या गर्दींत दादासाहेबांना शत्रूनें घेरलें आणि त्यांचा हत्ती वळविला. त्यावेळीं माधवराव पेशवे जवळ असलेल्या

सरदारांस ह्मणाले 'पाहातां काय' शत्रूंनीं दादांचा हत्ती वळविला. आणि तुम्ही उगीच बसतां?" तेव्हां मानकरी बोलले कीं, "आपण ज्यास हटकून मारावयास सांगाल त्यास मारूं परन्तु जें मागूं तें बक्षीस द्यावें लागेल. माधवरावांनीं बक्षीस देण्याचें कबूल करितांच महादजी शितोळे यांनीं दहा हजारांचा गांव व बसता हत्ती [खुद्द पेशव्यांचा हत्ती] याची मागणी केली व नंतर ते विठ्ठल सुंदरच्या अंबारीवर चालून गेले. ही गोष्ट मराठे मानकरी युद्धांत असतांना निव्वळ कीर्तीपेक्षां बक्षीसास किती महत्व देत व जाहागिरीकरितां किती धडपड करीत हे दाखविते. ही काय त्यांची स्वामीनिष्ठा कीं स्वार्थनिष्ठा. उलट पानपत मुक्कामीं भाऊस पैशाचा अत्यंत पेच पडला, त्यावेळीं बादशाही इमारतीच्या एका महालाला चांदीचे छत होतें. तें छत वितळवून रुपये पाडावे व सैनिकांना पगार द्यावा असा भाऊंनीं विचार केला. त्यावेळीं सुरजमल जाट "हें छत काढूं नका बादशाही इम्रतीस त्यानें धक्का बसतो, पाहिजे तर या छताच्या किमती इतके रुपये देतो" असें भाऊस विनवूं लागला. पण या स्वारींत पेशव्यांच्या पर्वती सारख्या देवस्थानास उपद्रव देऊं नका अशी कोणी ब्राह्मण किंवा मराठा सरदारांनीं विनंति केल्याचा दाखला मिळत नाहीं.

सन १७६१ ते १७६३ पर्यंतच्या वरील गोष्टी लक्षांत ठेवल्या ह्मणजे [१] या कालांत मराठे शाहीस स्थिरत्व कितपत होते व तिला निरनिराळ्या ठिकाणीं कोणते शत्रू होते [२] गृहकलह कोणत्या थराला जाऊन पोहोचले होतें. [३] देव, देवळे व धर्म यांकरितां कितीसा आत्म-यज्ञ करण्यास मराठे व ब्राह्मण तयार होते [४] युद्धें पुकारण्यास व तीं वर्षानुवर्षे चालूं ठेवण्यास पुरेसा पैसा होता कीं नाहीं [५] सालोसाल वसूल येण्यासारखी रयतेची स्थिति होती किंवा नाहीं. [६] मराठे व ब्राह्मण लढाया मारीत त्या राष्ट्राच्या अभ्युदयाच्या इच्छेनें मारीत कीं जहागिरीच्या

लोभानें मारीत या गोष्टींचे यथार्थ ज्ञान होतें. ह्यावरून हैदरचें सामर्थ्य वाढण्यास वरील परिस्थिति कशी कारणीभूत झाली तेही समजतें.

हैदरला पुण्याकडील सर्व इत्थंभूत बातमी कळतच होती. त्यानें परिस्थितीचा पूर्ण फायदा घेऊन आपलें सामर्थ्य वाढविण्याचा क्रम सुरूच ठेविला. गोपाळ हरी व विसाजीपन्त हे परत जातांच मराठ्यांचे दडपण दूर झालें. त्यानें पुन्हां थोडीफार फौज जमा करून विश्वास घातकी खंडेरावची खोड मोडण्याकरितां त्याजवर नांजनगुडेश्वर येथें स्वारी केली. पण यावेळीं हैदरचाच पराजय झाला. नंतर तो दिवाण नंदराज यास शरण गेला. त्यानें नंदराजाची नानाप्रकारें विनवणी केली व नंदराजास पुन्हां हैदरचा विश्वास पटला व त्यानें त्यास म्हैसोरच्या सैन्याचें आधिपत्य दिलें. सैन्याचें अधिपत्य मिळतांच तो पुन्हां खंडेरावावर चालून गेला. पण याही वेळीं तो पराजित झाला व त्याचाच पूर्ण नाश होण्याची वेळ आली. पराभवानें निराश न होतां खंडेरावाची पूर्ण खोड मोडण्याची हैदरनें एक नवीनच क्लृप्ति काढिली. त्यानें नंदराजाच्या सहीची बनावट पत्रें तयार केली व तीं खडेरावाच्या हाताखालील लोकांस पाठविलीं. तीं पत्रें खंडेरावाच्या हातीं पडतील अशी मुद्दाम व्यवस्था केली. ही पत्रें खंडेरावाच्या हातीं जातांच आपले अधिकारी नंदराजास फितूर झाले आहेत असा त्याचा समज झाला व पत्रांच्या खरेंखोटेंपणा विषयीं, खात्री करून न घेतां तो फितुरीच्या कल्पनेनेंच श्रीरंगपट्टणकडे पळून जाऊं लागला. हैदर ही सर्व गंमत पहातच होता. खंडेराव गेल्यावर विस्काळित झालेल्या सैन्यावर हल्ला करून तोफा, दारू गोळा वगैरे सामान काबीज केलें व खंडेरावाचें जें सैनिक त्याची चाकरी करण्यास तयार होतें त्यांस आपल्या सैन्यांत ठेवून घेतलें. नंतर कांहीं दिवसांनीं एकदम कावेरीपार जाऊन श्रीरंगपट्टणवर हल्ला केला खंडेरावाजवळ असलेल्या तुटपुंज्या

सैन्याची दाणादाण उडवून दिली. नंतर म्हैसोरच्या राजाच्या खासगत खर्चाची सोय लावून सर्व कारभार आपणावर सोपवावा व खंडेरावास आपलें ताब्यांत द्यावें अशी मागणी केली. म्हैसोरचें सैन्य दुर्बल, दिवाण दुर्बल व एकंदर सर्वच लोक दुर्बल त्यांना ही हैदरची मागणी मान्य करण्याखेरीज अन्य मार्गच उरला नाहीं. स्त्री स्वभावानुरूप म्हैसोरची राज्यश्री दुर्बलांचा वीट आल्यामुळें शौर्यवीर्यादि गुणसंपन्न अशा हैदरास पूर्णपणें वश झाली.

राजकुटुंबांतील स्त्रियांनीं खंडेरावास जीवदान देण्याकरितां हैदरची विनंति केली. खंडेरावास जिवदान देऊन पोपटाप्रमाणें सांभाळण्याचें हैदरनें कबूल केलें. असें ह्मणतात कीं, हैदरनें एक लोखंडी पिंजरा केला व त्यांत त्याला कोंडून ठेविलें आणि दररोज दूधभात खावयास देऊन त्यास मरेपर्यंत तेथेंच ठेविलें. याप्रमाणें हैदरनें खंडेरावाचा पूर्ण बंदोबस्त केला व यामुळें म्हैसोरच्या दरबारीं तो पूर्ण सत्ताधारी झाला व गृहकलह कायमचा थांबला.

निजाम सलाबतजंग याचा भाऊ बसालत जंग याकडे अडोनि प्रांताची सुभेदारी होती. त्याला मराठे गृहकलहांत गुंतले असतांना आपले प्रांताची हद्द वाढवून मराठ्यांच्या ताब्यांत असलेला सिरा प्रांत घ्यावयाचा होता. परन्तु सीरा काबीज न झाल्यामुळें तो होसकोटकडे वळला. हैदरनें बसालत जंगाशी ममलत केली व त्यास तीन लक्ष रुपये देऊन त्याजकडून सीराची नबाबी व हैदरअली खानबहादूर असा किताब मिळविला बसालत जंगास सीराची नबाबी किंवा किताब देण्याचा अधिकारही नव्हता. पण नबाबीकरितां सीरा प्रांतावर हक्क सांगण्यास व त्याकरितां युद्ध करण्यास हैदरनें एक संधि उत्पन्न करून घेतली. बसालत जंग गेल्यावर हैदरनें सीरा परगणा घेतला व चितळदुर्ग, रायदुर्ग, हरपनहल्ली, चाकापूर इत्यादि ठिकाणच्या पाळेगारांवर दहशत बसवून खंडण्या उपटल्या.

बेदनूरवर नानासाहेब पेशव्यांचा फार दिवस डोळा होता पण प्रत्यक्ष पेशव्यास किंवा कर्नाटकांतील लहान सहान पाळेगारांस त्रास देऊन त्यांजकडून खंडण्या उकळीत गस्त घालणाऱ्या मराठा सरदारांस बेदनूरवर झटकन् झडप घालून तेथील अचाट संपत्ति हस्तगत करण्याचें सुचलें नाहीं किंवा सुचलें असले तरी त्यास तें कृत्य पार पाडतां आलें नाहीं. हैदर हा काकदृष्टि असल्यामुळें त्यानें मात्र तेथील संपत्ति हस्तगत करण्याची संधि साधली.

बेदनूर हें ठिकाण अगदीं डोंगराळ मुलखांत वसलेलें होतें. तेथील नायकांनीं ठिकठिकाणीं तटबंदी करून शत्रूचा प्रवेश होणें अत्यंत दुर्घट केलें होतें. शिवप्पा नायकानें जमीन महसुलाची उत्तम व्यवस्था लावून दिल्यामुळें वसूल नियमित येत असे. बेदनूरच्या राज्याचा विस्तार सुमारें दहा हजार चौरस मैलांचा होता व सुमारें २०० वर्षें हें राज्य व्यवस्थित चाललें होतें पण या दोनशें वर्षांच्या कालांत बेदनूरच्या नायकांनीं आपल्या राज्याचा विस्तार करण्याची कांहीं खटपट केली नाहीं.

सन १७५९ मध्यें बेदनूरचा नाईक बसवप्पा मरण पावला. त्याला औरस संतति नसल्यामुळें चेन्न बसविया नांवाचा त्याचा दत्तक पुत्र होता. बसवप्पा नायकाची स्त्री विरम्माजी व्यभिचारी होती. तिनें व तिच्या प्रियकरानें दत्तकपुत्र ‘ चेन्न बसविया ’ याचा खून केला असा प्रवाद प्रचलित झाला व गादीच्या वारसा बद्दल तंटा उप्पन्न झाला एका वारसानें आपणास गादी मिळवून देण्याबद्दल हैदरास विनंति केली. अशी होण्यासारखी संधि आल्यावर १७६३ च्या प्रारंभीं हैदर सैन्य घेऊन बेदनूरकडे निघाला. वाटेंत शिमोगा येथें त्याला चार लक्ष रुपये मिळाले नंतर तो कुमशीस गेला. तेथें बेदनूरच्या माजी प्रधानास कैदेंत ठेविलें होतें. हैदरनें त्यास सोडवून बरोबर घेतलें व तो पुढें चालूं लागला. बेदनूरच्या राणीनें

परत फिरण्याकरितां पुष्कळ पैसा देऊं केला पण तिचें शब्दास हैदरनें मान दिला नाहीं. हत्तीची मोठी शिकार अटोक्यांत आल्यावर क्षुद्र जनावराकडे वनराज कशाला पाहील? बेदनूरच्या माजी प्रधानानें हैदरला सर्व बारीक सारीक माहीती पुरविलीच होती. बेदनूर जवळ गेल्यावर हैदरनें शहराच्या एका बाजूवर हल्ला करण्याचें ढोंग केलें व तेथेंच बेदनूरचें सैन्य गुंतल्यावर दुसऱ्याच एका गुप्त मार्गानें गावांत प्रवेश केला. हैदरचा प्रवेश गावांत होतांच नागरीक रानावनांत पळाले. नगर-रक्षकांनीं राजवाड्यास आग लावली पण हैदरनें ती तावडतोब विझवून सर्व मुख्य इमारतीवर व धनिकांच्या गृहांवर चौक्या बसवून व्यवस्थितपणानें लूट मिळविली. या लुटींत हैदरला कमींत कमी १८ कोट रुपये मिळाले.

बेदनूरची राणी, तिचा प्रियकर, व गादीचे वारस या सर्वांना कैदेंत टाकून तो बेदनूरचा अधिपति झाला. बेदनूरची अचाट संपत्ति हस्तगत झाली एवढेंच नव्हे तर सुमारें दहा हजार चौरस मैलांचा प्रदेश त्याच्या ताब्यांत आला. पश्चिम किनाऱ्यास मोठें बंदर करावें असा हैदरचा विचार होता पण त्याला आपला बेत आजारीपणामुळें तडीस नेता आला नाहीं.

येथपर्यंत १७६१ ते १७६३ पर्यंत पुणें आणि म्हैसोर या ठिकाणीं काय घडलें याची स्थूल हकीकत आलेली आहे. यावरून असें दिसून येईल कीं हैदरनें या कालांत १८ ते २० कोट रु. मिळविले तर जाळ पोळ व रयतेचा नाश यामुळें १८-२० कोटी रु. पुणें दरबारचें नुकसान झालें. हैदरला दहाबारा हजार चौरस मैलांचा नवीन प्रदेश मिळाला तर मराठ्यांनीं उदगीरच्या लढाईनें मिळविलेला मुलूख गमावला. शत्रूशीं लढण्याकरितां दारू गोळा हैदरनें सांचविला तर मराठ्यांनीं तो एकमेकांची टाळकी फोडण्याकरितां खर्च केला. हैदरनें गृहकलह मिटविला. मराठ्यांमध्यें तो विशेषच वाढला. हैदरचा सन १७२० पासून १७४९ पर्यंतचा २९

वर्षांच्या वयाचा काल बालपणांत व कसे तरी पोटभरण्यांत गेला. १७४९ मध्यें शिपाईगिरीस त्यानें सुरवात केली व सुमारें १४ वर्षांनीं ह्मणजे १७६३ मध्यें तो ह्मैसोरचा सर्वाधिकारी व बेदनूरचा मालक झाला; व पुढील २१-२२ वर्षे मराठे, निजाम व इंग्रज या शत्रूंशीं एकसारखा सामना देत राहिला.

९८२७२
२१-९
८१०९
२८७३१५५

# भाग २ रा

## प्रकरण १ लें

# मराठ्यांची स्वारी

### ३ रें युद्ध जानेवारी १७६४ ते जून १७६५

सन १७६३च्या ऑगस्ट महिन्यांत राक्षसभुवन येथें निजामाचा पराभव झाला. मिरजकर, पटवर्धन वगैरे मंडळींची समजूत निघाली. अशा तऱ्हेनें अंतस्थ घोटाळ्यांतून पार पडतांच पेशवे व मराठे सरदार यांचें लक्ष पुन्हां हैदरकडे गेले. हैदरनें बिदनुर काबीज करून पैसा मिळविला, एवढेंच नव्हे तर, कडप्पे, कर्नूल, अर्काट, व सावनूर येथील नबाब तसेंच रायदुर्ग, हरपनहल्ली, चित्तदुर्ग व सौंधे येथील हिंदु संस्थानिक यांजवर स्वाऱ्या करून कोट्यवधि रुपये मिळविले. गुत्तीकर मुरारराव घोरपडे हा कर्नाटकांतील फारच प्रबळ सरदार होता. पण त्याची रग हैदरनें चांगलीच जिरविली व १७६३ मध्यें तो तुंगभद्रेच्या उत्तरेस आला. गोपाळराव पटवर्धनाचा चुलतभाऊ मेघःशाम यास कैद केलें. नंतर हुलगिड, कलघटगी, श्रीमंतगड, गदग, नवलगुंद वगैरे नामांकित ठाणीं भराभर सर केली. धारवाडचा मजबूत किल्लाही घेतला. शेवटीं हैदरच्या स्वाऱ्यांचीं लाट वर्धा, मलप्रभा, घटप्रभा यांच्याही पुढें जाऊन अगदीं कृष्णातीरापर्यंत येऊन थडकली. कर्नाटकांतील एकूण एक

सरदार चळचळां कापूं लागला, एवढेंच नव्हे तर वाडीचे सावन्त, गोव्याचे फिरंगी व पेशव्यांचे विजयदुर्ग येथील सरदार हे हैदरची धाड आपणावर येणार म्हणून भयभीत झाले व दक्षिणेकडील मराठ्यांच्या सत्तेला चांगलाच पायबंद बसला.

माधवराव पेशव्यांचे वय या वेळीं २०-२१ वर्षांचे होतें. परंतु त्यांचें अंगीं कर्तृत्व फार दांडगें होतें. मराठेशाहीतील तत्कालिन शूर सरदारांस कार्याला जुंपण्याची, राज्याला बळकटी आणण्याची व शत्रूची रग जिरविण्याची धमक फक्त एकट्या माधवरावांतच होती. त्यांनीं १७६३ अखेर फौज जमवून हैदरवर स्वारी करण्याचा विचार केला व १७६४च्या मार्च महिन्यांत ते कर्नाटक पार गेले. पुण्याहून फौजा निघून म्हैसोरला जाण्यास ३-४ महिन्यांचा काल लोटला. पुढें पावसाळा सुरूं होण्यास २-२॥ महिन्यांचा कालावधि राहिला. पावसाळा सुरूं झाला कीं, मराठ्यांच्या सैन्यांतील लोक भराभर घरीं निघून जात. तेव्हां २-३ महिन्यांत पराभव व्हावा कसा ! माधवरावाचें मनांत असें होतें कीं, हैदर जर ३०-४० लक्ष रुपये खंडणी देईल तर तूर्त तह करून परत जावें व पुढील सालीं पुन्हां येऊन हैदरचें पूर्ण पारिपत्य करावें. हैदरनें खंडणी दिली नाहींच तर पावसाळ्यांत कर्नाटकांत छावणी करावी व शत्रूचा नायनाट करून परत जावें. माधवरावाची कर्तबगारी अचाट होती यांत शंका नाहीं. परंतु हैदर हा गडी किती हरदम ख्याली आहे, हें त्यांस माहित नसल्यामुळेंच हैदर खंडणी देऊन तह करील असें त्यांस वाटत असावें.

या युद्धाकरितां स्वार व पायदळ मिळून मराठ्यांची ७० हजार फौज जमा झाली. लहान मोठे अनेक सरदारही गोळा झाले. या शिवाय कित्येक हजार पेंढारी होते. मराठे आपणावर हमखास चालून येणार हें हैदरास माहीत होतेंच. मराठ्यांचे बळाचीही त्यास यथार्थ कल्पना होती

म्हणून त्यांच्याशीं झुंज कोठें व कसें द्यावें, हें त्यानें अगाऊच ठरविलें होतें. आपल्या राज्याची घडी नीट बसवून दारुगोळा व वैरण यांची त्यानें उत्तम तरतूद केलेली होती. मराठे म्हैसोरकडे येतांच त्यानें मखदुमअल्लीस श्रीरंगपट्टणच्या संरक्षणास ठेविलें. मिरफैजुल्लास १०-१५ हजार सैन्यासह धारवाडकडे रवाना केलें. मिररेझा यांस शिरें प्रांतीं पाठविलें. आणि आपण स्वतः बिदनुरकडे गेला. हैदर जवळ ३० हजार गारदी, १२ हजार कानडी प्यादे व ५० तोफा अशी सामुग्री होती. हैदरचे व त्याचे सरदारांचे एकंदर सैन्यही पेशव्यांच्या सैन्या इतकें होतें. सन १७५५ सालीं म्हैसोर दरबारची फौजदारी करणारा एक सामान्य माणूस नऊ वर्षांच्या कालांत पेशव्यांच्या बरोबरीनें चतुरंग सेना उत्पन्न करून लढाईस पुढें आला. पेशव्यांनीं आपली फौज जशी हैदरच्या प्रांतीं घुसविली, त्याप्रमाणें आपलें आरमारही होनावरकडे आणिलें. रुद्राजीराव धुळप २००-३०० मचवे व कांहीं मोठालीं लढाऊ जहाजें घेऊन होनावरला आले. या जहाजांतून ८-१० हजार पायदळही आलें. हें पायदळ जमीनीवर उतरतांच बिदनुरकर, सौंधेकर व मलबारचे नायर त्यांस मिळाले. हैदर फक्त ९ वर्षांत आरमार तरी कितीसें तयार करणार ? होनावर येथें त्याचें थोडेसें आरमार होतें पण त्याचा पेशव्यांच्या आरमारापुढें कितीसा टिकाव लागणार ? मराठ्यांच्या आरमारानें हैदरच्या आरमाराचा बहुतेक सर्व नाश केला.

हैदरनें मराठ्यांशीं समोरासमोर लढाई न करतां जंगलचा व डोंगरांचा आश्रय धरून लढावें, असें आपल्या सरदारांच्या मतानें ठरविलें. बंकापूर व धारवाड या सारखीं मजबूत ठाणीं मात्र राखावींत, पावसाळा सुरू होईपर्यंत कसे तरी दिवस काढावेत. पावसाळ्यांत मराठे परत गेल्यावर पुन्हां धुमाकुळ घालावा. पावसाळा संपल्यावर मराठे पुन्हां आलेच तर त्यावेळीं जशी परिस्थिति असेल त्याप्रमाणें वागावें, असा विचार केला.

म्हैसोरचा इतिहासकार क. विल्कस् यांनीं दोन्हीं बाजूंचीं सैन्यें किती होतीं हें सांगतांना हैदरच्या एका स्वारास पेशव्यांचे तीन स्वार होते असें म्हटलें आहे. पण श्री. खरे शास्त्री यांस क. विल्कसचें म्हणणें बरोबर वाटत नाहीं. युद्धांत प्रगट होणारे तेज सैनिकांचे संख्येवर किंवा युद्धाच्या निकालावर अवलंबून नसतें, म्हणून क. विल्कस् व श्री. खरे यांच्या सैन्याच्या संख्येच्या वादांत न शिरतां श्री. खरे यांनीं दिलेले आंकडेच वर गृहीत धरलेले आहेत.

मराठे व हैदर यांच्या सैन्याच्या नित्य चकमकी उडूं लागल्या. सावनूरच्या नबाबास हैदरनें अत्यंत त्रास दिला होता व हैदरास तो चळचळा कापत होता. त्यास पेशव्यांनीं आश्रय देऊन त्याच्या संरक्षणाची तरतूद केली. नवलगुंद, नळगुंद, जालिहाळ वगैरे अनेक ठाणीं मराठ्यांनीं घेतली. हैदरनें आपली छावणी रटेहल्ली या अत्यंत बिकट ठिकाणीं ठेविली होती. व तो तेथून सहसा बाहेर पडत नसे. झाडीच्या आश्रयानें राहणाऱ्या हैदरशीं प्रत्यक्ष झुंज करून त्याला पादाक्रांत केल्याशिवाय टिकाऊ जय मिळत नाहीं, हे माधवरावास स्पष्टपणें उमगलें. हैदर तर मैदानावरील लढाई टाळूं लागला. त्याचा हेतु असा होता कीं, प्रत्यक्ष शत्रूशीं सामना करून आपलें सामर्थ्य घटवूं नये व युद्ध पुष्कळ दिवस लांबवून पेशव्यांना पैशाच्या अडचणींत आणावें. हैदरच्या अंदाजाप्रमाणें पेशव्यांना पैशाची टंचाई चांगलीच भासूं लागली. शिपायांना दरमहा पगार द्यावा लागत नसे. तथापि गारदी, तोफखाना व इतर कारखानें यांचाच दरमहा खर्च १०-१२ लाखांचा होता. माधवरावानें राघोबास व नाना फडणविसास अनेक पत्रें लिहून पैसा मागितला. पण त्याचा उपयोग एकादशीनें शिवरात्रीकडे जावें असाच झाला.

पेशव्यानें हैदरास मैदानांत ओढण्याकरितां निरनिराळ्या हुलकावण्या

दाखविल्या. शेवटीं एकदां छावणी रक्षण करण्याचें काम मिरफैजुल्लावर सोंपवून पंचवीस हजार निवडक गारदी, कित्येक हजार स्वार व पंचवीस तोफा घेऊन तो तुंगभद्रेनजीक हरिहर पर्यंत आला. पेशव्यांना हातगड येथें बातमी लागतांच ते त्वरेनें चाल करून येऊं लागले. पेशव्यांनीं चाल करतांच तो त्वरेनें रटेहल्ली नजीक आला. तेथें त्याची आणि पटवर्धन रास्ते व विंचूरकर यांच्या फौजांची गांठ पडली. मराठ्यांच्या या लहानशा फौजेचा धुव्वा उडवावा या हेतूनें तोही जरा पुढें सरकला व आपलें बिकटस्थान सोडून ६ मैल पुढें आला. यावेळीं हैदरास मैदानांत खेचण्याचा मराठ्यांनीं बुद्धिपुरःसर प्रयत्न केला व त्यांत त्यांना यशही आलें हैदराच्या तपासावर माधवरावही सोंडूर येथें होते. त्यांस ही बातमी लागतांच तेही ३० कोस चालून रणमदानावर हजर झाले. सावनूर जवळ वर्धा नदी नजीक हैदर मैदानांत येतांच उजव्या बाजूस पटवर्धन, डावीकडे नारोशंकर, पिछाडीस विंचूरकर व तोंडावर स्वतः पेशवे असे होऊन त्यास कोंडूं लागले. हैदर हा खंदा वीर होता. चोहोंकडून मारा झाला तरी शत्रूंनीं लगट केली म्हणजे उभे राहून तोफांची मारगिरी करून त्यांस मागें रेटावें व पुन्हां आपल्या छावणीच्या रोखें चालावें असें मोठ्या शिस्तीनें तो चालूं लागला. शत्रूंनीं त्याची अगदीं दुर्दशा आरंभिली, तरी त्याचे सैन्यांत विस्कळितपणा उत्पन्न झाला नाहीं व त्यानें छावणीकडे जाण्याचा नेट सोडला नाहीं.

हैदराचे गोलंदाज फ्रेंच लोकांनीं तयार केलेले होते. त्याची दारू फार चांगली होती व तोफा जलद माराच्या व लांब पल्ल्याच्या होत्या. ( श्री. वा. खरे मराठे शाहीचा उत्तरार्ध ) मराठ्यांचीं दारू व तोफा कमी प्रतीच्या होत्या. सायंकाळचे वेळीं, माधवरावानें सर्वांनीं ' एकदम चालून जावें ' असा हुकूम दिला. त्याबरोबर हुजरातीनें बेजरब चालून

घेतले. गोपाळराव पटवर्धनही निकरानें पुढें सरला. हैदरनेंही आपली शिकस्त केली, सारें सामर्थ्य एकवटून बंदुकांचा व जेजालांचा एकच मारा सुरू केला. निकडीच्या वेळांकरितां तोफांत भरून ठेविलेल्या छऱ्यांचाही वर्षाव सुरू केला. एवंच हैदरनेंही गोळ्यांचा पाऊसच पाडण्यास सुरवात केली. यामुळें मराठ्यांचा हल्ला व्यर्थ गेला. रात्रीच्या वेळीं हैदरास तसेंच फोडून भरणें शक्य नाहीं असें माधवरावास वाटलें व त्यांनीं आपलें सैन्य गोटास आणिलें. हैदरही सुखरूप आपल्या छावणीस जाऊन पोहोंचला.

या लढाईचें वर्णन देतांना इतिहासकारांनीं असें म्हटलें आहे कीं, मराठ्यांचे माणूस ठार व जखमी मिळून ५-६० चे आंत होते. हैदराच्या तोफा जबर माराच्या व लांब पल्याच्या होत्या, दारू चांगली होती व त्यानें गोळ्यांचा केवळ पाऊस पाडला असें इतिहासकारच कबूल करतात, पण माणूस मात्र ५-५० चें आंतच ठार व जखमी झालें असें म्हणतात. हैदरचे गोलंदाज हवेंत गोळे फेकण्याइतके खास मूर्ख नव्हते. मराठ्यांचें दौडदळच फार असल्यामुळें हैदरच्या गोळ्यांचा जितका परिणाम व्हावा तितका झाला नसेल हें निर्विवाद होय. हैदर पूर्णपणें वेढला होता म्हणून त्याचें भयंकर नुकसान होणें शक्य आहे. पण मराठ्यांचे ५-५० असामीच काय ते ठार व जखमी झाले, असें म्हणून मराठ्यांच्या पुरुषार्थाचें वर्णन करण्यांतच इतिहासकार धन्य मानतात. एकतर यावेळीं हैदर सर्व बाजूंनीं कोंडला होता, चारी बाजूचे योद्धे चांगले कसलेले होते, असें असतांना हैदर आपलें सामान सुमान सांभाळून परत गेला हीच गोष्ट मराठ्यांना कमीपणा आणणारी आहे. “ मराठ्यांचें सैन्यही पुष्कळ होतें. चोहोंकडे नजरेचा पल्ला पुरेपर्यंत कोसानकोस पसरलेलें व समुद्राच्या लाटाप्रमाणें उचंबळणारे हें घोडेस्वारांचें असंख्य सैन्य आत्तांच कोठून आलें असा हैदरास विचार पडला” श्री. वा. शास्त्री खरे यांनीं केलेल्या या वर्णनावरून

मराठ्यांच्या सैन्याची कल्पना येते. मराठ्यांचे योद्धे कसलेले; मराठ्यांच्या इच्छेप्रमाणें तो मैदानावरही आला होता; तरी मराठ्यांना त्यास गारद करितां आले नाहीं; हा मराठ्यांचा कमकुवतपणाच होय.

दुसरें दिवशीं मराठ्यांचे सर्व सैन्य रटेहळी जवळ आलें. सावनूरचा नवाब व मुरारराव घोरपडे हेही येऊन मिळाले. मराठ्यांनीं तोफांचा मारा हैदरचे छावणीवर केला तर त्यानेंही आपल्या घातेऱ्यावरून तोफांचा मारा दिला. छावणी सोडून मराठे त्यास जाऊं देईनात. रटेहळीपासून अनवडीपर्यंत दाट झाडी होती व रस्ता अत्यंत अरुंद होता. त्यामार्गें हैदरला रसद मिळे. ती रसद तोडून टाकण्याचा मराठ्यांनीं प्रयत्न केला. पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. 'एके दिवशीं' रात्रीं हळूच उठून साऱ्या लष्करासह बारीमध्यें दाट झाडी आहे तींत तो शिरला आणि मायनहळी म्हणून मासुरापासून जवळच स्थळ आहे तेथें जाऊन स्वस्थ राहिला.

सेनानायकांची कुशलता, सैनिकांची शिस्त, उत्तम प्रतीचें शस्त्र व दारुगोळा या शिवाय नुसत्या शौर्यानें व अफाट सैन्यानें लढाईत यश येत नसतें. मराठी इतिहासकार या लढाईची भडक वर्णनें करून मराठ्यांनीं हैदरास धूळ चारली असें म्हणतात व मराठ्यांच्या पराक्रमाची महती गातात. पण या युद्धांत मराठ्यांचा जय खरोखर झाला कां! सन १७५५ सालचा एक फौजदार मराठ्यांच्या बरोबरीनें सैन्य गोळा करून युद्धास तयार झाला व त्याच्याशीं युद्ध करितांना मराठ्यांना निश्चित विजय संपादन करितां आला नाहीं हेंच नवल आहे. "हैदर हा प्रबळ शत्रू होता व त्याच्याशीं मराठ्यांनीं झुंज दिलें अत: एव मराठे फार कर्तबगार" असा मराठी इतिहासकारांच्या लेखनाचा मतितार्थ आहे. खरोखर पाहिलें तर असा विचार करावयास पाहिजे कीं, अनेक हिंदु पाळेगार व मुरारराव

घोरपडे यांच्या सारखा शूर पुरुष कर्नाटकांत वावरत असतांना एक सामान्य शिपाईगडी प्रचंड सेना जमवून मराठ्यांना रंजीस आणितो त्याअर्थी हिंदुसस्थानिकांत किंवा मराठे मंडळांत कोठेंतरी व कोणता तरी महत्तर दोष होता यांत शंका नाहीं. दुसरें असें कीं, समोरा समोर मैदानांत येऊन या भुजंगानें फूत्कार केला. मराठे त्यास एकसारखा ठेचण्याचा प्रयत्न करीत असतांच तो जलदीनें बाजूस निघून गेला. हैदर निघून गेला यांत त्याचें जसें कौशल्य आहे तसें त्यास निसटूं देण्यांत मराठ्यांचा बावळटपणा आहे. असो. तिसरे दिवशीं आबा पुरंदरे, विंचूरकर, सखाराम बापू, बिनिवाले वगैरे सरदार एका टेकडीवर चढून हैदरचें सैन्य कोठें असावें याचा अंदाज काढीत होते. इतक्यांत त्याजवर हैदरनें अचानक हल्ला केला. परंतु यावेळीं त्यास मराठे सरदारांनीं परत फिरावयास लाविलें.

मायनहल्ली हें डोंगरांतील एक बिकट स्थळ होतें. तेथें मराठे घोडदळाचा रिघाव होईना. लवकरच पावसाळा सुरू झाला. त्यामुळें मराठ्यांचे हाल होऊं लागलें. वैरण कोठेंही मिळेना. धान्याची अत्यंत महागाई झाली. पेशव्यांना अगोदरच पैशाची टंचाई होती. त्यांत ही परिस्थिति झाली. माधवराव पेशव्यांचें पहिल्या पासून असें मानस होतें कीं, हैदरनें तीस चाळीस लक्ष रु. खंडणी दिली तर तह करून परत फिरावें. पण हैदर हा सहजासहजीं खंडणी देणारा माणूस नव्हता. शक्य तितक्या मैदानावरील लढाया त्यानें टाळिल्या होत्या. मराठ्यांना सतत त्रासवून सोडलें, स्वतःला दाणा व वैरण यांचा पुरवठा करून व मुलूख सांभाळून चिकाटीनें लढूं लागला. मराठ्यांना आपलें सैन्य पुण्यापासून दूर न्यावें लागत असल्यामुळें खर्च भारी येई. मराठ्यांच्या सैन्यांत शिस्त बेताचीच असल्यामुळें पुण्यापासून तो थट म्हैसोर पर्यंतच्या भागांत सैन्यांच्या वर्दळीनें रयतेंत गोंधळ उडे व त्यामुळें धान्य व वैरण यांची तुटार मराठ्यांस चांगलीच भासे.

हैदर आपणांस भिऊन दडून बसतो असा अभिमान मात्र मराठ्यांस वाटे पण या पोकळ अभिमानाचा मराठ्यांस काय उपयोग ? युद्धांत एकंदरीनें मराठ्यांचेंच नुकसान भारी होई, यामुळें हैदर खंडणीचें नांव काढीना. मराठ्यांनीं लहान सहान ठाणीं पुष्कळच घेतली पण त्यामुळें युद्धाचा निकाल लागेना. तेव्हां माधवरावानें त्याच प्रांतीं छावणी करून राहण्याचें ठरविलें. हैदरास वाईट वाटलें. पण मराठ्यांच्या मुलखास व सैन्यास हरएक प्रकारें त्रास द्यावा, बिलकुल चैन पडूंदेऊं नये असा त्यानें निश्चयच केला. सावनूरकरावर हैदरचा अत्यंत रोष होता. तेव्हां सावनूरकरास एक सारखा त्रास देण्याचें काम त्यानें लालमिय्या नांवाच्या सरदाराला दिलें व त्यानेंही तें काम कसोशीनें केलें. त्यामुळें सावनूरचें रक्षण करण्यास त्यांस फार त्रास पडला. पावसाळ्याचें आरंभीं पेशव्यांच्या शिलेदारापैकीं अनेक लोक कोणाचें कांहींही न ऐकतां घरोघर निघून गेले. सावनूरच्या संरक्षणास गोपाळराव पटवर्धन राहिले होते. दंगा करून, त्यांचा पूर्ण नाश करावा असा १७७४ चे जुलै महिन्यांत हैदरनें निश्चय केला. एकदां १५ हजार गारदी, सहा हजार स्वार, व कांहीं तोफा घेऊन तो सावनूर.जवळ बंकापूर येथें हैदरचें एक मजबूत ठाणें होतें तेथें एके दिवशीं मध्य-रात्रीच्या सुमारास आला. बंकापुरास दोनचार दिवस विश्रांति घेतल्यावर तो मोठ्या पहाटेस बंकापूर व सावनूर यांच्यामध्यें असलेल्या एका ओढ्यांत सैन्य घेऊन उभा राहिला. पटवर्धनांची फौज नित्य त्या ठिकाणा-पर्यंत येत असे. नित्याप्रमाणें पटवर्धनांची फौज येथें आली ह्मणजे ती सव कापून काढावी असा त्याचा बेत होता. पण त्याच्या दुर्दैवानें पटवर्धनांस शत्रूच्या आगमनाची बातमी अगाऊ मिळाल्यामुळें त्यांचें सैन्य त्या बाजूस फिरकलेंच नाहीं. म्हणून हैदरास मात्र दिवसभर उन्हांत रखडावें लागलें. यामुळें तो अत्यंत कष्टी झाला, रात्रीं कोणाशीं बोलला

नाहीं व जेवलाही नाहीं. क्रोधानें लाल होऊन 'सावनूर जमीनदोस्त करीन' अशी त्यानें प्रतिज्ञा केली व ती शेवटास नेण्याच्या तयारीसही लागला. गोपाळरावानें पेशवे, नारोशंकर व विंचूरकर यांस तातडीनें बोलाविलें. हे सर्वजण तातडीनें सावनूरकडे आले तों हैदर पुन्हां अनवडीच्या झाडींत जाऊन बसला.

हैदरनें नंतर तहाचें बोलणें लाविलें. तहाची वाटाघाट दीडमहिना चालली होती पण हैदर पेशव्यांचा घेतलेला मुलूख सोडण्यास किंवा खंडणी देण्यास तयार होईना. हैदर आम्हांस भिऊन झाडींत लपतो असा मराठ्यांस अभिमान वाटे. पण भिऊन दडून बसणारा शत्रू घेतलेला मुलूख परत देण्यास किंवा खंडणी देण्यास मात्र तयार होईना. शेवटीं तहाचें बोलणें बंद पडलें. मराठ्यांना हरतऱ्हेनें त्रास देण्याचा हैदरचा क्रम चालूच राहिला. विंचूरकर वगैरे सरदार सावनूरजवळ होते. हैदरच्या लहानमहान टोळ्या निरनिराळ्या ठाण्यावर येऊन घाले घालीत व त्यांस हुसकून देतां देतां मराठे सरदार बेजार होत. मराठ्यांत नानातऱ्हेच्या कंड्या पिकूं लागल्या. कोणी म्हणे हैदर अमुक ठाण्यावर अचानक हल्ला करणार आहे, कोणी म्हणे तो अमुक शहर लुटणार आहे. कोणी म्हणे कीं, अमुक दिवस पुरण्या इतक्या भाकऱ्या करून त्यानें सैन्यांत वाटल्या आहेत व तो अमुक तालुका लुटण्यास निघणार आहे. मराठ्यांच्या सैन्यांत वरील प्रकारच्या बातम्या उठत यावरून हैदरच्या हालचाली बद्दल मराठ्यांस किती अगाध ज्ञान असे व हैदरची त्यांनीं किती दहशत खाल्ली होती हें स्पष्टपणें दिसून येतें.

सावनूरकरांचें हावेरी म्हणून एक ठाणें होतें, तें हस्तगत करण्याकरितां हैदरनें एक युक्ति केली. त्यानें आपल्या लोकांजवळ एकदां शिंदी दिली व त्यांस हावेरीस पाठविलें. या शिंदी विकणारांनीं ती मराठे सैनि-

कांना अत्यंत स्वस्त दरानें विकली. शिंदी स्वस्त मिळाली म्हणून मराठ्यांनीं तीं पखालींच्या पखाली पिऊन टाकली व नंतर बेहोष झाले. त्याच रात्रीं मिरफैजुल्लानें पांच हजार स्वार, आठ हजार गारदी व सोळा तोफा यासह रातोरात मजल मारली व पहाटेच्या वेळीं ठाण्यावरील झिंगलेल्या लोकांस कापून काढिलें व कैद केले.

दुसरें दिवशीं प्रहर दिवसास ही बातमी विठ्ठल शिवदेव यांस कळाली. ते लागलीच स्वार होऊन निघाले. पण तो दिवस पितृपक्षांतील असल्यामुळें अनेक शिलेदार त्यांजबरोबर जाऊं शकले नाहींत. तथापि जेवढे लोक आले त्यांस बरोबर घेऊन हा सत्तर वर्षांचा द्रोणाचार्य किंवा हिंदी हिंडेनबुर्ग त्वरेनें निघाला व रास्ते व भोसले यांस त्वरेनें येण्याबद्दल सांगितले. हावेरी जवळ मराठे सरदार येतांच शत्रूनें, तोफा, बाण व बेजाला यांचा भयंकर मारा केला. यामुळें मराठ्यांस मागें हटावें लागलें. मराठे जरा मागें सरतांच शत्रूनें जोरानें चाल केली पण त्याच्या सैन्यांत जरा विस्कळितपणा आला. याचा फायदा घेऊन मराठ्यांनीं एका मागून एक असे नऊ हल्ले केले व शत्रूस मागें रेटले. दोन्ही पक्ष निकरावर येऊन लढूं लागले. हैदरचा पायदळावरील सरदार बंगष यानें मराठ्यांवर बेजरब चाल केली. बंगष मारला गेला तरी त्याचें सैन्य शर्थीनें लढतच राहिलें. शेवटीं सायंकाळीं दोन्हीं सैन्यें विश्रांतिकरितां एकमेकां जवळच तळ देऊन राहिलीं. हावेरी घेण्याचा बेत या लढाईनें फसल्यामुळें दुसरें दिवशीं हैदरचे लोक परत फिरले व मराठेही सावनूरकडे निघून गेले. विठ्ठल शिवदेव म्हातारा होता तरी त्यांनीं वीस मैलांची मजल मारून सतत दोन प्रहर पर्यंत युद्ध केलें. २१ से. १७६४ त्यादिवशीं एकादशीचा दिवस असतांही त्यांनीं संध्याकाळपर्यंत आपलें काम उपाशीं राहूनच केलें, " राष्ट्रांत युद्ध चालूं असलें म्हणजे रणगीतानें प्रजा वज्रदेही बनवें. साहस

कल्पकता, दीर्घोद्योग इत्यादि गुणांची वाढ होते तर राष्ट्रांत स्मशान-शांतता नांदत असतांना प्रणयगीतानें प्रजा निःसत्व बनते." हा सिद्धांत विंचूरकरांच्या उदाहरणावरून स्पष्ट होतो.

नोव्हेंबर १७६४ मध्यें पेशव्यांनीं धारवाडचें मजबूत ठाणें घेतलें. व नंतर हैदरची छावणी अनवडीस होती तेथून त्यास हुसकून काढण्याचा मराठ्यांनीं प्रयत्न केला. पुण्याहून व इतर ठिकाणांहून दारुगोळा आणिला. जंगली रस्ते चोखाळणारे व जंगल तोडणारे लोक तयार केले. जंगल तोडण्याकरितां कुऱ्हाडीचाच एक कारखाना काढला होता असें ह्मणतात. नोव्हेंबर १७६६ मध्यें मराठ्यांचें सैन्य अनवडी पासून ७ मैलावर आलें. हैदरच्या तिन्ही बाजूस दाट झाडी होती. मराठ्यांनीं आपल्या तोफा उंच टेकड्यांवर चढवून छावणीवर मारा सुरूं केला. तोफा लांब पल्ल्याच्या व जागा उत्तम माऱ्याची असल्यामुळें हैदरच्या छावणींत आगीचा कहर उसळला; पण अशाही बिकट परिस्थितींत तो यत्किंचित्ही डगमगला नाहीं. त्यानें पांचसात हजार गारदी, हजार पंधराशें स्वार व पांच तोफा यांसह मराठ्यांच्या तोफावरच सरळ चाल करून जाण्याचें ठरविलें. छावणी जवळ मिरफैजुल्लास ठेवून तो एकदम झाडीच्या बाहेर पडूं लागला. झाडीच्या तोंडाशीं येईपर्यंत तो कोणाच्याच दृष्टीस पडला नाहीं. अकस्मात् प्रगट होऊन त्यानें सरबत्ती सुरूं केली. गारद्यांनीं बंदुकांचा पराकाष्ठेचा मारा सुरू केला. यामुळें विंचूरकर व पटवर्धन यांच्या फौजानीं पळ काढला. मुरारराव घोरपड्यांची फौज मात्र जागा धरून कायम उभी राहिली. यावेळीं माधवराव टेकडीच्या पायथ्याशीं होते. ते हुजुरातीनिशीं धांवत आले. नंतर मुरारराव घोरपडे, पटवर्धन, विंचूरकर, व पेशवे या सर्वांनीं मिळून सरसेहोलपट सुरूं केली. हैदरनें आपल्या बरोबर थोडे लोक घेतले होते, त्याच्या तोफा अवघ्या पांचच होत्या, शिवाय त्याला

खालून वर जावयाचें होतें. या सर्व गोष्टी त्याला प्रतिकूल होत्या. मराठ्यांच्या तोफा जास्ती व लांब पल्याच्या होत्या, ते उत्तम माऱ्याच्या ठिकाणीं होते. मराठे सरदारांनीं एकच जोर केल्यावर हैदरला युद्धांतून पाय काढणें भागच पडलें. व त्याचें सैन्य पळूं लागलें. यावेळीं हैदरचे दोन हजार गारदी ठार झाले व पांचही तोफा, तीन हजार बंदुका व सातशें घोडीं मराठ्यांच्या हातीं लागलीं. या युद्धांत मराठ्यांना कांहीं यश आलें तें या वेळींच. पण "मराठे टेकडीवर असतांना हल्ला चढवावा असें हैदरास कां वाटलें, ? यशापयशाचा त्यानें विचार केला कीं नाहीं, ?" या गोष्टीबद्दल आज कांहींच सांगतां येणार नाहीं व अशा गोष्टीबद्दल शांततेच्या काळांत, दहा वीस पुस्तकें व शेंदोनशें जुनीं मोडीं पत्रें गोळा करून पुस्तक लिहिणारांनीं तर त्याबद्दल बरें किंवा वाईट कांहींच लिहूं नये. तथापि एक गोष्ट मात्र निश्चित दिसते ती ही कीं, कितीही बिकट प्रसंग आले तरी हैदर डगमगत नसे व कसल्याही प्रकारच्या धोक्यांत आपला जीव घालण्यास तो कचरत नसे. भीतीची यत्किंचितूही झळ जर त्याच्या मनास लागती तर त्यानें हा हल्ला चढविलाच नसता. असो. दुसरे दिवशीं, माधवरावानें सारें लष्कर अनवडीस हैदरच्या छावणीजवळ आणिलें. छावणीच्या तिन्हीं बाजूस दाट झाडी असून फक्त उत्तरेचें तोंड मोकळें होतें. छावणीची जागा अत्यंत बिकट होती. मराठे जर छावणीवर हल्ला करिते तर हैदरचा फारच नाश झाला असता व त्यालाही हल्ल्याची भीति वाटत होतीच. पण मराठ्यांनीं त्यास कोंडण्याचा प्रयत्न केला. बिदनूरकडून धान्याचा पुरवठा होत होता तो बंद केला, त्यानें पळून जाऊं नये म्हणून रस्त्यावर मोठमोठालीं झाडें तोडून आडवीं घातलीं व चोहोंकडून छावणीवर तोफांचा मारा सुरूं केला. परन्तु अशाही आणीबाणीच्या प्रसंगीं न डगमगतां, तोफा, पायदळ, तंबू, राहुट्या वगैरे सर्व सामान घेऊन तो बिदनूरा-

कडे चालला. दाट झाडी असल्यामुळें मराठ्यांच्या घोडदळाचा उपाय चालेना. पिछाडीवर मराठे एकसारखे घाले घालीत. तथापि मोठ्या शिस्तीनें तो दोन दिवस पुढें चाललाच. तिसरे दिवशीं पेशव्यांनीं आपल्या सैन्याची एक तुकडी बिदनूरच्या वाटेवर ठेविली व पुढून आणि मागून अशी हैदरची लांडगे तोड चालविली. हैदरच्या सैन्याची फारच नासाडी झाली. हैदरची हजारो उंटे व घोडी, बंदुका आणि तोफांही मिळाल्या व कत्तलींत हजारो सैनिक कापले गेले. मराठे व हैदर यांच्या ज्या चकमकी झाल्या त्यांत हैदरचे चिकाटी, साहस व चापल्य हे गुण माधवरावाच्या चांगलेच नजरेस आले तसेंच सर्व सरदारांस ताब्यांत ठेवण्याची शक्ति-दूरदृष्टि, व सेनानायकत्व हे गुण तरुण पेशव्याच्या अंगीं किती उत्कट, तेनें वास करितात याची साक्ष हैदरास पटली.

असो कर्नाटकांत ही धुमश्चक्री चालू असतांना दादासाहेब नाशिकांत होते. त्यांचे चित्त स्वस्थ नव्हतें. ते नाशिकांत बसून पेशवाईचें पिंड पाडण्याची तयारी करितील अशी माधवरावास भीति होती. नाशिकांत बसून माशा मारण्यापेक्षां स्वारीवर जाऊन सर्व कारभार हातीं घ्यावा व पुतण्याच्या लौकिकांत भागदारी व्हावें असाही विचार त्यांच्या मनांत येत असे. राघोबानें आपल्यामागें कांहीं भानगड करूं नये म्हणून माधवरावानें त्यास स्वारीवर बोलाविलें व सर्वाधिकार देण्याचें कबूल केलें. माधवरावांचे म्हणण्याप्रमाणें दादासाहेब कर्नाटकांत गेले. त्यांचे मागून दादांचा तोफखाना महिपतराव पानशे यांजबरोबर गेला. नंतर दमाजी गाइकवाड गेले पण खेदाची गोष्ट अशी कीं, या तिन्ही गृहस्थांचें लष्करानें मिरज वगैरे प्रांतीं रयतेस मनस्वी त्रास दिला. मराठ्यांचें लष्कर निरनिराळ्या प्रांतांतून जातांना अनेकदां धिंगाणा घालीत जात असे, त्यामुळें तेथील रयत रंजीस येई. ते प्रांत उजाड होत. ह्यामुळें अखेरीस त्यांनाच दाणा वैरणीच्या

अडचणी उत्पन्न होत.

बिदनुरास पळून गेल्या नंतर हैदर स्वस्थ बसला नाहीं. निराशा त्यास ठाऊकच नव्हती. सर्व तऱ्हेनें मोड झाल्या नंतर पुन्हां जमवाजमव करून सामन्यास उभें राहणें हें त्याच्या अंगवळणीच पडलें होतें. बिदनुरास तो फारच थोड्या लोकांनिशीं गेला होता पण तेथें जाऊन पोहोचतांच त्यानें पांगलेली फौज गोळा करण्यास सुरवात केली. एकीकडे फौज गोळा करण्याचें काम चालू ठेविलें व दुसरीकडे तहाचें बोलणें लाविलें. परन्तु पेशव्यांना अनुकूल असा तह करण्यास हैदर तयार होईना तेव्हां युद्ध सुरूच राहिलें. मराठ्यांनीं होनहल्लीचें मजबूत ठाणें घेतलें. नंतर दादासाहेब आल्यावर त्यांनीं युद्धाची जबाबदारी अंगावर घेतली. सैन्याचे तीन विभाग करून तीन निरनिराळ्या वाटांनीं बिदनूरवर चाल करण्याचें ठरलें व याप्रमाणें बिदनूर पासून २० मैलावर पेशव्यांच्या फौजा येऊन ठेपल्या. तेव्हां मात्र पुढील आपत्ति टाळण्याकरितां हैदर तह करण्यास तयार झाला.

हैदरशीं तह करितांना तो हैदरला फारसा जाचक होऊं नये अशा प्रकारची दादासाहेब, सखाराम बापू, नारोशंकर यांची मनोवृत्ति होती. * पेशवाईला कोणीतरी शत्रू असला तरच आपलें महत्व टिकेल म्हणून शत्रूचा पूर्ण उच्छेद करूं नये अशा वृत्तीनें कांहीं सरदार वागत असत. पुढें मागें पुतण्याशीं तंटा करण्याचा प्रसंग आला तर निजाम, हैदर वगैरेंची मदत मिळावी म्हणून दादासाहेब हैदरास

* पानपतचे युद्धाचे अगोदर दत्ताजी शिंदे नजीबखानाचें पूर्ण पारिपत्य करण्यास उद्युक्त झाले असतांना मल्हारराव होळकरांनीं त्यास असा सल्ला दिला कीं. "एवढा काटा जतन करा. नाहींतर पेशवे आपणांस धोतरे बडवावयास लावतील."

विशेष दुखविण्यास तयार नव्हते. अशी परिस्थिति असतांना तह झाला. अर्थात हा तह माधवराव व पटवर्धन सरदार यांस फारसा पसंत पडला नाहीं. तथापि गृहकलह वाढूं नयेत ह्मणून पुढील अटीवर त्यानीं तो मान्य केला.

या तहानें ( १ ) हैदरनें मराठ्यांचा घेतलेला मुलूख परत करावा व त्यास पुन्हां त्रास देऊं नये. ( २ ) बत्तीस लक्ष रु. खंडणी द्यावी. ( ३ ) सावनूरचा नबाब व मुरारराव घोरपडे यांचा घेतलेला मुलूख परत द्यावा व त्यांस पुन्हां उपद्रव देऊं नये.

सन १७६४ जानेवारी पासून १७६५ च्या जून पर्यंत युद्ध चालून त्याचा शेवट वरील प्रमाणें झाला. पेशव्यास नवीन मुलूख मिळाला नाहीं. मराठ्यांचा शिऱ्याचा सुभा हैदरकडेच राहिला. बिदनूरचें मुख्य नाकें बसवापट्टण हेंही त्याजकडेच राहिलें. अठरा महिन्यांच्या कालांत तोफखाना व इतर कारखाने यांजकरितां पेशव्यांचे दोन कोट रु. तरी खर्च झाले. खंडणी फक्त बत्तीस लक्षच मिळाली. पुण्यापासून ह्मैसोर पर्यंतचा भाग सैन्याच्या वर्दळीनें खराब झाला. हैदरचे या लढाईंत मनस्वी नुकसान झालें. रट्टेहळ्ळी व अनवडी या लढायांत त्याच्या सैन्याची बाताहत मनस्वी झाली.

तह झाल्यानंतर जिंकलेल्या मुलखांत स्वस्थता राखण्याकरितां दहा पंधरा हजार सैन्यासह गोपाळरावास कर्नाटकांत ठेवून पेशवे पुण्यास गेले.

# प्रकरण २ रें

# मलबारवर स्वारी.

## १७६५ ते १७६६ जून

तह झाल्यावर मराठ्यांचें सैन्य पुण्याकडे आलें व १७६५ च्या जून पासून १७६६ जून पर्यंत घरगुती बखेड्यांत, प्रतिनिधींचा दंगा मोडण्यांत व भोसल्यावर स्वारी करण्यांत पेशव्यांचें बल खर्ची पडलें. याचवेळीं उत्तरेंत जाट, रोहिले व रजपूत राजे मराठ्यांच्या मुलखास उपद्रव देत होते. त्यांच्या बंदोबस्ताकरितां राघोबा सैन्य घेऊन गेले व त्यांनीं जून १७६६ मध्यें काल्पीस जाऊन मुक्काम केला.

पेशव्यानीं दीड वर्ष सतत मेहनत घेऊन हैदरास हैराण केलें. तेव्हां तो जरा स्वस्थ बसला असेल असें वाटण्याचा संभव आहे. पण हैदरचा स्वभाव स्वस्थ बसण्याचा नव्हता. मराठ्यांच्या स्वारीमुळें म्हैसोरच्या कांहीं भागांत लहान सहान बंडे झालीं होतीं तीं मोडून त्यानें शांतता प्रस्थापित केली व लागलीच मलबारवर स्वारी करण्याचें ठरविलें. कनानूरचा सुभेदार अलीराजा हा कोलत्तिरीच्या राजाचा मांडलीक होता. त्याला स्वातंत्र्य मिळविण्याची इच्छा झाल्यामुळें त्यानें हैदरास मदतीस बोलाविलें. पालघटच्या राजाला हैदरनें मदत करूं नये म्हणून झामोरिननें १७५७ सालीं हैदरास मोठी रकम देण्याचें कबूल केलें होतें. तेव्हां झामोरिनकडे असलेली बाकी उगवण्याकरितां व अलिराजास मदत करण्या करितां म्हणून त्यानें मलबारवर स्वारी केली. मलबारांत घुसतांना दाट झाडी असल्यामुळें हैदरच्या सैन्याचे अत्यंत हाल झाले. नायर लोकांनींही वाटेंत

अत्यंत शौर्यानें व चिकाटीनें हल्ले चढविले यामुळें सैन्याची फारच खराबी झाली. तथापि सर्व प्रकारचीं संकटें भोगून हैदर कालिकत येथें येऊन पोहोंचला. झामोरीन लागलीच शरण आला व हैदरनेंही त्यास सन्मानानें वागविलें व चार लक्ष रुपये खंडणी ठरली. परन्तु पुढें हैदरास झामोरीन हा कपटानें वागत आहे असा संशय आला व झामोरिननेंही खंडणी देण्यास उशीर लावला. लागलीच हैदरनें कालिकतचा ताबा घेतला व झामोरीन आणि त्याचा प्रधान यांस कैद केलें व प्रधानाला चांगलीच तंबी दिली. त्याबरोबर भेदरून झामोरीननें अप्रतिष्ठा टाळण्याकरितां अग्निकाष्ठ भक्षण केली. कोचीन व पालघट येथील राजे तावडतोब हैदरास शरण आले. नंतर कालिकतच्या किल्ल्याची मजबुती करून तो कोइमतूरकडे परत आला. हैदरची पाठ फिरून तीन महिने झाले नाहींत तोंच नायर लोकांनीं बंड केलें. हैदर पुन्हां मलबारांत उतरला. नायर लोकांनीं हैदरला अगदीं कैचींत धरलें, धड परत फिरतां येईना व पुढेंही जातां येईना. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळें जिकडे तिकडे नद्या नाले तुडुंब भरून वाहूं लागले. पण अशा सर्व संकटांस न जुमानतां तो पुढें चालूंच लागला. कित्येकदां गळ्या इतक्या पाण्यांतून नद्या ओलांडून सैन्यास घेऊन गेला. सर्व प्रकारच्या संकटांशीं धैर्यानें तोंड देऊन त्यानें नायरांचा पूर्ण पराभव केला. बंडांतील प्रमुख नायरांना पकडून त्यांचा शिरच्छेद केला. व हजारो लोकांना मेंढरांच्या कळपाप्रमाणें म्हैसोरच्या पठारावर हाकून आणिले. त्यापैकीं कित्येक हजार लोक अन्नान्न करून मेले. अशा तऱ्हेनें मलबारांत कहर उसळवून हैदर परत आला.

८५६०

# प्रकरण ३ रें

# मराठ्यांचें युद्ध ४ थें

( जून १७६६ ते जून १७६७ )

म्हैसोरचा राजा चिक्कृष्णराय हा सन १७६६ मध्यें मरण पावला. तेव्हां कृष्णरायचा वडील मुलगा नंदराज यास हैदरनें गादीवर बसविलें. नंदराज हा स्वतः अधिकार चालवूं लागला. लागलींच हैदरनें नंदराजाची खासगत मिळकत जप्त केली, राजवाडा लुटला व राजाचें सर्व अधिकार आपणाकडे घेतले.

माधवराव पेशव्यांस १७६५ मध्यें झालेला तह पसंत नव्हताच. शिवाय ते पुण्याकडे फिरल्याबरोबर हैदरनें म्हैसोरच्या राजाला केवळ नामधारी बनविलें चित्रदुर्ग वगैरे संस्थानिकांकडून खंडण्या उपटण्याकरितां स्वाऱ्याही केल्या. तेव्हां हैदरचा पूर्ण पराभव करावा या हेतूनें माधवरावानें स्वारी करण्याचा निश्चय करून फौज जमविली, व पटवर्धन सरदारांस १७६६ च्या आक्टो-बर मध्यें ( दसरा झाल्याबरोबर ) डेरे दाखल होण्याबद्दल ताकीद दिली. हैदरनें लागलीच आपल्या पुणें दरबारच्या वकीलामार्फत तहाचें बोलणें लाविलें. माधवरावांचें म्हणणें असें पडलें कीं, " शिऱ्याचा सुभा परत द्यावा, मुरारराव गुत्तीकरास त्रास देऊं नयें व त्यांची घेतलेलीं ठाणीं परत द्यावीं, चित्रदुर्गकर, रायदुर्गकर वगैरें कडून खंडण्या घेऊं नयेत व गेल्या दोन वर्षांची मिळून पाऊण कोट रुपये खंडणी द्यावी. " हैदरचें म्हणणें असें पडलें कीं, " शिऱ्याचा सुभा वास्तविक माझाच आहे. तो तुह्मी मागूं नये. दुसरें असें कीं ज्या संस्थानिकांकडून मी खंडणी घेतली ती शिऱ्याच्या

अमलाखालील आहेत, तेव्हां त्यांच्या कडून खंडणी घेण्यांत माझें गैरवर्तन घडलेंच नाहीं. मुराररराव गुत्तीकर आह्मांस नेहेमीं त्रास देतो तेव्हां त्याला जरबेखालीं ठेवण्याकरितां त्याची ठाणीं घेणें भागच पडलें." एवंच शिरा सुभा मजकडे राहूं द्या, मला खंडणी घेऊं द्या, मुराररावास हळूहळू दाढेखालीं रगडूं द्या म्हणजे बारा लक्ष रुपये खंडणी देतो. पेशवे व हैदर यांच्या बोलण्यांत पूर्व पश्चिमचें अंतर पडल्यामुळें माधवरावास स्वारी करण्याखेरीज दुसरा मार्गच उरला नाहीं.

हैदरला पेशव्यांशीं आपणांस युद्ध करावें लागणार हें निश्चित माहीत असल्यामुळें त्यानें युद्धाची पूर्ण तयारी केली होती. मागील युद्धांत पेशव्यांनीं आपलें अतोनात नुकसान केलें आहे हें तो पूर्णपणें जाणत होता. परन्तु अगदीं जेरीस आल्याशिवाय कधीं हीं नम्र व्हावयाचें नाहीं, अगदीं आणी बाणीची वेळ आलीच तर थोडें वाकावयाचें, शत्रू जरा दूर गेला कीं, लागलीच धुमाकूळ घालावयाचा, अशी त्याची वागण्याची तऱ्हाच होती. समोरासमोर लढाई करावयाची नाहीं, चोरटे हल्ले सतत चालू ठेवावयाचे व शत्रूला अन्नपाणी मिळूं द्यावयाचें नाहीं, असा त्यानें निश्चय केला. मराठे येण्यापूर्वींच त्यानें ठिकठिकाणीं तळीं फोडून कोरडी ठणठणीत करून टाकलीं, विहिरींतून व ओढ्यांतून विष टाकलें व निवडुंग टाकून पाणी खराब केलें. मराठ्यांच्या वाटेवरील गांवें व शहरें उठवून तेथील लोकांस सुरक्षित ठिकाणीं नेलें, धान्य व वैरण नेली, जो माल नेतां आला नाहीं त्यास आग लावून दिली. कांहीं ठिकाणीं धान्य पुरून ठेविलें व अशा तऱ्हेनें कित्येक मैलपर्यंत मुलूख उजाड करून टाकला. बेंगरूळ, बिदनूर व शिरें या ठिकाणीं उत्तम बंदोबस्त केला व आपण स्वतः श्रीरंगपट्टण येथें राहिला.

माधवरावानें रास्ते, पटवर्धन, धायगुडे, सखारामबापू, महिपत

राव चिटणीस, अक्कलकोटकर भोसले, मुधोळकर, नरगुंदकर भावे, वगैरे अनेक लहान मोठे सरदार बरोबर घेण्याचें ठरविलें. घोडदळ, पायदळ व तोफखाना यांची तरतूद उत्तम केली व दसऱ्यानंतर मुंढव्यास जाऊन डेरे दिले.

जेजुरी, थेऊर, वगैरे ठिकाणच्या यात्रा करण्यांत सुमारें एक महिना घातल्यावर पेशवे म्हैसोरकडे निघाले. वाटेंत ठिकठिकाणीं खंडण्या उकळीत फेब्रुवारींत शिऱ्यास जाऊन वेढा दिला.

हैदरनें आपला मेहुणा मिररेझा यास आठ हजार गारदी, दोन हजार पायदळ, दोन हजार घोडेस्वार व कांहीं तोफखाना देऊन शिऱ्याच्या संरक्षणास ठेविलें होतें. पेशव्यांनीं शिऱ्यास वेढा देऊन तें बळकट ठिकाण घेतलें. नंतर मदागिरीचा किल्ला घेतला. तेथें बेदनूरची राणी व गादीवर वारसा सांगणारा तोतया असे दोघेजण कैदेंत होते. ते पेशव्यांस सांपडले. पेशव्यांनीं देवनहल्ली, होसकोटें, कोलार वगैरे अनेक ठाणीं भराभर घेतलीं. मागील युद्धांत ज्या प्रमाणें रट्टेहल्ली, अनवडी वगैरे ठिकाणीं जोराच्या चकमकी घडल्या तशा या युद्धांत घडल्या नाहींत. याचें मुख्य कारण असें दिसतें कीं, या वेळींच इंग्रज व निजाम यांचाही हैदरशीं युद्ध करण्याचा बेत होत होता. तेव्हां एकाच वेळीं पेशवे व निजाम यांच्याशीं युद्ध करण्याची पाळी येऊं नये, म्हणून हैदर पेशवे सांगतील त्या अटीवर तह करण्यास तयार झाला. पेशव्यांनांही इंग्रज व निजाम यांच्या मदती शिवाय आपण हैदरास नरम केलें हें यश पदरांत पाडून घ्यावयाचें होतें. या कारणांनीं १७६७ सालच्या एप्रिलमध्यें तह झाला. या तहानें असें ठरलें कीं, ( १ ) एकमेकांनीं एकमेकांचा घेतलेला मुलुख परत द्यावा. ( २ ) हैदरनें मुराररा व इतर संस्थानिक यांस त्रास देऊं नये. ( ३ ) मराठ्यांस ३२ लक्ष रु. खंडणी द्यावी, पैकीं १६ लक्ष रु. रोख द्यावे व बाकीचे सोळा लक्ष हप्त्याहप्त्यांनीं द्यावे. ( ४ ) कोलार ही हैदरची जन्मभूमि,

व तेथें त्याच्या बापाची कबर होती म्हणून तें ठिकाण त्याजकडे रहावें. (५) मराठे जर निजामाचें मन वळवून त्यास हैदरवर स्वारी न करितां परत पाठवितील तर त्यांस आणखी साडेसोळा लाख रुपये द्यावे. या प्रमाणें तह करून पेशवे परत फिरले.

या तहाचा बारकाईनें विचार केला तर असें दिसतें कीं, या तहानेंही मराठ्यांस मोठासा फायदा झाला नाहीं. पेशवे परत फिरले कीं, लागलींच पेशव्यांचा मुलूख बळकावण्याचा प्रयत्न करणें, संस्थानिकांकडून खंडण्या उपटणें हें हैदर नेहमींच करित असे. पेशव्यांची स्वारी आली म्हणजे मीं अमूक करणार नाहीं असें म्हणावें व पेशवे दूर गेलें कीं पूर्वीचा उद्योग सुरूं ठेवावा. हैदरनें अनेक संस्थानिकांकडून खंडण्या उपटल्या होत्या, बेदनूरची अचाट संपत्ति हस्तगत केली होती, मलबारवर धाड घालून पुष्कळ पैसा उकळला होता; तेव्हां ३२ लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल करण्यानें त्याचें बल यत्किंचित्‌ही कमी झालें नाहीं. कोलार हें ठिकाण हैदरची मर्जी राखण्या करितांच त्याजकडे ठेवण्यांत आलें. एकंदरींत या स्वारीनें हैदरचें बळ यत्किंचित्‌ही कमी झालें नाहीं. बत्तीस लक्ष रुपये खंडणी घेण्यानें पेशव्यांचा नुसता जाण्यायेण्याचा खर्चही भागला नाहीं. पेशवे ब्राह्मण अल्पसंतुष्ट असत, स्वतःचा खर्च किती झाला याचा अंदाजही तें करीत कीं नाहीं कोण जाणे. ही मराठ्यांची ३ री स्वारी. तरी दर वेळीं ३०-३२ लक्षांपेक्षां अधिक मिळकत नाहीं, व खर्च मात्र त्यापेक्षां जास्त अशा रीतीनें हैदरशीं सतत झुंजण्यांत मराठ्यांचें सांपत्तिक बळ एकसारखें कमी होत चाललें.

# भाग २ रा

## प्रकरण ४ थें

# इंग्रजांशीं १ लें युद्ध

## इसवी सन १७६७–१७६९

९८.२... २१... ४०९ नं. २०७३/५५

माधवराव पेशव्यांनीं हैदरशीं तह करून पुण्याचा रस्ता धरिला व निजाम आणि इंग्रज यांना युद्धांत भाग घेऊं दिला नाहीं व त्यांचा कांहीं फायदाही होऊं दिला नाहीं. नंतर निजाम व इंग्रज यांनीं हैदरवर स्वारी करण्याचें ठरविलें व इंग्रजाचें सैन्यही निजामाच्या मदतीस आलें. पण हैदरनें युक्तीनें निजामास इंग्रजापासून फोडलें व निजाम व हैदर यांनीं मिळून घाटाखालीं उतरून महमद अलीच्या मुलखांत स्वारी करण्याचें ठरविलें. हैदरची पूर्ण तयारी होईपर्यंत निजाम मद्रासकर इंग्रजांशीं गोड बोलतच राहिला व हैदरची पूर्ण तयारी झाल्यानंतर निजाम व हैदर यांचीं सैन्यें घाटाखालीं उतरली व इंग्लिशाबरोबर युद्ध सुरूं झालें. निजाम व हैदर यांचे जवळ ४२८६० घोडेस्वार २८००० पायदळ व १०९ तोफा होत्या. इंग्लिशांचा सेनापति कर्नल स्मिथ हा सरहद्दीवर होता. त्यावर प्रथमतः हैदरची धाड वळली. या वेळींही हैदरनें समोरासमोर लढाई न देतां इंग्लिशांस नाना तऱ्हेनें त्रास दिला व त्यांची रसद तोडली.

पुढें चंगम येथें इंग्लिश व हैदर आणि निजाम यांच्या सैन्यांची जोराची लढाई झाली पण निश्चित अशी यशःप्राप्ति कोणासच झाली नाहीं. अर्काटच्या नबाबानें त्रिनोमलाई येथून इंग्लिशांस धान्य व वैरण यांचा भरपूर पुरवठा करण्याचें कबूल केलें. म्हणून कर्नल वुड तिकडे गेला. लवकरच कर्नल वुड व कर्नल स्मिथ यांचीं सैन्यें एकत्र झालीं व ता. ६ सन १७६७ मध्यें हैदरची व इंग्लिशांची लढाई झाली व तींत इंग्लिश विजयी

झालें. पावसाळा संपल्यावर हैदरनें अंबूरच्या किल्ल्यास वेढा दिला पण या किल्ल्याचें रक्षण कॅप्टन् कलव्हर्ट यानें चांगल्या तऱ्हेनें केलें. अशा तऱ्हेनें युद्ध चालू असतांना कर्नल पीच मोठें सैन्य घेऊन निजामच्या राज्यांत घुसणार अशी बातमी आली त्या बरोबर निजामानें युद्धांतून आपलें अंग काढून घेतलें. हैदर युद्धांत सतत गुंतल्यामुळें मलबारच्या नायरांनीं पुन्हां त्याची सत्ता उलथून पाडण्याचा प्रयत्न सुरू केला. इंग्लिशांनीं त्यांना उत्तेजन दिलें व मुंबईकर इंग्रजांनीं मंगलोर घेण्याकरितां आरमार पाठविलें. हैदरनें फाजल उल्लाखान यांजकडे म्हैसोरकडील व्यवस्था सोंपविली व आपण अत्यंत जलदीनें मंगलोरकडे प्रयाण केलें.

हैदर मंगलोरला जातांच तें स्थळ यत्किंचित्‌ही आयास न पडतां त्याला मिळालें. तेथें असलेला दारुगोळा, तोफा व खजीना ताब्यात घेऊन हैदर बेदनूरकडे वळला. बेदनूरच्या ज्या कांहीं जमीनदारांनीं इंग्लिशांना धान्यादिकांचा पुरवठा केला होता त्यांना त्या अपराधाबद्दल शासन केलें व दंडादाखल मोठाल्या रकमा वसूल केल्या. हैदर मंगलोरकडे गेल्यावर इंग्लिशांनीं कोलार, होसूर, वगैरे अनेक ठाणीं घेतलीं व ते बंगलोरवर हल्ला करणार असें दिसूं लागलें. हैदरनें आपली बायकामुलें व खजीना तेथून दुसऱ्या किल्यावर नेला. नंतर गुरुमकोंडयास जाऊन अलीरेझा खान यास आपल्या बाजूस वळवून घेतलें व तो कोलारकडे आला. नंतर दोन्ही पक्षांत तहाची बोलणीं सुरू झालीं. इंग्लिशांनीं हैदरकडून बऱ्याच मुलखाची मागणी केली. यामुळें तह न होतां युद्ध सुरूच राहिलें. नंतर हैदरनें कर्नल वुडला गांठून त्याला सडकून मार दिला. कर्नल स्मिथ जर त्वरेनें त्याच्या मदतीस धांवून आला नसता तर कदाचित् कर्नल वुड सर्व सैन्यासहित गारद झाला असता. इंग्लिश सेनापतींना हैदरचें सामर्थ्य व भरारी याची योग्य कल्पना येऊं लागली. समोरासमोर तर लढाई होईना. हैदर साखळ्या भराऱ्या मारूं लागला. इंग्रजांना त्याचा पाठलाग करितां येईना.

त्यावेळचें वर्णन इंग्लिश ग्रंथकारांनीं असें केलें आहे. कीं–"He was here, there and everywhere" इंग्लिशांना हैदर चोहोंकडे दिसूं लागला. मद्रासच्या कौन्सिलनें कर्नल स्मिथला दोष दिला व परत बोलावलें आणि कर्नल वुडकडे सेनाधिपत्य दिलें. हैदरनें एकदम म्हैसूरला वेढा दिला. तेव्हां कर्नल वुड म्हैसूरच्या मदतीस बंगलोरकडून येऊं लागला, इतक्यांत हैदरनें कर्नल वुडला म्हैसूर व बंगलोर यांच्या दरम्यान गांठलें व हल्ला करून मोठाल्या तोफा व दारूगोळा काबीज करून तो बंगलोरला पाठवून दिला. कर्नल वुड परत फिरत असतांना हैदरनें एक सारखा तोफाचा मार देऊन त्यास हैराण केलें. वेंकटागिरीकडून मेजर फिट्झ्‌जिराल्ड जर धांवून मदतीला आला नसता तर कर्नल वुडचाही संपूर्ण नाश झाला असता. कर्नल वुडची याप्रमाणें फटफजीती झाल्यामुळें मद्रासकरांनी त्यास परत बोलावून कर्नल लँगला सेनापति केलें. सन १७६८ च्या नोव्हेंबर मध्यें फाजल उल्लाखान इंग्लिशांनीं घेतलेलीं स्थळें भराभर काबीज करीत चालला. हैदर कोईमतूरकडून इरोडकडे चालला असतांना त्याला कर्नल निक्सन वाटेंत भेटला. हैदरनें इतका जोराचा हल्ला केला कीं, कर्नल निक्सनचा पूर्ण मोड झाला. कर्नल निक्सनच्या सैन्यांत इतका गोंधळ उडाला कीं, मृत्युमुखांतून जे लोक सुटलें तें सर्व जखमी × झालें. हैदरानें कर्नल निक्सनच्या दुय्यम सेनापतीस व दुसऱ्या कित्येक इंग्रजांस पकडून श्रीरंगपट्टण येथें कैदेंत ठेविलें, आणि इंग्लिशांनीं घेतलेला सर्व मुलूख परत घेतला व नंतर तो थेट मद्रासवर चाल करून जाऊं लागला. तेव्हां मद्रासकर गोंधळून गेलें व त्यांनीं कॅप्टन् ब्रूक याला तहाची वाटाघाट करण्यास पाठविलें. इंग्लिशांशीं कायमचें शत्रुत्व न करितां तो तह करण्यास तयार होता. पण इंग्रज अर्काटचा नवाब महमद अल्ली याचे

× Scarcely a man escaping death or wound

हित पाहूं लागले. महमद अल्लीनें हैदरची प्रजा लुटून तिजवर अत्याचार केलें होतें या गोष्टीबद्दल तो अत्यंत रागावलेला होता. राजा ह्मणवून घ्यावयाचें असेल तर प्रजेचें संरक्षण केलेंच पाहिजे. व जो आपल्या प्रजेस त्रास देईल त्याचे पारिपत्य केलेंच पाहिजे. तेव्हां प्रजेला त्रास दिल्याबद्दल हैदरला जो राग आला तो योग्यच होता. शिवाय महमद अल्ली अत्यंत विश्वास घातकी आहे असें हैदरचें निश्चित मत होते म्हणून महमद अल्लीस कोणतीही सवलत देण्यास तो तयार नव्हता. इंग्लिश तर महमद अल्लीस कवटाळण्याचें सोडीनात. यामुळें तहाची भाषा बंद पडली ही तहाची वाटाघाट चाललेली असतांना हैदरनें असें उद्गार काढिलें कीं "ठीक आहे मी आतां मद्रासच्या दारांतच येऊन उभा राहतों आणि तुमचा गव्हरनर आणि त्याचे कौन्सिल काय करते तें पहातों " तहाची भाषा बंद पडल्यावर हैदरनें पुन्हां रणदेवीची आराधना चालू केली व लवकरच इंग्रज मेटाखुटीस आले.

हैदरनें आपलें सैन्य दूर पाठविलें व बरोबर निवडक सहा हजार स्वार घेऊन भरारी मारावयास सुरवात केली. साडेतीन दिवसांत शंभर मैलांचे अंतर तोडून मद्रास जवळील सेंट थॉमस चर्चजवळ म्हणजे पांच मैलांवर येऊन तो मद्रासकर इंग्रजासमोर दंड थोपटून उभा राहिला.

हैदर इतक्या जलदीनें आणि अकस्मात् मद्रासपुढें येऊन उभा राहिला कीं, जेव्हां सेंट थॉमस जवळ आगी लागूं लागल्या तेव्हां हैदर आल्याचें वर्तमान इंग्रजांस कळालें. इंग्लिश गर्भगळित झाले व इंग्लिशांच्या वतीनें डि. प्रू हा तह ठरविण्या करितां आला. इंग्लिशांनीं तहाची याचना केल्यावर ता. २९।३।१७६९ रोजीं तह झाला. या तहानें (१) "परकीय शत्रूंची स्वारी आल्यास एकमेकांनीं एकमेकांस मदत करावी" असा ठराव झाला पण इंग्लिशांनीं आपलें वचन पाळिलें नाहीं.

(२) एकमेकांनीं एकमेकांचा घेतलला मुलूख परत करावा. ( ३ ) महमद अल्लाकडे असलेलें कारूर हें ठिकाण हैदरकडे रहावें.

इंग्लिश ग्रंथकार असें म्हणतात कीं, हैदरनें ज्या कुशलतेनें आपल्या सैन्याच्या हालचाली केल्या, जें शौर्य दाखविलें, तहाची वाटाघाट करितांना जी सूक्ष्मबुद्धि व दूरदर्शीपणा दाखविला त्यावरून तो अत्यंत बुद्धिमान् व स्वयंसिद्ध सैनानी व मुत्सद्दी होता असें स्पष्टपणें दिसतें. या उलट मराठ्यांच्या तहाची पद्धति पहा, थोडेसें पैसे मिळालें कीं, ते आपले परत फिरत.

एका फ्रेंच ग्रंथकर्त्यानें असें लिहिलें आहे कीं, या विजयाचें स्मारक म्हणून फोर्ट सेंट जॉर्जच्या दरवाजावर हैदरनें एक चित्र काढिलें होतें व त्या चित्रांत पुढील देखावा दाखविला होता.

मद्रासचा गव्हरनर व त्याचे मंत्रीमंडळ हैदरापुढें गुडघे टेकून बसले आहेत. हैदरनें डि. प्रूचें नाक ( हे हत्तीच्या सोंडेप्रमाणें लांब दाखविलें होतें. ) दाबल्यामुळें त्यामधून सोन्या रुप्याचीं नाणीं पटापट गळत आहेत. कर्नल स्मिथ एका हातांत तहाचा कागद धरून आपली अपयशी तरवार मोडून तिचे तुकडे फेकून देत आहे असा देखावा दाखविला होता.

हा देखावा हैदरनें चित्रित केल्यावरून तो गर्विष्ठ होता असें अनुमान काढण्याचें कांहींच कारण नाहीं. वडगांवच्या लढाईत स्टुअर्ट ठार झाला व कर्नल के. रणभूमीवर पडला आणि महादजीस जय प्राप्त झाला म्हणून——

पांढरा बावटा बोले । थांबवा कत्तलबाजीला ॥
उचलोनी टोपी हातें । करि सलाम टोपीवाला ॥
खड्गानें घे नमनाला । ग्वालेरी पगडीवाला ॥

अशा प्रकारचीं शाहीरी कवनें करणें व महादजी पुढें इंग्रज लोक

नम्रतेनें उभे आहेत अशा प्रकारचें चित्र काढणें यांत महाराष्ट्रियांस आनंद वाटतोचना. तेव्हां ज्याचें लहानपणीं आईनें मोल मजूरी करून पालन केलें, ज्याला लहानपणीं शिक्षण मिळालें नाहीं, ज्याला नंदराज व खंडेराव अशाशीं झगडे करावे लागले, ज्याच्यावर मराठ्यांची घोडदौड एकसारखी येतच राहिली, इंग्लिशासारख्या विज्ञान-शास्त्रांत पुढारलेल्या लोकांबरोबर ज्याला एकाकी झगडावें लागलें, त्याला विजयश्रीनें माळ घातली तर त्यानें अशा प्रकारचें स्मारक करण्यांत वावगें तें काय केलें ?

इंग्रज व फ्रेंच हे विज्ञान शास्त्रांत पुढारलेले असल्यामुळें त्यांचीं शस्त्रें व दारु गोळा उत्तम प्रतीचा असे. पाश्चात्यांची शिस्त उत्तम असे व बहुतेक सर्व फौज उत्तम कवाईत शिकलेली असे. त्यामुळें एतद्देशियांस त्यांच्यावर जय मिळविणें कठीण जाई. प्रस्तुत युद्धांत तोफखाना व पायदळ यांत इंग्रज हैदरपेक्षां पुष्कळच श्रेष्ठ होते. असें असतांना केवळ चिकाटी, समयसूचकता, बेडर वृत्ति, शौर्य, साहस, अतुल सेनानायकत्व व चलाखी या गुणांमुळें हैदरनें इंग्रजांना या वेळीं नमविलें.

स. १८५७ सालचे बंड सोडून दिल्यास अखिल हिंदुस्थानांत इंग्लिशांचें हैसोरच्या पठारावर जितके हाल झाले तितके कोठेंही झालें नाहींत.

# भाग दुसरा

## प्रकरण ५ वें

# मराठ्यांची स्वारी

## ४ थें युद्ध १७६९ ते १७७२

इ. स. १७६५ च्या जून मध्यें मराठे तह करून परत गेले. नंतर हैदरनें मलबारवर स्वारी करून पैसा व मुलूख उपटला आणि मद्रासकर इंग्रजांना तंबी देऊन मार्च १७६९ मध्यें त्यांच्या बरोबर तह केला हें वृत्त मागील प्रकरणीं आलेंच आहे.

माधवराव पुण्यास आल्यावर त्यांना उत्तरेकडे लक्ष द्यावें लागलें. तिकडे जाट व रोहिले हे मुख्य शत्रू होते. गोहदच्या राण्याचा समाचार घेण्यास १७६६ मध्यें दादासाहेब गेले होते. पण त्यांना पैशाचा पेच भारी पडला. शेंकडा २० टक्के व्याज देऊनही कर्ज मिळेना व फौजेंत दंगे होऊं लागले. त्यामुळें त्यांची मसलत फत्ते झाली नाहीं. उत्तरेकडून दादा परत आल्यावर १७६७ मध्यें भाऊबंदकीची तेढ सुरू झाली व सन १७६८ मध्यें माधवरावास दादासाहेब विरुद्ध धोडपची स्वारी करणें भाग पडलें. शिवाय १७६९ मध्यें भोसल्यावर स्वारी करावी लागली. अशा तऱ्हेनें ज्या कालांत विजयश्रीनें माळ घातल्यामुळें हैदरचें सामर्थ्य वाढत होतें, त्याच कालांत पेशवे व भोसले यांमध्यें कलह लागल्यामुळें हिंदूंचें सामर्थ्य घटत होत. तसेंच राघोबा व माधवराव यांमधील कलहानें महाराष्ट्रीयांचे सर्व व्यवहार संस्थाप्रधान असण्याऐवजीं व्यक्तिप्रधान

होत चालले होते. त्यामुळें ज्याला आपण मराठी साम्राज्य असें समजतो, तें विलयास जात होतें किंवा त्याचा पाया डळमळत होता.

असो इंग्लिशांशीं तह करून मोकळे होतांच हैदरनें आपलें राज्य वाढविण्याचा उपक्रम सुरू केला. मुरारराव गुत्तीकर हा नेहमीं हैदरच्या शत्रुला मदत करी ह्मणून त्याजवर हैदरचा डोळा होताच. तेव्हां त्याचा पूर्ण नाश करावा किंवा त्यास पक्के ताबेदार बनवावे या उद्देशानें त्याचे मुलखावर स्वाऱ्या करून बहुतेक ठाणीं घेतलीं व निरोप पाठविला कीं, " पेशवे पुण्यास राहिले. आतां माझ्याशीं गांठ आहे, मुकाट्यानें माझें स्वामित्व कबूल कर व मला येऊन भेट, नाहींतर तुझें राज्य समूळ बुडवितो. " हा सेनापति, हैदरचा निरोप येतांच मुकाट्यानें भेटीस गेला. पुष्कळांस असें वाटलें कीं, हैदर मुराररावास कैद करील, पण त्यानें सेनापतीस मेजवानी करितां २५ हजार रु. दिले, शिवाय तीन हत्ती, शिरपेंच, मोत्यांची कंठी वगैरे देऊन सत्कार केला. व दरसाल फक्त ५० हजार रु. खंडणी घेण्याचें कबूल करून त्यास निरोप दिला. पेशव्यापेक्षां आपण दिलदार आहोंत, आपल्याशीं मैत्री ठेवण्यांतच जहागिरीचें हित आहे. हें मुराररावाच्या मनावर ठसविण्यांकरितांच हैदर या वेळीं उदारपणानें वागला. नंतर मागील तहाच्या कलमांवर हरताळ फिरवून चित्रदुर्ग, हरपनहळ्ळी वगैरे संस्थानिकांपासून जरब दाखवून खंडणी घेतली. नंतर प्रचंड फौज घेऊन हरिहरकडे आला व पेशव्यांचा मामलतदार लागू ह्मणून होता त्यास निरोप पाठविला कीं, ' मुकाट्यानें मला भेटावयास ये नाहींतर तोफा लावून हरिहरची राखरांगोळी करतो " बिचारा लागू मुकाट्यानें भेटीस गेला. हैदरनें त्याचाही सन्मान करून परत पाठविलें. नंतर तुंगभद्रा उतरून हैदर सावनूरच्या मुलखांत उतरला. पेशवे दर खेपेस तहाचीं कलमें लावीत असत, पण या कलमांना

अलोट शक्तिरूपी झऱ्याचें पाणी न मिळाल्यामुळें हैदरच्या तिखट तरवारीच्या पाण्यानें ती ताबडतोब करपून जात. तहाच्या कागदावर शक्तिरूपी पाषाण असेल तर तो तह टिकतो; नाहींतर तो तहाचा कागद वीराच्या सहज फूत्कारानें आकाशांत गोते खात जातो.

कर्नाटकमध्यें अशी धामधूम चालवून पुण्यास वकीलामार्फत तहाचें बोलणें हैदरनें चालू ठेविलेंच होतें. पेशव्याचें म्हणणें असें होतें कीं, १७६८ ते ७० साला पर्यंतची खंडणी चाळीस लक्ष रुपये द्यावी. संस्थानिकांकडून घेतलेल्या खंडण्या परत द्याव्यांत व आमचा घेतलेला मुलूख परत द्यावा. हैदर ह्मणूं लागला कीं, दहालक्षाबद्दल साबकारी निशा करून देतो. सोळा लक्षाकरितां रेझा अल्लीखान यांस ओलीस देतों व चौदा लक्ष पुढील सालीं देतों. पेशव्यांचा घेतलेला मुलूख परत देण्यास किंवा संस्थानिकांकडून घेतलेल्या खंडण्या देण्यास तो तयार होईना. " आम्हांला भिऊन हैदर अरण्यांत दडून बसतो, समोरासमोर लढाई करण्याची त्याची छाती नाहीं अशा बढाया तत्कालीन मराठे सरदार मारीत असत " व आजचे इतिहासकारही त्याच बढाया मारतात. परंतु हैदर प्रत्येक खेपेस तहाचीं कलमें पायाखालीं तुडवीत असे हें भीतीचें लक्षण आहे कीं काय ? याचा ज्याचा त्यानेंच विचार करावा.

श्री. खरे शास्त्री लिहितात कीं, ' हैदरनें धामधूम करण्यास सुरवात केलेली पाहून पेशव्यांनीं गोपाळरावास सूचना दिली कीं, मिरजेस फौज जमा करण्याचें तुम्हीं खूप अवडंबर माजवावें. मिरजेस फौज जमत असल्याचें पाहून हैदरास दहशत बसेल ' पेशव्यांनीं जर खरोखर अशी सूचना दिली असेल तर पुणें दरबारास हैदरची मनोवृत्ति कळाली नाहीं

असें खेदानें ह्मणावें लागतें. हैदर हा कसल्याही अवडंबरास किंवा संकटास जुमानणारा नव्हता. हैदर सावनुरापासून वीस कोसावर आला. त्यावेळीं रास्ते आणि गोपाळराव हे सावनूरपासून दहा कोसावर होते. त्यांस न जुमानता हैदरनें नवाबास निरोप पाठविला कीं, " खंडणीचें देणें ठरविण्याकरितां, मुकाट्यानें माझ्या गोटावर भेटावयास ये नाहींतर तुझी धडगत नाहीं". पटवर्धनानीं नवाबास खंडणी देऊं नये असें वजाविलें. नवाब संकटांत पडला, शेवटीं त्यानें गुप्तपणें ४० हजार होन हैदरास दिले. यावरून नवाबास पेशव्यांचा विश्वास किती व हैदराचें भय किती हें स्पष्टपणें कळतें. हैदरानें याप्रमाणें उत्पात चालविल्यामुळें माधवरावास युद्धास निघणें प्राप्त झालें.

इंग्लिशांनीं १७६९ च्या मार्च मध्यें हैदरशी दोस्तीचा तह केला होता व त्या तहान्वयें त्यांनीं हैदरास मराठ्यांचीं स्वारी आली म्हणून त्यास मदत करावयास पाहिजे होती. परंतु तहाच्या शाईचा ओलावा हवेंत उडून गेला त्यावरोवर इंग्लिशांचें वचनही हवेंत उडून गेलें.

हैदर हा अत्यंत पराक्रमी सेनानायक आहे व उत्तम मुत्सद्दी आहे अशी इंग्रजांची खात्री झालेली होती; व जर त्याचें बल वाढत गेलें तर तो सर्व दक्षिण हिंदुस्तान पादाक्रांत करील व तसें झालें तर आपणांसही कदाचित् गाशा गुंडाळून तेथून जावें लागेल असें इंग्लिशांस वाटत होतें. इंग्रजांस मराठ्यांचीही भीति होती. मराठ्यांचे गृहकलह वाढत चालल्या मुळें त्यांचे वल कमी होत आहे, हें त्यांस माहीत होतेंच, तशांतच हैदरशीं युद्ध केल्यानें त्यांचे वल आणखी खच्ची झालें तर तें त्यांस पाहिजेच होतें. यामुळें इंग्लिशांनीं हैदरास मदत केली नसावी.

असो, युद्धाची तयारी झाल्यावर पेशवे आश्विन वद्यांत (सन १७६९) डेरे दाखल झाले व मार्गशीर्ष शुद्धांत पंढरपुरास गेले. दसरा झाल्यावर स्वारीस निघावयाचें व पावसाळयाच्या सुरवातीस परत फिरावयास लागावयाचें असा मराठ्यांचा शिरस्ता असे. हैदर हा काय तऱ्हेचा पुरुष आहे हें मराठ्यांस पक्कें कळालेलें होतें. त्याचें पूर्ण पारिपत्य करण्यास अगाऊ तयारी करून त्वरेनें जावें. हें मराठ्यांस कधींच सुचलें नाहीं किंवा साधलें नाहीं. तेव्हां पुणें ते पंढरपूर पर्यंतचें सुमारें १००–१२५ मैल अंतर तोडून जाण्यास महिना सव्वा महिना कां लागावा ! मराठ्यांच्या अनेक स्वाऱ्यांतून ही दिरंगाई दिसते. गाडी जोडून, स्वाऱ्या बसवून हातांत तेलाचा नळा घेऊन तेल आणावयास जाणारा गाडीवान व हे मराठे सरदार यांच्यांत पुष्कळच साम्य आहे. असो या स्वारींचे वेळींच मराठ्याचे सैन्य पाऊण लक्षापेक्षां जास्त होते. तोफा, बंदुका व जेजाला इत्यादि सरंजामही मुबलक होता. जानेवारींत ( १७७० ) पेशवे म्हैसोर प्रांतीं शिरून अनेक स्थळें हस्तगत करूं लागले. हैदर पुन्हां मासूरच्या बारींत दडी मारून बसला. समोरासमोर लढाई देईचना. हैदरनें तहाचें बोलणें सुरूंच ठेविलें परंतु तह व्हावा अशी अंतःकरणपूर्वक त्याची इच्छा नसल्यामुळें तह जुळवावा असें बोलणें मात्र करीना. यामुळें प्रत्यक्ष युद्धास सुरवात झाली. पट्टण व बंगळोर ही हैदरची मजबूत ठाणीं होतीं तीं घेण्याचा पेशवे प्रयत्न करिते तर त्यांस महिनेचे महिने तेथेंच गुंतून पडावें लागलें असतें. ठाणीं मात्र सर झाली नसतीं. तेव्हां या अफाट घोडदळानें काय केले ? जेथें हैदरचे बळ होतें तेथें घाव न घालतां सर्वत्र धुमाकूळ मात्र मांडला. अनेक लहान सहान ठाणीं हस्तगत केलीं. पण या ठाण्याचाही बंदोबस्त राखण्यापुरती शिबंदी त्यांना ठवितां येईना. तेव्हां इंदीकिरे, तुरविकेरे सारखी ठाणीं पाडून जमीनदोस्त केलीं. हैदरचे सरदार मात्र सर्वत्र फिरून मराठ्यांस उपद्रव देत राहिले.

हैदर हरहुन्नरी होता. रयत व जमीनदार हे सर्व हैदरच्या बाजूचे होते. ज्या अर्थी रयत व जमीनदार त्याचें बाजूचे असत, त्या अर्थी " तो त्यांस चांगल्या रीतीनें वागवीत असे " असें अनुमान करण्यास कांहींच हरकत नाहीं. रयत व जमीनदार हैदरास मदत करणारे असल्यामुळें मराठ्यांस त्याच्या हालचालीची नक्की बातमी कधींच कळत नसे. पेशव्यांचे हेर खातें अगदीं दुबळें असें, उलटपक्षीं पेशव्यांची खडान्खडा माहिती हैदरास मिळे. हाच प्रकार पुढें टिपूशीं मराठ्यांचें युद्ध चाललें असतांना घडत असे. हैदरनें या गोष्टीचा पूर्ण फायदा घेण्याचें ठरविलें.

एकदां हैदर गोपाळहरीच्या समोरच १८ मैलावर तरिकिनाऱ्याजवळ होता. रात्रीच्या वेळा अचानक छापा घालण्यांत तो प्रवीण असल्यामुळें मराठे अगदीं डोळ्यांत तेल घालून सावध रहात. तेव्हां माघ वद्यांत आपण तळ उठवून एकदम श्रीरंगपट्टणकडे जाणार असा हैदरनें पुकारा केला व त्या प्रमाणें तो स्वतः दक्षिणेस १२ मैलावर सरकला व रोज थोडें थोडें लष्करी सामान पट्टणकडे जाऊं लागलें.

अशा तऱ्हेनें पूर्वी जें २४ मैलांचें अंतर होतें तें आतां ३६ मैलांचें झालें. नंतर हैदर श्रीरंगपट्टणाकडे गेल्याची खात्रीलायक बातमी गोपाळरावांस मिळूं लागली. ता. २४ फे. १७७० रोजीं निळकंठ व परशराम भाऊ असे दोघेजण तरि किनाऱ्याच्या बाजूस २४ मैल पर्यंत जाऊन रात्रीं ११-१२ वाजतां मुक्कामास परत आले. वाटेंत जे खेड्यापाड्याचे लोक भेटत त्यांस हैदर कोठें आहे असें पटवर्धन विचारीत व त्यांस हैदर पट्टणकडे गेला असें ते लोक सांगत. हैदरनें पटवर्धनास चकविण्याकरितांच मुद्दाम हे लोक वाटेंत ठेविले होते असें ह्मणतात. हैदर दूर गेला या बातमीमुळें पटवर्धनाच्या फौजेंत थोडी शिथिलता उत्पन्न झाली. ता. २४ रोजीं दुपारीं हैदर आडमार्गानें निघाला

व दिवसभर आणि रात्रभर चालून ता. २५ रोजीं पहाटेस १२-१३ हजार गारदी व चार पांच हजार स्वार यांसह येऊन ठेपला. पटवर्धनास हैदर आला अशी बातमी रात्रीं एका गारद्यानें दिली. बातमी खरी कीं खोटी याची भवति न भवति होते तोंच हैदरनें गोळयांचा पाऊस पाडण्यास सुरवात केली. पण यावेळीं मराठी सैन्य धैर्यानें उभे राहिलें. परशुराम भाऊंच्या खालची तीन घोडी गोळया लागून मेली. मराठ्यांनीं आपलें सामान सुमान तीन कोस मागें नेलें. कांहीं थोडें सामान शत्रूस मिळूं नये ह्मणून जाळून टाकिलें. मराठी फौज तळ सोडून एका ओढ्याच्या कांठीं जाऊन उभी राहिली. हैदरनें गारद्यांचे बुरूज बांधून बंदुकांचा जबर मार दिला व चार घटका दिवस राही पर्यंत तो मराठ्यांच्या मागें लागलाच होता. नंतर सायंकाळीं तो कूच करून निघून गेला. हा विजयाचा प्रसंग हैदरनें आपल्या अकलेच्या बळावरच घडवून आणिलेला होता. मराठी इतिहासकार या प्रसंगीं मराठ्यांकडील ५०-६० घोडी व २५ मनुष्येंच काय तीं मेलीं असें ह्मणतात. हा छापा पहाटेच्या वेळचा होता. हैदरनें गोळयांचा पाऊस पाडिला असें असतां माणसें मात्र पंचवीसचे वर मेलीं नाहींत हें श्री. खरे शास्त्रींचें विधान तर्कांच्या कसोटीला लावून प्रत्येकानें आपलें मत बनवावें.

असो नंतर मराठ्यांचें फार हाल होऊं लागले. धान्य विकतही मिळेना व लुटूनही मिळेना. जनावरांच्या चाऱ्याची भयंकर तूट पडली. माघ महिना संपतांच तळीं व नद्या कोरड्या पडून पाणी मिळेना, यामुळें माणसें व जनावरें अगदीं बेजार झाली. मिररेझा मराठ्यांच्या मुलखांत थोडा फार धुमाकूळ घालितच असे. एकदां त्यानें व टिपूनें गोपाळरावाच्या छावणीवर पहाटेस छापा घातला. पण यावेळीं मराठ्यांचे फारसें नुकसान झालें नाहीं पहाटेस छापा घालणें हें हैदरच्या अंगवळणींच पडलें होते

व त्यामुळें मराठ्यांस नेहमीं सावध रहावें लागे. मार्च महिन्यांत खुद्द पेशवे बंगलोरकडे कुच करून जाऊं लागले. त्यांस असें वाटत असें कीं, " आपण बंगलोरवर गेलो म्हणजे पेशवे तें स्थळ घेतील या भीतीनें हैदर तहास कबूल होईल " पण पेशवे बंगलोर घेतील ही भीति त्यास नव्हतीच. तो किल्ला हस्तगत करणें, अत्यंत कठीण कर्म होतें. यामुळें पेशव्यांच्या अपेक्षेप्रमाणें कांहींच घडलें नाहीं. हैदर हा निधड्या छातीचा वीर होता. प्राण गेला तरी बेहेत्तर पण मराठ्यांचें जूं आपल्या मानेवर बसूं द्यावयाचें नाहीं असा त्याचा पण होता. तथापि पेशव्यांना तहाची लालूच दाखविण्यास तो कोणीतरी वकील मात्र पाठवी पण तहाची भाषा पेशव्यांस पसंत न पडण्यासारखीच बोलत असे.

मराठ्यांनीं हैदरचा पुष्कळ मुलूख लुटून फस्त केला. अनेक किल्ले व शहरें खणून धुळीस मिळविली. तथापि हैदर तहास कबूल होईना. हैदरास दक्षिणेकडून व बेदनूरकडून दाणा वैरण स्वस्त मिळे. मराठे सालोसाल ज्या मुलखांत शिरत तेथील सधन रयत त्याने उठवून दुसरीकडे नेली होती. त्याचे जवळ पैसा मुबलक होता. उघड्या मैदानावर लढाई देण्याचे तो सतत टाळीत होता त्यामुळें त्याचें फारसें नुकसान झालें नाही. शिवाय त्याची चिकाटी भयंकर, या सर्व गोष्टीमुळें मराठ्यांनीं अमुक ठाणीं घेतलीं, अमका मुलुख जाळून फस्त केला असें जरी झालें तरी या युद्धाची झळ विजयी म्हणविणाऱ्या मराठ्यांसच जास्त लागली. पावसाळ्याकारितां परत फिरावें तर शत्रू पराजित झाला नाहीं, न जावें तर पैशाची तरतूद काय करावी असा प्रश्न उत्पन्न झाला. पेशवे व पैसा यांचा नेहमींच ३६ चा आंकडा असे. त्यामुळें पेशव्यास कर्नाटकांत पावसाळा घालवितां येईना. शिवाय मराठ्यांचें राज्य म्हणजे धामधुमीचे राज्य. पुणें सोडून पेशवे फार दिवस दूर राहिल्यास राज्यांत कोठें तरी

बखेडा माजावयाचाच ह्मणून कांहीं फौज त्र्यंबकराव मामांच्या अधिपत्या-खालीं ठेवून पेशवे ता. १३ जून १७७० मध्यें पुण्यास दाखल झाले. कर्नाटकांतील मराठे सरदार सोयीची ठिकाणें पाहून ऐनवेळीं एकमेकांस मदत करितां यावी म्हणून जवळ जवळ छावण्या देऊन राहिले. पावसाळ्या-मध्यें हैदरनें मी अमूक तालुका लुटणार, अमक्या ठिकाणीं स्वारी करणार अशा कंड्या पिकवूनच मराठे सरदारांस संशयांत पाडिलें. शिवाय लहान सहान टोळ्या कोलार, बाळापूर, होसकोटे प्रांतीं पाठवून मराठ्यांस त्रास दिला. एवंच आक्टोबर अखेर युद्धाची लहान सहान रजक झडतच असे. पर्जन्य कालानंतर माधवराव स्वतः स्वारीवर निघाले. पुन्हां सैन्याची जमवाजमव झाली. पुण्यास ४० शेर वजनाचा गोळा फेकणाऱ्या तोफा ओतण्यांत आल्या. बिदनूरवर स्वारी करण्याकरितां दहा हजार कुऱ्हाडे जमविले व कुऱ्हाडी करण्याचे कारखाने चालू झाले. फ्रेंच व इंग्रज गोलंदाज नौकरीस ठेविले व प्रांतांतून फौजा गोळा झाल्या. पेशव्यांनीं केलेल्या तयारी वरून हैदरचें पारडे किती जड झालें होतें व सुमारें १५ वर्षांच्या अल्पकालांतच त्यानें मराठ्यांनां किती बिकट परिस्थिति उत्पन्न केली होती तें स्पष्ट दिसतें.

हैदरचें तहाचें बोलणें चालूंच होतें. पण त्यांत धरबंध कांहींच नसे. एकदां खंडणी देतों ह्मणावें, एकदां नाहीं ह्मणावें असें चालूंच होतें. माधवरावास क्षयाची व्यथा जडल्यामुळें त्यांचा एकसारखा शक्तिपात होत होता. त्यामुळें त्यासही एकदाचा पक्का तह होईल तर बरें, असें वाटत होतें. परंतु हैदरच्या धरसोडीच्या बोलण्यामुळें तह होत नाहींसें पाहून रावसाहेब पेशवे मिरजेपर्यंत गेले. परंतु प्रकृति क्षीण होत चालल्यामुळें परत पुण्याकडे येण्याचें ठरवून सन १७७१ च्या जानेवारींत

ते पुण्यास दाखल झाले; व आप्पा बळवंत मेहेंदळे व मल्हारराव पानसे यांना फौजा देऊन म्हैसोरवर पाठविले. सन १७७१ च्या जानेवारींत कर्नाटकच्या रणभूमीची खडान्‌खडा माहीती असणारा शूरवीर गोपाळ हरी पटवर्धन मृत्यु पावला. स्वत: पेशवे व गोपाळ हरी या दोन तेजस्वी पुरुषांच्या अभावीं मराठी सैन्यांत एक प्रकारचा दुबळेपणा उत्पन्न झाला.

मराठ्यांचें सैन्य हैदरच्या मुलखांत धुमाकूळ घालीतच होतें. हैदरही स्वस्थ बसला नव्हता. पेशव्यांनीं पाडलेल्या अनेक किल्ल्यांची दुरुस्ती करून तेथें पुन्हां त्यानें शिबंदी ठेविली. मराठ्यांनीं ठाणीं व किल्ले उध्वस्त करावेत, हैदरनें पुन्हां त्यांची डागडुगी करून शिबंदी ठेवावी व मराठ्यांनीं त्याच ठाण्यांकरितां किंवा किल्यांकरितां पुन्हां धावपळ करावी असा प्रकार या युद्धांत चाललेला होता.

मराठ्यांचा बिदनूरवर फार दिवस डोळा होता. ह्मणून त्यांनीं दहा हजार कुऱ्हाडे बरोबर घेऊन जंगल सफा करून तेथें घुसण्याचा निश्चय केला. हैदर मैदानावरील लढाई जरी टाळीत होता तरी तो मराठ्यांस बेदनूरकडे सहजासहजीं प्रवेश करू देणार नव्हता. म्हैसोर प्रांतांतील कांहीं भाग १७५९ पासूनच अनेक स्वाऱ्यांमुळें उध्वस्त झाला होता. मराठ्यांनींही जाळपोळ पुष्कळच केली होती. तेव्हां उध्वस्त झालेल्या प्रांताच्या संरक्षणास तो आपलें बल खर्चीं घालीत नसे. पण बिदनूरची गोष्ट मात्र तशी नव्हती. बिदनूर प्रांत सधन होता, रयत सुखी होती, धान्य व वैरण यांचा मुबलक पुरवठा तेथून होत होता. तेव्हां मराठ्यांस तेथें घुसूं द्यावयाचें नाहीं असा हैदरचा निश्चय होता. तेव्हां त्यानें आपल्या सैन्याच्या अनेक टोळ्या बिदनूरच्या अरण्यांत पेरून ठेविल्या व मराठ्यावर छापे घालण्याची तरतूद केली व स्वत: पंचवीस

हजार गारदी, आठ हजार स्वार, पंचेचाळीस तोफा, जेजाला व बाणांचे ताफे घेऊन श्रीरंगपट्टणपासून सुमारें १५ मैलावर मेलकोट येथें जाऊन राहिला. हैदर मैदानांत आला हे पाहून मराठे सरदार चोहोंकडून धावून आले व किरकोळ हल्ले व प्रतिहल्ले चालू झाले. हैदरच्या तिन्हीं बाजूस मराठा सैन्य होते. पश्चिमेकडे दाट झाडी असल्यामुळें तो मार्ग मात्र मोकळा होता. तो मार्गही बंद करण्याकरितां मराठ्यांची पांच हजार फौज तिकडे गेली. हैदर जवळ आगीचें बळ भारी असल्यामुळें मराठ्यांनीं दोन दिवस त्यावर हल्ला केला नाहीं. व तोही गोट सोडून बाहेर पडला नाहीं. पुढें त्र्यंबकरावमामानें एका टेकडीवर तोफा चढवून तेथून हैदरच्या गोटावर मारा केला व त्याचें भयंकर नुकसान होऊं लागलें तेव्हां त्यानें श्रीरंगपट्टणकडे जाण्याचा विचार केला. श्रीरंगपट्टण तेथून फक्त १० मैल होतें. शत्रू निसटून जाऊं नये म्हणून त्यावर मराठ्यांनीं पाळत ठेविली होती. ता. ७ मार्च १७७१ रोजीं रात्रीं हैदरचें सैन्य गुपचुपपणें अत्यंत व्यवस्थितपणें कूच करूं लागलें. इतक्यांत वाटेंत ४००–५०० मराठ्यांची एक टोळी आडवी आली. मराठ्यांस हैदरचे लोक किती आहेत याची कल्पना नव्हती. हैदराकडील लोकांसही मराठे किती आहेत याची बरोबर कल्पना न आल्यामुळें या काल्पनिक सैनेवर तोफांचा मारा सुरू झाला. तोफांच्या आवाजानें सर्व बाजूस पसरलेलें मराठ्यांचें सैन्य धावून आलें. व त्यानें मेलकोटच्या खिंडींत हैदरच्या सैन्याचा कोंडमारा केला. त्यामुळें क्षणोक्षणीं कूच करणें थांबवून तोफांचा व बंदुकांचा मारा करून मराठ्यांस मागें हटविणें हैदरास भाग पडलें. मराठे बिलगले ह्मणजे तोफांचा मारा करावा. ते जरा मागें सरलें कीं, कूच करावें असें करीत करीत तो चालला. प्रसंग अत्यंत कठीण आला. चार मैल पुढें सरकण्यास त्यास पक्के नऊ तास लागले. दिवस उगवून दिसूं लागतांच सर्व मराठे

सरदारांनीं हैदरास सर्व बाजूनीं कोंडलें. श्रीरंगपट्टण अवघें ६ मैल दूर राहिलें. हैदर निसटून जाण्याची पराकाष्ठा करीत होता तर मराठे त्यास चेंचून काढण्याची शिकस्त करीत होते. पटवर्धन, रास्ते, त्र्यंबकरावमामा सर्व दिशांनीं एकसारखें हल्ले करीत व हैदरही मोठ्या मर्दुमकीनें प्रत्येक हल्ला परतवीत असे. प्रहर दिवस येईपर्यंत झोंबाझोंबी होऊनही हैदरचा मोड झाला नाहीं. तो तसाच आणखी २ मैल पुढें सरकला. हैदरची आग भारी होती. "पंचवीस हजार गारद्यांची एकदांच शिलग होई त्यावेळीं गगन गर्जत असे" असें वर्णन या युद्धांत हजर असलेल्या एका गृहस्थानें लिहिलें आहे. श्रीरंगपट्टण फक्त चार मैल दूर राहिलें होतें. हैदर आतां निसटून जाणार असें मराठ्यांस वाटूं लागलें व म्हणून सर्व सरदारांनीं एकच लगट केली. व हैदरच्या सैन्याचा पूर्ण नाश झाला. हैदर डोंगराडोंगरानें पळाला. टिपू व मिरफैजुल्ला फकीराच्या वेषानें पळून गेले. दहा हजार स्वार, पंधरा हजार गारदी, कित्येक हजार कानडी प्यादे, धारातीर्थीं पतन पावले. तीन चार हजार लोक कैद झाले. एवंच सर्व फौज धुळीस मिळाली. ४५ तोफा, आठ हजार घोडे, पंचवीस हजार बंदुका, नाना तऱ्हेचीं हत्यारें, सर्व जामदारखाना, हत्ती, उंटें, डेरे, राहुट्या वगैरे सर्व सामान मराठ्यांच्या हातीं लागलें. या लढाईस मोती तलावाची लढाई असें म्हणतात. मराठ्यांना गेल्या १०।१२ वर्षांत इतका मोठा जय कधींच मिळाला नव्हता. हैदरचा सरदार उल्लाखान यानें फारच शौर्य दाखविलें. अशा प्रचंड गर्दींतून मराठ्यांची कोंडी फोडून हा वीर लढत लढत अखेर कावेरी पार निघून गेला.

मराठे घोडदळांत विजयोत्सव सुरूं झाला, जेध्यांनीं घाडग्यांचा पराक्रम वर्णन केला तर घाडग्यांनीं जेध्यांच्या तिखट तरवारीचें पाणी तिखट

मीठ लावून वर्णन केलें. अशा तऱ्हेनें विजयोत्सव पार पडल्यावर हैदरचा पाठलाग करण्याचे सोडून पेशव्यांचे सरदार मेलकोटकडे वळले. तेथें विशिष्टाद्वैत मताचे प्रवर्तक रामानुजाचार्य राहत असत व श्रीविष्णूचें अति-चिलपिल्लराय नांवाचें प्रसिद्ध देवालय होतें. सर्व दक्षिणेंतील हिंदु वैष्णव त्या देवळास अत्यंत पवित्र मानीत असत. परंतु तेथें शिरल्यावर पेशव्यांच्या सरदारांनीं कत्तलीची कमाल केली. ब्राह्मण असो कीं मुसलमान असो, सर्वांची सरसहा कत्तल झाली. देवालयाची सर्व संपत्ति लुटली, देवाचे मोठमोठे रथ होते त्यांस आग लावली व त्यामुळें सर्व देऊळ जळून खाक झालें देवळाचें भस्म झाल्यामुळें पेशवे हे धर्मरक्षक आहेत. अशा भावना ज्यांच्या अंतःकरणांत होत्या त्याहीं भस्म झाल्या.

अशा रीतीनें लुटीची बेशिस्त दंगल करण्यांत मराठे गुंतले असतांना हैदरनें पुन्हां आपल्या सैन्याची जमवाजमव केली. नंतर त्र्यंबकरावमामा श्रीरंगपट्टणला वेढा घालण्यास गेले. श्रीरंगपट्टण हें इतकें मजबूत ठाणें होतें कीं, लाख फौजेनें ४।६ महिने वेढा घातल्यावरहि हातीं येण्याजोगें नव्हतें. हैदरच्या फौजेचा नाश झाल्याबरोबर जर त्याचा निश्चयानें पाठलाग केला असतां तरच यश येण्याचा संभव होता, तो संभव निघून गेल्यावर मराठे पट्टणाभोंवतीं गुंतून पडले. हैदरनें मराठे येण्याचें आंतच नवीन लोक नौकरीस ठेविले. दारूगोळ्याची तजवीज केली, व ठिकठिकाणीं बातेऱ्या बांधून त्यावर तोफा सज्ज केल्या मराठ्यांनीं कोठें मोर्चे बांधण्याचा प्रयत्न केला कीं, हैदर त्या बाजूस १००–१५० तोफा एकत्र आणून मारा करी. त्यामुळें मराठ्यांचें माणूस टिकत नसे. मराठ्यांच्या लष्करांत दुष्काळ जाणवला. शत्रू पावयाचा झाला म्हणजे रयत दुसरीकडे पाठवून हैदर मुलूख उजाड करीत असे. शिवाय मराठ्यांची जाळपोळ दांडगी. सर्वत्र मुलुख उजाड

पडलेला, यामुळें धान्य व वैरण मिळणें मुष्कील झालें. हैदर तहाची भाषा बोलतच होता. तो म्हणे कीं, एका घोड्यानिशीं मी व टिपूमियां पट्टणांत आलों. तोफा, दारुगोळा, फौज, पागा, हत्ती, जामदारखाना वगैरे सर्व लुटले गेले. आतां मजजवळ पैसा नाहीं. तुह्मीं माझा घेतलेला सर्व मुलूख परत कराल तर तीन सालांची पंचेचाळीस लक्ष रुपये खंडणी देतों. यांतही २१४ लाख रु. सूट द्यावी. असल्या तहानें पेशव्यांचा स्वारीचा खर्चही भागणार नव्हता. पावसाळ्याचे दिवस नजीक आले. कावेरीस पाणी आलें म्हणजे सर्व सैन्य कोंडले जाऊन कदाचित् पूर्णनाश होईल या भीतीनें पट्टणचा वेढा उठवून मराठे सरदार मेलकोटकडे गेले. पावसाळा संपल्यावर कावेरी कांठची कांहीं ठाणीं घेऊन बिदनूरकडे जाण्याचें ठरलें. मुलूख जाळून लुटून फस्त करण्याचें काम सुरू झालें. भैरवदुर्ग, उत्तरदुर्ग वगैरे किल्ले मराठ्यांनीं हस्तगत केल्यावर ते पुन्हा हैदरनें घेतले होते. म्हणून ते किल्ले परत घेण्याकरिता मराठ्यांना पुन्हां आपले बल खर्चीं घालावें लागलें.

मराठ्यांनीं कोट किल्ले घ्यावे व पाडावे, मराठे जरा दूर झाले कीं, हैदरनें तें दुरुस्त करून तेथें ठाणीं बसवावीत, पुन्हा मराठ्यांनीं धांवपळ करून तीं ठाणीं जिंकावीं, असा खेळ या युद्धांत दिसतो. सन १७७२ च्या फेब्रूवारी पर्यंत बारा महाल प्रांतांत शिरून मराठ्यांनीं अमर्याद जाळपोळ केली, कोईमतूर कडील प्रांतही जाळून पोळून फस्त केला. त्र्यंबकराव मामानें बिदनूर प्रांतीं शिरून गांवें व शहरें लुटून व जाळून टाकण्याचा निश्चय केला. ते ह्मणाले कीं, "गढ्या व किल्ले पाडून जमीनदोस्त करीन, मुलूख असा उजाड करीन कीं, पन्नास पन्नास कोसांत दिवा लागू नये" सैन्यांतील लोक आगी लावीतच चालले तर गरीब बिचारी रयत त्याचा प्रतिकार करूं शकणार नाहीं हें निश्चित

आहे. पण पन्नास पन्नास कोसांत दिवाच जर लागला नाहीं तर हे मराठे व ब्राह्मण सरदार राज्य तरी कोणावर करणार होते ! सर्व प्रदेशाची राखरांगोळी करण्याची प्रतिज्ञा करतांना मामांनीं यत्किंचित् तरी विचार केला असेल कां ?

असो मामा बिदनूरकडे जाणार तोंच त्यास पेशवे आजारी असल्यामुळें झटपट तह उरकून येण्याची आज्ञा झाली. सन १७७० च्या जानेवारींत सुरूं झालेली ही मोहीम सतत २॥ वर्षें चालली होती. त्यामुळें मराठ्यांचे अतोनात हाल आणि मनस्वी हानि झालेली होती. शिलेदार लोक सरदारांस जुमानीत नव्हते. सांगितलेलें काम ऐकूं नये; नेहमीं गवगवा करावा, शें पन्नास स्वारांनीं कोणासही न जुमानतां एकदम घरीं जावें, असा प्रकार घडतच होता. सर्व सरदार मेटाकुटीस येऊन त्यांस कधीं घरीं जाऊं असें झालें होतें. परशुरामभाऊंनीं तर जहागिर जप्त झाली तरी घरीं जाण्याचें ठरविलें होतें. यामुळें पेशव्यांचें पत्र येतांच १७७२ च्या जुलई महिन्यांत तह झाला. या तहानें ऐकमेकांचा मुलूख एकमेकांनीं परत करावा व हैदरनें पेशव्यांस पन्नास लक्ष व सरदारांस दहा लक्ष रुपये द्यावें असें ठरलें. या पैकीं चार लक्षांचे जवाहिर, एक लक्षांकरितां २० हत्ती, व सत्तावीस लक्ष रुपये रोख दिले व चोवीस लक्षांकरितां सावकारी निशा पटवून दिली.

मराठी इतिहासकार या स्वारींत मराठे विजयी झाले व हैदरास चांगलीच तंबी मिळाली असें म्हणतात. तेव्हां या तहाचा साकल्यें करून विचार करणें जरूर आहे. शत्रूकडून खंडणी घेणें हें जयाचें मुख्य गमक नव्हे. विजयाची खरी गमकें मुख्यतः दोन आहेत. पहिलें असें कीं, ज्या बाजूस जय मिळाला असेल त्या बाजूचें सामर्थ्य वाढलें पाहिजे, व दुसरें

असें कीं, पराजित बाजूनें सामर्थ्य घटलें पाहिजे. पण या तहावरूनतरी मराठ्याचे सामर्थ्य वाढलें व हैदरचें कमी झालें असें दिसत नाहीं.

सन १७७२ मध्यें तह न होतां जर युद्ध पुढे चालूं राहिलें असतें तर हैदरचा पूर्ण नाश झाला असतां कां ? या गोष्टीचाही विचार करणें जरूर आहे. परिस्थिति जर विचारांत घेतली तर असें दिसतें कीं, सर्व सरदार युद्धास कंटाळलेले होते. परशुराम भाऊ सारखा योद्धा जहागिरीची पर्वा न करितां घरीं जाणार होता. शेंकडों शिलेदार कोणास न विचारतां घरचा रस्ता सुधारीत होते. अशा परिस्थितींत युद्ध चालविणें कठीण होतें. माधवरावांची प्रकृति सुधारून जरी ते रणक्षेत्रावर आले असते तरी त्यांना युद्धाचा वीट आलेल्या सरदारांस पुन्हां युद्धास जुंपणें कठीण झालें असतें. थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, या युद्धानें मराठे रंजीस आले. माधवरावानें सर्व सरदारांस युद्धास उभें केलें असतें तरी यामुळें धान्य व वैरण यांची भयंकर महर्गता जाणवली असती. सतत २॥–३ वर्षे चालूं रहाणारी युद्धें पेशव्यांच्या अंगवळणीं फारशीं पडलीं नव्हतीं. केवळ १० वर्षांपूर्वीं निजाम व भोसले यांनीं पुणे, सातारा, विजापूर, नासिक वगैरे प्रांत जाळून पोळून फस्त केला होता. रयतेस नुकतीच स्वस्थता मिळाली होती. अनेक ठिकाणीं लोक घरेंदारें बांधून पुन्हां शेतीचा जम बसवीत होते. पुण्याहून सालोसाल किंवा साला आड कर्नाटकांत जाणारे सैन्य मुलुख तुडवून आणि खराब करून जातच होते. यामुळें धान्य व वैरण यांचा तुटवडा पडे, ठिकठिकाणची रयत नागवल्यामुळें जमाबंदीचे उत्पन्न कमी पडे. एवंच धान्य, वैरण व पैसा आणि सैन्य या तिन्ही बाबतींत पेशव्यांची स्थिति केविलवाणी होती. गोहदच्या जाटाच्या युद्धाच्या वेळीं दादासाहेबास शेकडा २० टक्के व्याजा-नेंही कर्ज मिळेनासें झालें होतें. पैशाच्या अभावीं 'उत्पद्यन्ते विलीयन्ते

दरिद्राणां मनोरथाः' अशी स्थिति झाली होती. व्यापार व उद्योग धंदे न वाढल्यामुळें पैशाचा पुरवठा होत नसे. सन १७६३ मध्येंच माधवरावानें आपल्या आईस पत्र लिहिलें होतें कीं, " शत्रू बलवत्तर झाले, तथापि पैसा असतां तरी सर्वही गोष्टी, इतकेही पेंच सांभाळून नीट होत्या. पैसा नाहीं तेव्हां फौज कशानें ठेवावी ? फौज नाहीं दौलत कशी राहणार ? असें बारीक बारीक पहातां सारेंच अवघड आहे " तेव्हां पैशाचा पेंच पेशव्यांस फार मोठा होता.

म्हैसोर प्रांतीं मराठ्यांचें सैन्य आलें म्हणजे हैदर सधन रयत उठवून दूर प्रांतीं नेई व ज्या प्रांतीं रणक्षेत्र उत्पन्न होई तो प्रांत अगदीं उध्वस्त करून टाकी. कित्येकदां तळीं फोडून तीही कोरडी ठणठणीत केली जात. शिवाय मराठे जी थोडी फार वस्ति असे तिची दुर्दशा करीत. सरपण नसले म्हणजे कोणाच्याही घराचीं किंवा छपराची लाकडें काढून न्यावीत, वैरण नसली तर छपराचे केंबळ काढून न्यावें, ठिकठिकाणीं जाळपोळ करावी, असा प्रकार चाले. यामुळें मराठ्यांचा तळ उध्वस्त मुलखांत पडलेला, मराठ्यांच्या उत्तर बाजूस म्हणजे मिरज, सातारा, पुणें, इकडील कांहीं भाग उजाड, व कांहीं कंगाल लोकांनीं भरलेला असे. मिरजचे पटवर्धन घराणें पेशव्यांना कर्नाटकांत आपलें राजकीय महत्व टिकविण्यास व वाढविण्यास फार उपयोगी पडलें. पण म्हैसोर कडील युद्धामुळें त्याची धुळधाण उडाली. गोपाळराव, माधवराव व निळकंठराव असे तीन पुरुष कामास आले. शिवाय त्यांना बरेंच कर्ज झालें. मराठ्यांचे सामर्थ्य या युद्धांत कमी झालें.

हैदरच्या बाजूनें पाहिलें तर असें दिसतें की, पालघट, कोचीन, व बिदनूर या प्रांतीं मराठे फिरकलेच नाहींत. तेथील प्रजा सधन होती.

धान्य, वैरण वगैरे त्यास भरपूर मिळे. रणक्षेत्र प्रत्यक्ष म्हैसोरच्या मैदानांतच असल्यामुळें त्याचे शिलेदार किंवा सरदार घरीं जाण्यास उत्सुक होऊन दंडेली करीत नसत. रट्टेहळ्ळी, अनवडी, मोतीतलाव इत्यादि लढायांत मार खाल्ल्यामुळें कित्येक हजार गारदी व घोडेस्वार नाश पावले. कित्येक तोफा व बंदुका मराठयांच्या हातीं लागल्या. हेंच त्याचें प्रत्यक्ष नुकसान झालें.

बिदनूर लुटून त्यानें अचाट लूट मिळविली होती. अनेक संस्थानिकांवर स्वाऱ्या करून पैसे मिळविले होते. तेव्हां सैन्याचा नाश झाल्यास नवीन भरती करावी, तोफा व बंदुका शत्रूंनीं हिसकल्यास नवीन शस्त्रास्त्रें तयार करावीं हें पैशाचें बळ असल्यामुळें त्यास सहज करतां येई.

मराठयांचें घोडदळ इतकें भारी होतें कीं, मैदानावरील लढाईंत त्यांनां तत्कालिन कोणत्याही शत्रूस सहज जिंकलें असतें. मराठयांचे मुख्य बळ घोडदळांत आहे हें जाणून आपल्या सैन्याची खराबी होऊं नये म्हणून हैदर मैदानावरील लढाई शक्य तितकी टाळीत असे एकीकडे तहाचें बोलणें बोलत रहावें व युद्ध लांबवीत जावें, हा मार्ग त्यानें चोखाळला होता. पावसाळ्यांत परत जाणें भाग पडून पुणें ते म्हैसोर अशा येरझारा घालण्यांत पेशव्यांचें बळ खर्ची पडावें, पावसाळ्यांत तळ देऊन राहिलेंच तर पैशाच्या टंचाईनें शत्रू बेजार व्हावा असा हैदरचा पेंच होता. आणि त्याच्या अटकळी प्रमाणेंच पेशव्यांची दुर्दशा उडे. श्रीरंगपट्टण, बेदनूर व बंगलोर हीं त्याचीं महत्वाचीं ठाणीं पण तीं घेण्याच्या भरीस मराठे कधीं पडलेच नाहींत. यामुळें त्याचें मोठें नुकसान झालें नाहीं.

तह मराठयांस फायदेशीर झाला असें म्हणावें तर तेंही नाहीं.

युद्धांत जो मुलूख काबीज केला होता तो त्यांस सोडून द्यावा लागला. हैदरनें प्रत्यक्ष २८ लक्ष रुपये दिले हाच काय तो फायदा. हप्त्यानें देऊं केलेली रक्कम ती वसूल करण्याकारितां जेव्हां कोणी प्रत्यक्ष युद्धास उभा राहून आपली खराबी करून घेण्यास तयार होईल तोपर्यंत द्यावयाची नाहीं हा तर त्याचा नेहमींचा शिरस्ता. हैदर कडून अठ्ठावीस लाख रु. मिळाले तर एकट्या पटवर्धनास १०।१२ लाख रु. कर्ज झालें, व अनेक सरदारांसही कर्ज झालें. एवंच या अडीच वर्षांच्या कालांत हैदराऐवजीं मराठे मात्र मेटाकुटीस आले.

मराठ्यांच्या अभिमान्यांनीं, ब्राह्मणांच्या पुरस्कर्त्यांनीं, इतिहास संशोधकांनीं, मुलांचा महाराष्ट्र लिहिणाऱ्या लेखकांनीं, हैदरच्या उदया-पासून मराठ्यांनीं म्हैसोरवर ज्या घोडदौडी केल्या त्यामुळें हैदर भंगला कीं मराठा खंगला हें विचारपूर्वक ठरवावें.



# भाग २ रा

## प्रकरण ६ वें

# हैदरची कुर्गवर २ री स्वारी

## सन १७७३ ते १७७६

माधवराव पेशवे मिरजेहून परत आल्यावर सन १७७२ मध्यें नोव्हेंबर १८ रोजीं क्षयरोगास बळी पडले. माधवराव सर्व पेशव्यांमध्यें अत्यंत हुशार, शूर व दूरदर्शी असा पेशवा होता. त्यांच्या अकाली मृत्यूबरोबर पेशवाईचा किंवा मराठेशाहीचा मृत्यु झाला असें मानण्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं.

मराठ्यांच्या घोड्यांचे लगाम उत्तरेकडे खेचले जातांच हैदरनें पुन्हां सैन्यांत नवीन भरती केली. पुण्यांत नारायणरावाचा खून झाला व त्यामुळें भाऊबंदकीचें बीज चांगलेंच रुजलें. या संधीचा फायदा घेऊन सन १७७२ च्या तहान मराठ्यांकडे गेलेले प्रांत परत मिळविण्याच्या कामगिरीवर हैदरनें टिपूची योजना केली व आपण स्वतः १७७३ मध्यें कुर्ग प्रांतात शिरला.

कुर्ग येथें लिंगायत राजे राज्य करीत असत व ते ब्राह्मणांचे कट्टे द्वेष्टे होते. सन १७७० मध्यें कुर्ग प्रांतीं वारसा बद्दल तंटे उत्पन्न झाले होते व त्याच वेळीं एका वारसाचा चुलता लिंगराज यानें हैदरची मदत मागितली होती. पण त्यावेळीं मराठ्यांशीं युद्ध चाललें असल्यानें हैदरला

कुर्गकडे जातां आलें नाहीं. तेव्हां मराठ्यांचें घोडदळ परत फिरतांच तो कुर्गकडे निघाला. तेथें देवाप्पा नांवाच्या एका वारसास कैदेंत ठेविलें. आणि आपल्यावतीनें राजपुत्रास गादीवर बसविलें व अशा रीतीनें कुर्ग प्रांतावर आपली छाप बसविली. नंतर मलबारांत जाऊन तेथें आपली सत्ता दृढ केली.

सन १७७४ मध्यें टिपूनें मराठ्यांनीं घेतलेल्या प्रांतांतील बराचसा भाग परत घेतला. इतक्यांत कुर्ग प्रांतांत जमीनदार लोकांनीं आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्याकरितां चोहोंकडून उठावणी केली. हैदरनें लागलीच मोठें सैन्य घेऊन कुर्गमध्यें प्रवेश केला व ज्यांनीं स्वातंत्र्य युद्धांत प्रामुख्यानें भाग घेतला होता त्यांस पकडून फांशीं दिलें.

हैदरचें चरित्र लिहिणारा इंग्रज ग्रंथकार मिस्टर लेविन बी बोरींग असें म्हणतो कीं, कुर्गमध्यें हैदरनें बरीच कत्तल केली. कुर्ग प्रांतीय मनुष्याचें जो कोणी एक डोकें आणून देई त्यास हैदर पांच रुपये इनाम देत असे हैदर प्रमाणेंच मि. एल्फिन्स्टिन नांवाचा इंग्रज गृहस्थ पांच आफ्रिडी लोकांना मारून आणणारास दोन गांवें इनाम देत असे.

सन १७७६ मध्यें म्हैसोरचा राजा चामराज मरण पावला. तेव्हां हैदरनें राजकुलांतील अनेक मुलें एकत्र केलीं व त्याजपुढें नाना प्रकारची खेळणीं टाकलीं. एका मुलानें रत्नखचित खंजीर हातांत घेतला त्या मुलास हैदरनें चामराजाचे गादीवर बसविलें. जें मूल हत्यार खेळावयास घेईल तें निश्चयानें शूर निपजेल असें नाहीं. राजाच्या अंगीं शूरत्व हा गुण उत्कटतेनें असला पाहिजे असें हैदरास वाटत होतें एवढें मात्र धावरून दिसतें.

नंतर हैदरनें बेल्लारीच्या पाळेगारावर झडप घातली. बेल्लारीच्या पाळेगाराची रग जिरविल्यानंतर गुत्तीच्या मुरारराव घोरपड्याचा सूड घेण्याकरितां तो गुत्तीस गेला. गुत्तीचा किल्ला फारच मजबूत होता व कित्येक दिवस वेढा घालून बसल्याशिवाय हातीं येण्यासारखा नव्हता. किल्यांत फौज चांगली होती. पण तेथें पाण्याची टंचाई मात्र फारच पडली. मुराररावानें आपली अडचण कोणास कळूं न देण्याचा प्रयत्न केला व तहाचें बोलणें लाविलें.

हैदर गुप्त बातम्या काढण्यांत अत्यंत कुशल होता. त्यानें किल्यांतील पाण्याच्या दुर्मिळतेची बातमी मिळविली व मुराररावास चांगलेंच पेचांत आणण्याकरितां तहाचा प्रश्न पुष्कळ दिवस घोळतच ठेविला. शेवटीं पाण्याचा दुष्काळ इतका जाणवला कीं, मुराररावास सर्व सैन्यासह हैदरास शरण जाणें भाग पडलें. मुराररावानें प्रत्येक युद्धांत मराठ्यांस मदत केली होती ह्मणून हैदरचा त्याजवर अत्यंत द्वेष होता. " मी तुझ्या शेजारीं आहे माझ्याशीं शत्रुत्व करूं नकोस. मराठे पुण्यास गेल्यावर तुझी माझ्याशीं गांठ आहे हें लक्षांत ठेव " असें हैदरनें पूर्वी मुराररावास बजाविलें होतें, पण मुराररावानें तें ह्मणणें मनावर घेतलें नव्हतें. तेव्हां या वेळीं मुरारराव शरण आल्यावर हैदरनें त्यास बिलकुल दया दाखविली नाहीं. मुराररावाची सर्व जहागिर जप्त केली. खंडणी ह्मणून दहा लक्ष रुपये वसूल केले व शेवटीं मुराररावास मुलाबाळासह काबालदुर्ग येथें कैदेंत ठेविलें व तेथेंच या शूर पुरुषाचा अन्त झाला.

मुरारराव हा शूर होता. त्याला ह्मसोरच्या रणभूमीची खडान्‌खडा माहिती होती. कर्नाटकांतील पाळेगारावर त्याचें चांगलें वजन होतें व दर एक मोहिमेंत पेशव्यांना त्याची बहुमोल मदत होत असे. पण दुर्दैवानें या शूर पुरुषास धारातीर्थी मरण न येतां तुरुंगांत आलें.

मुराररावाचा पाडाव झाल्यामुळें मराठ्यांचा एक मोठा साह्यकर्ता नाहींसा झाला एवढेंच नव्हे तर कर्नाटकांतील लहानलहान पाळेगारांना मराठ्यांच्या सहाय्यावर अवलंबून राहणें धोक्याचें वाटूं लागलें.

असो, माधवरावाच्या मृत्यूनंतर पेशवे दरबारीं काय कारस्थानें चालली होती तें पाहणें जरूर आहे. माधवरावाच्या हयातींत राघोबानें पेशवाईच्या अर्ध्या वाट्याबद्दल अनेक खटपटी करून पेशवाईवर संकटें ओढवून आणिलेलीं होतीं. परंतु माधवरावाची कर्तबगारी अतुल असल्यामुळें राज्य शकट सुरळित चालला होता. माधवरावाच्या मृत्यु नंतर राघोबा व तत्पक्षीय सरदार यांस चांगलेंच फावलें. पेशवाइला त्यावेळीं इंग्रज आणि हैदर हे दोन प्रबल शत्रु होते. त्यापैकीं हैदरशीं दादानें कल्याणदुर्गचा तह केला. या तहानें माधवरावानें १७६४ पासून १७७२ पर्यंत कमावलेला प्रदेश थोडासा नजराणा घेऊन देऊन टाकिला. शिवाय कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील सुमारें पाऊण कोट उत्पन्नाचा मुलुख दरसाल फक्त सहा लक्ष रुपये देण्याचा करार करून देऊन टाकिला. राघोबाला रास्ते व पटवर्धन या सरदारांचा विरोध होता व ह्यांच्या जहागिरीचा मुलुख हैदरास देऊं केलेल्या मुलखांत होता. ह्मणून या दोन सरदारांची सत्ता कमी करण्याच्या उद्देशानेंच राघोबानें हा डाव टाकला. दादानें हैदरास देऊं केलेल्या मुलुखांत नरगुंदकर भावे, गजेंद्रगडकर, घोरपडे मनोळीकर शिंदे, व सावनूरकर यांचीं संस्थानें होतीं. अशा रीतीनें मराठ्यांनीं आतांपर्यंत हैदरशीं लढाया करकरून जें कांहीं कमाविलें होतें तें सर्व गमाविलें.

राघोबाचें कृत्य पुणें दरबारास पसंत नसल्यानें बारभाईचें कारस्थान उत्पन्न झालें व मराठी फौजा दादाच्या पाठलागांत आणि इंग्रजांशीं

युद्ध करण्यांत गुंतल्या. ही संधि येतांच हैदरनें गुरुमकोंडे, शिरे, मदगिरी कडपे, कर्नुल वगैरे ठाणीं घेतलीं. गुत्तीचा पाडाव केल्यानंतर पटवर्धनांच्या मुलुखास उपद्रव देऊन तमाम पाळेगारांकडून हैदरनें खंडण्या वसूल केल्या. मिरेरेझा व टिपू मोठाली सैन्यें घेऊन सर्वत्र फिरत राहिले व सन १७७६ च्या अक्टोबर पर्यंत धारवाड प्रांतीं मराठ्यांचा बहुतेक सर्वत्र अम्मल उठविला.

धारवाडचा किल्ला हस्तगत करण्याकरितां हैदरनें एक अजब युक्ति योजिली. प्रथमतः मराठा किल्लेदाराकडे "मराठे जवळच आले आहेत व ते मदती करितां येत आहेत" असें एक बनावट पत्र पाठविलें नंतर आपल्या सैन्याच्या एका तुकडीस मराठे सैनिकांचा वेष दिला व त्यांजवर आपल्या सैनिकांकडून हल्ला करविला. हल्ला करणारांच्या बंदुकांतून बायबार निघत होते मराठी सैन्याचा वेष घेतलेले लोक धारवाडच्या किल्ल्यांकडे धावत गेले. किल्लेदारास मराठी फौजे मागें हैदरचें सैन्य लागलें आहे असा पूर्ण भास झाला ह्मणून त्यानें किल्याचे दरवाजे उघडून पळणाऱ्या सैनिकांस किल्यांत घेतले. किल्यांत प्रवेश होतांच या वेषधारी मराठयांनीं आंतील लोकांची कत्तल केली व त्यांस कैद केलें. अशा तऱ्हेनें धारवाडचे मजबूत ठाणें मराठ्यांच्या हातून गेलें. सन १७७६ च्या पावसाळयाच्या आरंभापर्यंत हैदरनें कृष्णा व तुंगभद्रा यांच्या मधील निम्यापेक्षां जास्त मुलूख मराठ्यांच्या हातून घेतला.

# भाग २ रा

## प्रकरण ७ वें.

# मराठ्यांची ६ वी स्वारी

## सन १७७६

हैदरची सत्ता अशा रीतीनें वाढत चालल्यामुळें पुणे दरबारास हैदरच्या पारिपत्याची योजना हातीं घेणें प्राप्त झालें. गेल्या दोन तीन वर्षांत राघोबाच्या मागें मराठी फौजा लागल्या होत्या. व त्यामुळें हैदरकडे मराठ्यांस लक्ष देतां आले नाहीं. सन १७७६ मध्यें मराठ्यांच्या फौजा गुजराथेंतून परत आल्या व हैदरच्या पारिपत्याची तयारी झाली. यावेळीं निजाम व पेशवे यांनीं मिळून स्वारी करावी असें ठरलें. निजामाकडून इभ्राहीम धौशा नांवाचा सरदार ४० हजार फौज घेऊन आला. पेशव्यांनीं हरिपंत तात्या फडके यांच्याबरोबर ६० हजार फौज दिली. हरिपन्ताच्या फौजेचें तीन वर्षांचें देणें तुंबले होतें व त्यामुळें त्यांचें निघणें लवकर होईना.

हरिपन्ताचें निघणें लवकर होईना व शत्रूनें तर मुलूख फारच खराब केला म्हणून पांडुरंगराव पटवर्धनानें पुणें दरबाराला सुचविलें कीं, मी पुढें जातो व हैदरचा सरदार श्रीपतराव शिवमोघे हा धारवाड प्रांतीं मुलूख खराब करीत आहे, त्यास पिटाळून लावतो. हरिपन्तानीं फौज घेऊन मागाहून यावें. ही कल्पना पुणें दरबारास पसंत पडल्यामुळें ६ आक्टोबर १७७६ रोजीं पांडुरंगराव मिरज सोडून निघाले. त्यांचे बरोबर कान्हेरेराव

पटवर्धनही होते. नरगुंदकर, मनोळीकर, गजेंद्रगडकर, वगैरे जमीनदारास पांडुरंगरावास मदत करण्याबद्दल पुण्याहून पत्रें गेलीं.

हैदरनें कोल्हापुरकरास दंगा करण्यास प्रवृत्त केलें व यामुळें कोल्हापुरकरांचा बंदोबस्त करण्याकरितां परशुरामभाऊ पटवर्धन यांस गुंतून पडावें लागलें व त्यांना पांडुरंगरावाबरोबर जातां आलें नाहीं. पटवर्धन मिरजेहून निघून म्हैसोरकडे चालले. डिसेंबरमध्यें त्यांनीं धारवाड कडील ठाणीं घेतलीं व तुंगभद्रे-अलीकडील प्रदेशांत मराठ्यांचा अम्मल प्रस्थापित केला. हैदरनें महमदअली कुमुदान या सरदाराबरोबर कवायती पायदळ व तोफा देऊन त्यांस श्रीपतराव शिवमोघे नांवाच्या धारवाड कडील सरदाराच्या मदतीस पाठविलें. कुमुदान हा हैदरचा कसलेला सेनापति होता. मराठ्यांकडील सर्व बारिक सारीक बातम्या त्यास कळत होत्या. मराठ्यांना मात्र हैदरकडील वार्ता मिळत नसे, कुमुदान जवळ सात हजार स्वार, दहा हजार पायदळ व अकरा तोफा होत्या. त्यानें रात्रीचा हल्ला करून मराठ्यांस तुडविण्याचा विचार केला व सन १७७७ मध्यें जानेवारी ८ रोजीं मराठ्यांस ही बातमी लागल्या-मुळें ते रातभर सावध राहिले. दुसरे दिवशीं मराठ्यांनीं कुमुदानवर हल्ला करण्याचें ठरविलें. मराठ्यांना हुलकावण्या दाखवून तोफांच्या माऱ्यांत आणावयाचें व नंतर चोहोंकडून मारा करून त्यांस कापून काढावयाचें असा कुमुदानानें बेत केला. व त्या बेतास अनुसरून सावशीच्या किल्या-जवळील तुरीच्या शेतांत सहा तोफा व पांचसहा हजार कवायती फौज लपवून ठेविली. किल्याच्या दोन्ही बाजूस साडेतीन हजारांची एक एक अशा दोन टोळ्या उभ्या केल्या व कांहीं लोक घेऊन तो किल्यांत राहिला.

मराठा दळ किल्ल्याजवळ आलें तेव्हां त्यास शत्रूचे स्वार मात्र दिसले यामुळें ते दल बेसावधपणें पुढेंच चाललें. मराठे पूर्णपणें तोफांच्या माऱ्यांत येतांच शत्रूनें आगीचा वर्षाव केला. मराठा सैन्यांत पळापळ सुरू होतांच स्वारांनीं पुढें घुसून कत्तल चालविली व मराठ्यांची पूर्ण दुर्दशा केली.

या लढाईत कान्हेरेराव ठार झाले. पांडुरंगराव, वासुदेव धोंडदेव, बहिरजी घोरपडे, निळकंठराव शिंदे, रामचंद्रपंत दातार, श्रीपतराव पटवर्धन जखमी होऊन शत्रूच्या हातीं लागले. शिवराम घोरपडे मुराररावाचा पुतण्याही पाडाव झाला. हत्ती, तोफा नौबती वगैरे सामान शत्रूच्या हातीं लागलें. शिवाय दोन हजार घोडेही त्यास मिळाले एवंच तीन चार हजार फौजेखेरीज सर्व फौज कापली गेली. या अनर्थानें मराठ्यांस मोठा धक्का बसला. शिवराम घोरपड्यास हैदरनें काबाल दुर्गावर कैदेंत ठेविलें. पांडुरंगराव पटवर्धन लढाईनंतर दहा अकरा महिन्यांनीं ज्वरानें कैदेंतच मृत्यु पावले. बाकीच्याकडून जबर खंडणी घेऊन चार वर्षांनीं बंधमुक्त केलें. या लढाईनें दक्षिण महाराष्ट्रांतील अत्यंत शूर अशा पटवर्धन घराण्याचा नाशच झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

सावशीचे लढाइचें अगोदरच राघोबाचा सरदार बाजीराव बर्वे हा हैदरकडे जाऊन राहिलेला होता व तो कुमुदखानास बरोबर घेऊन मराठीराज्याचा घांस हैदरच्या मुखांत कोंबीत होता. कोल्हापुरकराकडे बराच पैसा पाठवून त्यांना पेशव्यांच्या विरुद्ध चढाई करण्यास सांगितलें होते व त्याप्रमाणें ते वागतही होते. हैदरनें आजपर्यंत काय काय केलें ह्मैसोरचा राजवाडा लुटून राजास केवळ आपल्या हातांतील बाहुलें कसें

बनविलें, अनेक पाळेगारांचा मुलूख कसा घशांत घातला, मलबार व कुर्ग येथील हजारों लोकांना मेंढरांच्या कळपाप्रमाणें हाकून आणून त्यांची कशी दुर्दशा उडविली. हें कोल्हापूरकरांस व सर्व मराठा सरदारांस माहीत होतें. हैदरची चाल तुंगभद्रेच्या अलीकडे आली म्हणजे तो आपणांस गिळंकृत करील या भीतीनें कोल्हापूरकर व मिरजकर यांची मैत्री बनून त्यांनीं हैदरास विरोध करावयास पाहिजे होता. परंतु आत्मा रक्षणाचा निश्चित मार्ग कोणासच ओळखतां आला नाहीं असें इतिहासावरून दिसतें. कोल्हापूरकरांनीं दंगा केल्यामुळें महादजी शिंदे व परशुरामभाऊ यांस तेथेंच गुंतून पडावें लागलें.

सावशीच्या लढाईनंतर सन १७७७ च्या नोव्हेंबर पर्यंत मराठ्यांस आपल्या फौजा कर्नाटकांत लांबवर नेतां आल्या नाहींत. नंतर पुण्याहून हरिपंत तात्या फडके ६० हजार घोडेस्वारानिशीं आले व त्यांचे बरोबर परशुरामभाऊ पटवर्धनही आले. निजामाच्या वतीनें इब्राहिम धौशा ४० हजार सैन्य घेऊन मदतीस आला. पण धौशा ही मराठे सरदारांच्या गळ्यांतील एक मोठी धोंड होती. तो केव्हांही हरिपंताबरोबर कूच करीत नसे. मागें रेंगाळत किंवा मध्येंच कोठेंतरी थांबे. कर्नल विल्कस् आणि ग्रँडडफ यांचें ह्मणणें असें आहे कीं, हैदरनें धौशा आणि निजाम यांवर सुवर्ण मात्रेचा प्रयोग केला होता. हैदर हा निजामावरच सुवर्ण मात्रेचा प्रयोग करून थांबला नाहीं, त्यानें मानाजी शिंदे नांवाच्या एका सरदारांस फितविलें व मानाजीनें ऐन लढाईचे वेळीं, हैदरास मिळण्याचें कबूल केलें. मानाजीस उघडपणें तसें करितां येईना तेव्हां हैदरनें मानाजीचा पत्रव्यवहार हरिपन्ताचे हातीं पडेल अशी व्यवस्था केली. सन १७७८ च्या सुमारास हा फितूर उघडकीस आला व त्यामुळें

हरिपन्त व परशुरामभाऊ यांनीं मानाजीचा गोट लुटला. सन १७७७ नोव्हेंबर पासून सन १७७८ च्या एप्रिल पर्यंत मराठ्यांच्या व हैदरच्या अगदीं किरकोळ लढाया झाल्या. एप्रिलमध्यें मोरोबादादा फडनीस यांनीं पुण्यास मोठाच गृहकलह उत्पन्न केला. त्यामुळें पुणें दरबारनें हरिपन्तास परत बोलाविलें. हरिपन्त परत गेल्यामुळें हैदर मराठ्यांच्या काचांतून पूर्णपणें मुक्त झाला.

हैदरचा पूर्ण मोड होण्याचा संभव माधवरावाचे वेळींच होता. त्यावेळीं तो नुकताच उदयास येत होता त्यामुळें त्याचें बळ अल्प होतें. पण त्यावेळीं, तो फारच हुशारीनें वागला. स्वपरबलाची योग्य तुलना करून शक्य तोंवर समोरासमोरची लढाई टाळावी व युद्ध पुष्कळ काळ चालू ठेवावें हें धोरण त्यानें स्वीकारल्यामुळें माधवरावा सारखा मानी व शूर सेनापति रणांगणावर आल्यावर सुद्धां तो बचावला. अत्यंत कुशलतेनें वागत असतांही एक दोन प्रसंगीं त्याची पूर्ण दुर्दशा उडाली. मोतीतलावाच्या लढाई नंतर मराठ्यांनीं अत्यंत चिकाटीनें जर त्याचा पाठलाग केला असतां तर कदाचित् त्याच्या चरित्रास निराळेंच वळण लागण्याचा संभव होता. परंतु कांहीं वेळां स्वबुद्धीच्या जोरानें तर कांहीं वेळां प्रतिपक्षाच्या बुद्धिदौर्बल्यामुळें तो सर्व संकटांतून निभावला. सन १७५८ पासून १७७८ पर्यंतच्या काळांत एकसारखी तरवार हातांत बाळगून संग्राम करित राहिल्यामुळें व नाना अडचणींशीं एकसारखें झगडल्यामुळें त्याच्या नैसर्गिक तीव्र बुद्धीला अनुभवाची जोड मिळाल्यामुळें ती तीव्रतर झाली व युद्धाकरितां लागणारा धनसंचय शस्त्रसामुग्री, उत्तम सैन्य व सेनापति वगैरे सर्व गोष्टी त्यास प्राप्त झाल्या. याचें उलट मराठ्यांचा धन संचय नाहींसा होऊन, माधवराव, विठ्ठल शिवदेव, गोपाळहरी, मुरारराव, कान्हेरेराव वगैरे वीर मृत्युमुखीं पडून

मराठ्यांची हानी झाली. शिवाय पेशवाईच्या अध्र्यावाट्याचें खूळ वाढल्या-मुळें मराठ्यांची सत्ता वाढविण्यास व टिकविण्यास लागणारी मनो-भूमिकाच नष्ट होऊन मराठे सरदारांचे स्वातंत्र्य देवीच्या उपासकांचे स्वरूप जाऊन ते स्वार्थांचे दास बनले. एवंच माधवरावाचें मृत्यूनंतर मराठे व ब्राम्हण सरदारांचे सर्व व्यवहार संस्थानिष्ठ असण्या ऐवजीं व्यक्तिनिष्ठ बनलें व यामुळें हैदरचा पराभव होण्याचें काम अशक्य झालें.

# भाग २ रा

## प्रकरण ८ वें

मराठे पुण्याकडे गेल्यानंतर हैदरला दक्षिणेंत वाटेल तें करण्यास आयतीच संधि मिळाली. चितळदुर्गच्या पाळेगारानें मराठ्यांस मदत केली होती ह्मणून सूड घेण्याकरितां स० १७७९ मध्यें हैदरनें चितळ दुर्गवर स्वारी केली. चितळदुर्गचा किल्ला फार मजबूत होता व त्याचें रक्षण तेथील बेडर लोक मोठ्या शौर्यानें करीत होते. पण चितळदुर्ग कराच्या सैन्यांत तीन हजार मुसलमान शिपाई होते. त्यांना एका फकीरामार्फत हैदरनें फितविलें. त्यामुळें तो मजबूत किल्ला पडला व पाळेगारास शरण जाण्याखेरीज दुसरामार्ग राहिला नाहीं. हैदरनें पाळेगारास बिलकुल क्षमा केली नाहीं. चितळदुर्गकर आपल्या शूर बेडर लोकांच्या सहाय्यानें मराठ्यांस मदत करी व हैदरास त्रास देई. आपल्या शत्रूचा कांटा समूळ काढावा अर्धवट खुडूं नये हें तत्व हैदरास चांगलें माहीत होतें. त्यानें चितळदुर्गकरांची सर्व संपत्ति लुटली व पाळेगारास श्रीरंगपट्टण येथें कैदेंत ठेविलें. ज्या बेडर लोकांनीं आजपर्यंत त्याला त्रास दिला होता त्यापैकीं तीस हजार लोकांना त्यानें पकडून नेलें व अनेकांचें धर्मान्तर करून त्यांजकडून लष्करी नौकरी करून घेतली.

चितळदुर्ग काबीज करण्याचें काम चाललें असतांना हैदरचा मेहुणा अलिरेझाखान हा कडाप्पा घेण्याच्या कामगिरीवर होता, पण त्याला तें काम पार पाडतां येईना. तेव्हां चितळदुर्ग घेतल्यावर हैदर तातडीनें कडाप्पाकडे गेला. तेथील नवाबाजवळ कडवे अफगाण सैनिक होते ते हैदरास दाद देईनांत. परन्तु हैदरचें घोडदळ फार मोठ होतें

यामुळें सर्व अफगाण सैनिकांना घोडदळानें वेढा घातला व त्यांचा पाडाव केला. ज्या शूर शिपायांनीं इमानानें वागण्याचें कबूल केलें त्यांस हैदरानें मोठ्या आनंदानें आपल्या सैन्यांत दाखल करून घेतलें परन्तु कैद केलेल्या शिपायापैकीं ८० जणांनीं आपलें हत्यार खालीं ठेवण्याचें नाकारिलें.

हैदरला या मानी शिपायांबद्दल आदर उत्पन्न झाला व त्यानें आपला शस्त्र संन्यासाचा हुकूम परत घेतला व त्या मानी शिपायासह कूच केलें. अपमानाचें शल्य मर्मस्थानीं टोचल्यामुळें ते शूर शिपाई एकेरात्रीं एकदम उठले व पहारेकऱ्यांस ठार करून हैदरच्या तंबूवर चाल करून गेले. त्यावेळीं हैदर तंबूच्या कनातीस भोंक पाडून पळून गेला.

मलबारांतील कित्येक हजार लोकांना त्यानें श्रीरंगपट्टणच्या पठारावर हांकून आणिले होते. कुर्गमध्यें अनेकांना फांशीं दिलें होतें. चितळदुर्गकडील वीस हजार लोकांना हांकून नेऊन कित्येकांना इस्लामचा अंगिकार करावयास लाविले होते. पण या लोकापैकीं कोणीही हैदरच्या जिवावर उठला नाहीं. मलबार कुर्ग वगैरे प्रांतीं असंतुष्टतेमुळें हैदरची सत्ता झुगारून देण्याचा कित्येकांनीं प्रयत्न केला, कित्येकांनीं स्वातंत्र्य युद्धही पुकारलीं. पण मारूं किंवा मरूं असा निर्धारच नव्हता असें ह्मणावें लागतें. या ऐशीं अफगाणांच्या ठिकाणीं जें पाणी दिसून आलें, सूडाची जी बळकट भावना दिसून आली तशी सूडाची बळकट भावना ज्या वीस हजार लोकांना त्यानें कैद केलें त्यापैकीं शें दोनशें लोकांत जरी उत्पन्न झाली असती तरी हैदरचा अन्त व्हावयास वेळ लागताना. हीं दोनशें माथेफिरूंना कोण सांभाळूं शकेल ? आणि सांभाळावयाचें ठरविलें तरी किती दिवस सांभाळतां येईल. ?

हिंदूंच्या अंगांत दीर्घद्वेष नाहींच. कोणी अत्याचार केल्यास हिंदू कांहीं वेळ रडेल, ओरडेल, सूड घ्यावा असें ह्मणेल. पण थोडासा काल जातांच तो सर्व अपमान विसरेल, अफगाण आणि हिंदू यामध्यें हाच फरक प्रामुख्यानें दिसतो. अफगाणाच्या अन्तःकरणाची जखम भरून येत नाहीं तर हिंदूच्या अन्तःकरणाची जखम फार जलदीनें भरून येते. या मनोवृत्तीचें उत्कृष्ट उदाहरण रजपूत कुमारिकांचें बाबतींत दिसून येतें. आरंभीं आरंभीं पातिव्रत्य राखण्याकरितां अनेक रजपूत स्त्रियांनीं जोहार केले. व त्या जोहारांची वर्णनें वाचलीं म्हणजे त्यांच्याबद्दल अत्यंत आदर उत्पन्न होतो. पण पुढें काय घडलें ? बापाचा किंवा पतीचा वध करून, किंवा राज्य हिरावून जेव्हां हिंदू रजपूत स्त्रियांना मुसलमान राजे घेऊन जात तेव्हां त्या एखाद्या शेळीप्रमाणें जनानखान्यांत दिवस काढीत. बाप किंवा पति यांच्या निधनाबद्दल त्या कष्टि होत, कांहीं दिवस अन्नपाणीही वर्ज करीत पण कांहीं दिवसांनीं आपलें पातिव्रत्य भंग करणाराची प्रेमानें वाट पहात बसत.

मुसलमान स्त्रियांची वागणूक जरा थोडी भिन्न दिसते उदाहरणार्थ बाबरानें आपल्या आजीबद्दल पुढील प्रमाणें उल्लेख केला आहे. तो ह्मणतो " माझ्या आजाचा शत्रू जमालखान यानें आजा यूनसखान व आजी इसान दौलत बेगम यांना पकडले व आजीला एका सरदाराच्या हवालीं केले. पुढें तो सरदार तिच्याकडे आल्याबरोबर तिनें खोलीचा दरवाजा बंद करून घेतला व जागच्या जागीं त्या पुरुषाचा खून केला. " जमालखानाला ही खुनाची बातमी समजल्यावर त्यानें इसानदौलत बेगमला तू खून कां केलास असें विचारलें. त्या बरोबर त्या बाईनें ताडकन् उत्तर दिलें कीं, ' मी युसफखानाची बायको असतांना तूं मला दुसऱ्याला

देऊन टाकलेस ह्मणून मी त्याचा प्राण घेतला. तुझी इच्छा असेल तर माझा प्राण घे."

अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला यानें एकदां रोहिल्याची एक कुमारिका धरली तेव्हां तिनें खंजीर खुपसून सुजाचा प्राण घेतला. देवलदेवीनें तर आपलें पातिव्रत्य भंग करणाराला विनंति केली कीं, माझ्या मुलीलाही घेऊन ये. देवलदेवीच्या विनंतिवरूनच कर्णरायास वेरूळ येथें मारून कमलदेवीस मुसलमानांनीं पकडून नेलें. रजपूत किंवा अन्य स्त्रियांनीं जर मुसलमान स्त्रियाप्रमाणें आपलें पातिव्रत्य भंग करणाराशीं वर्तन केलें असतें किंवा आत्महत्या करून देहाचा त्याग केला असतां तर त्यांचे पातिव्रत्य भंग करण्याची कोणाचीच छाती झाली नसती. स्त्रियांनीं तेज दाखविल्यावर भ्रष्ट विचार, पापी मन आणि अन्यायी पुरूष यांचा कितीसा निभाव लागणार ? अल्लाउद्दिनासारख्याशीं गांठ पडल्यावर युक्ति आणि साहस यांच्या योजनेनें आपला व आपल्या पतीचा बचाव करणारी पद्मिनी विरळा. जो जन्मतः गुलाम असतो त्यासच दास बनवितां येतें. बैलास गाडीस जोडून रस्त्यांतून फिरवतां येतें पण सिंहास पिंजऱ्यांत घालून मोठ्या बंदोबस्तानें इकडून तिकडे न्यावें लागतें व म्हणूनच बैलांचे किंवा गाईचे खिल्लार बाळगितां येतें पण सिंहाचें व सिंहिणीचें बाळगितां येत नाहीं.

असो सन १७७९ पर्यंत हैदरनें दक्षिणेंत आपली सत्ता चांगलीच दृढ केली.

# भाग २ रा

## प्रकरण ९ वें.

# इंग्रजांशीं २ रें युद्ध

## १७७९ ते १७८२

कडाप्पाचा पाडाव केल्यानंतर हैदरनें सावनूरच्या नबाबाच्या मुलाला आपली मुलगी दिली व नबाबाच्या मुलीशीं आपल्या करीम नांवाच्या मुलाचें लग्न लावलें; व अशा तऱ्हेनें सावनूरकरांशीं कायमचें सख्य जोडलें.

सन १७७४ च्या अखेरीस इंग्रजांनीं राघोबाला बरोबर घेऊन खंडाळ्याचें घाटानें वर येऊन पुण्यावर चाल केली. परंतु महादजी शिंद्यानें वडगांव येथें इंग्लिशांचा पराभव केला. इंग्रज एत्तद्देशीय राजांच्या राजकारणांत नसती ढवळाढवळ करून सर्वांचेंच राज्य गिळंकृत करीत आहेत हें जाणून नाना फडणविसांनीं एक नवीनच व्यूह रचिला. नागपूरकर भोसले, पेशवे, निजाम आणि हैदर या सर्वांनीं मिळून इंग्रजांचें हिंदुस्थानांतून उच्चाटण करावें असा हा बेत होता. या बेतांत हैदरला अनुकूल करून घेण्याकरितां पुणें दरबारचा वकील गोपाळराव हा हैदरच्या दरबारीं आला. हैदरची विचारसरणी अशी होती कीं, शक्य तर इंग्लिशांशीं सख्य राखावें परंतु मराठ्यांशीं मात्र सख्य करूं नये. ही विचारसरणी पुढील कारण परंपरेमुळें ठरलेली होती.

मराठ्यांशीं संगनमत करून इंग्लिशास हाकून दिल्यास मराठ्यांचा एक प्रबळ शत्रु नाहींसा होणार होता व हा शत्रु नाहींसा झाल्यास मराठे

सर्व हिंदुस्थानांत प्रबळ होणार होते. दिल्लिपतशाहींत कोणतेंच सामर्थ्य शिल्लक न राहिल्यामुळें मराठ्यांचा उत्तर हिंदुस्थानांत सर्वत्र संचार होण्यास कांहींच अडचण नव्हती. मराठ्यांचे राज्य स्वधर्मीयांवर होते. मराठी सत्ता सुमारें शंभर वर्षांपूर्वी स्थापन झालेली असल्यामुळें तिची पाळेमुळें पुष्कळ खोल रुझलेली आहेत. तेव्हां इंग्लिशांचा जोर कमी झाल्यास आपण परधर्मीय लोकांवर स्थापूं पहात असणारें साम्राज्य मराठ्यांपुढें टिकणार नाहीं असें त्यास वाटत होतें व ह्मणून तो मराठ्यांस साह्य करण्यास मनापासून तयार नव्हता. उलटपक्षीं इंग्रजांच्या मदतीनें जर मराठ्यांस नामोहरम करितां आलें तर दक्षिण हिंदुस्थानांत दोनच सत्ता इंग्रज आणि हैदर–उरणार व मग एकट्या इंग्लिशांस रणांगणावर चित करणें कठीण नाहीं असें त्यास वाटत होतें. हैदरास फक्त इंग्लिशांच्या आरमाराची मोठी भीति वाटत होती व इंग्लिशांच्या तोडीचें अरमार तयार झाल्याशिवाय केवळ जमीनविरील लढायांत कितीही विजय संपादन केलें व अनेक इंग्लिश सेनापतींना धूळ चारून कैदेंत टाकीलें तरी इंग्लिशांचा पूर्ण पराभव होत नाहीं अशी खात्री होती व ह्मणून माही बंदरासारखी बंदरें सुधारून आरमार तयार करण्याचा त्याचा नेटाचा प्रयत्न चालला होता. पूर्ण प्रभावी अरमार तयार होण्याच्या अगोदर इंग्लिशांशीं कायमचें वैर उत्पन्न करूं नये व तें तयार होईपर्यंत इंग्लिशांशीं सख्य राखून मराठ्यांस शक्यतर आधीं बुडवावे व आरमाराची तयारी झाल्यावर इंग्रजांशीं वैर करण्यास हरकत नाहीं अशी हैदरची विचार परंपरा होती व म्हणून त्यानें इंग्लिशांनीं १७६९ सालच्या तहाप्रमाणें मराठ्यांची स्वारी आल्यावर मदत करावयास पाहिजे होती ती त्यांनीं केली नाहीं तरी इंग्लिशांशीं सलोख्यानें वागण्याचें धोरण सोडिलें नाहीं. परंतु महमदअलीनें इंग्रज आणि हैदर यांचे सख्य होऊं दिलें नाहीं. शिवाय इंग्रजांनाही हैदरशीं स्नेह करणें नकोच होतें.

इंग्लिशांना मराठ्यांपेक्षां हैदरची भीति जास्त वाटत होती.

पेशवे दरबारीं गादीबद्दल तंटे उत्पन्न झाले आहेत. डी बायन सारखे पाश्चात्य सेनानी पदरीं बाळगून मराठे जरी कवायती फौजा उत्पन्न करीत असले तरी स्वतः पाश्चात्य शास्त्रांचा व कलांचा अभ्यास करीत नाहींत; आंग्र्यासारख्या दर्यासारंगाशीं युद्ध करून थोड्या फार नाविक दळाचा स्वतःच उच्छेद करीत आहेत, मेलकोटसारख्या देवळांना आगी लावून स्वधर्मीयांचा रोष उत्पन्न करून घेत आहेत; मराठ्यांचे घोडदळ जेथपर्यंत उभे आहे तेथपर्यंतच त्यांच्या ताब्यांत नवीन आक्रमण केलेला मुलूख राहतो; कागदावरचे वजन दूर केले म्हणजे जसा कागद दूर उडून जातो त्या प्रमाणें घोड्याची टाप दूर होतांच मराठ्यांचा मुलूखही हातचा जातो, हैदरवर अनेक स्वाऱ्या करूनही मराठ्यांस आपला फायदा करून घेतां आला नाहीं कि त्याचा उच्छेद करितां आला नाहीं; म्हैसोरचा राजवाडा लुटला; मलबारच्या व कुर्गच्या व चितळदुर्गच्या हजारो लोकांना मेंढ्यांच्या कळपाप्रमाणें हाकून आणून कित्येकांना इस्लामचा अंगिकार करावयास लाविले, तरी सर्व हिंदु सरदारांनीं एकी करून परधर्मीयाबद्दल सूड घेतला नाहीं. इत्यादि अनेक गोष्टींचें इंग्लिशांनीं सूक्ष्म अवलोकन केलेलें असल्यामुळें मराठ्यांची त्यांना मोठीशी भीति वाटत नव्हती व हें उघड होय.

उलटपक्षीं हैदर हा जातिवंत योद्धा आहे व हुषार मुत्सदी आहे, अत्यंत धाडशी व प्रयत्नवादी आहे; हें इंग्रज जाणून होतें, थोड्याच वर्षांपूर्वी हैदर मद्रासजवळ पांच मैलावर आल्यामुळें डीप्हला नाकधूऱ्या कशा काढाव्या लागल्या, याची आठवण ताजी होती. लढाऊ जहाजें सालोसाल बांधून आरमारी बळ वाढविण्याची हैदर पराकाष्ठा करीत आहे

हे इंग्रज डोळ्यांनीं पहातच होते व ह्मणून मराठ्यांपेक्षां हैदराकडूनच आपल्या वाढत्या सत्तेला जास्त धोका आहे अशी इंग्रजांची खात्री झालेली होती व म्हणून त्यांना प्रथमत: हैदरचा नाश व्हावा असें वाटत होतें.

इंग्रज, मराठे आणि हैदर यांचे हेतु वरील प्रकारचे होते. हैदरनें एकदोन वेळां इंग्रजांशीं सख्य करण्याचा प्रयत्न करून पाहिला होता व त्यांत त्याला यश आलेलें नव्हतें. तथापि पेशव्यांचा वकील हैदरची मदत मागावयास आल्यानंतरही हैदरनें इंग्लिशांच्या विरुद्ध हत्यार उचलण्याची गर्दी केली नाहीं. पण याच वेळीं युरोपमध्यें इंग्रज आणि फ्रेंच यांच्यामध्यें लढाई जुंपली व त्यामुळें या दोन्हीं पक्षांच हिंदुस्थानांतही युद्ध जुंपले.

इंग्रजांनीं पांडेचरी सन १७७८ च्या शेवटीं काबीज केली व १७७९ च्या मार्च महिन्यांत माही बंदर घेतलें, माही हें हैदरच्या ताब्यांत होतें. पाश्चात्यांचें बल नवीन प्रतीच्या शास्त्रांत व आरमारांत आहे हें हैदरांस पूर्णपणें कळल्यामुळें त्यानें पाश्चात्य युद्धकला व शस्त्रास्त्रें उचलली होती व अरमार वाढविण्याकरितां व पाश्चात्य देशांतून युद्धोपयोगी सामान आणण्या-करितां उत्तम बंदरें आपल्या ताब्यांत ठेवण्याचा तो फार प्रयत्न करीत होता. अर्थात् इंग्रजांनीं माही बंदराचा केलेला पाडाव त्या मानधन व शूर वीरास कसा सहन व्हावा ?

हैदरनें इंग्लिश वकिलामार्फत मद्रासच्या गव्हरनरला कडक पत्र लिहिलें व इंग्लिशांनीं आज पावेतों कोणतें गैरवर्तन केलें तें निदर्शनास आणिलें. व इंग्लिशांतर्फे मि. ग्रे नांवाचा वकील आला होता त्याचा अप-मान करून त्यास पाठविलें व नंतर तो मराठे व निजाम यांस मिळाला.

मराठे व निजाम यांच्याशीं हैदरचा जो तह झाला त्या तहानें

असें ठरलें कीं मराठ्यांनीं बेरार, मध्यहिंदुस्थान आणि उत्तर हिंदुस्थान इकडे चाल करावी व हैदरनें मद्रास आणि दक्षिण हिंदुस्थान या भागांतून इंग्लिशास पिटाळावें. हैदरनें प्रामाणिकपणानें युद्धाची तयारी केली व ८३ हजार सैन्य रणांगणावर आणिलें. सैन्यास सामानसुमान, दाणा व वैरण मिळण्याची उत्तम व्यवस्था केली. शत्रुकडील बातमी काढण्याचें गुप्त पोलिसांचे जाळेंही सर्वत्र पसरलें. यश मिळविण्याची खात्री झाल्यानंतर सन १७८० च्या जुलई महिन्यांत हैदरचें सैन्य प्रचंड झंझावाताप्रमाणें दौडूं लागलें व तें सर्व प्रदेश उध्वस्त करीत मद्रासजवळ नऊ मैलावर येऊन थडकलें.

हैदरनें आपले बेत इतके गुप्त राखिलें होतें कीं, मद्रासकरांना हैदर येणार आहे याची वार्ताही नव्हती. सेंटथामस जवळ जेव्हां आगी लागूं लागल्या तेव्हां इंग्लिशांस शत्रू आला हें कळालें व नंतर ते बचावाची तयारी करूं लागलें. इंग्लिशांची तारांबळ उडाली. कर्नल हार्परला तातडीनें दक्षिणेकडे जाण्याची परवानगी मिळाली. कर्नल ब्रेथवेटला चिंगलपेठच्या बाजूनें मद्रासकडे बोलाविलें व अशारीतीनें क. हारपर, क. ब्रेथवेट, सर हेक्टरमन्रो वगैरे सेनानी आपआपलीं दळें घेऊन लढण्यास सिद्ध झाले. कांजीवरम्, पेरमूबाकम् वगैरे ठिकाणीं लहानसहान चकमकी झाल्या. सन १७८० सेपटेंबर ९ रोजीं क. फ्रेचर आणि कर्नल बेली पेरमूबाकमूकडून कांजीवरमूकडे कूच करीत होते. इतक्यांत शत्रुनें तोफा डागल्या व त्यामुळें इंग्रज सैन्याची पांगापांग होऊं लागली. परंतु रात्रीच्या वेळीं, चिखलांतून तोफा पुढें ढकलून पाठलाग करणें अशक्य होते म्हणून हैदरचा आगीचा मारा बंद झाला. तोफांचा मारा बंद झाल्यावर इंग्लिश सैन्यानें रात्र तेथेंच काढली. या संधीचा फायदा टिपूनें पुरेपूर घेतला. इंग्लिश सैन्याच्या वाटेवर उत्तम मान्याच्या ठिकाणीं त्यानें रातोरात

आपल्या तोफा नेऊन ठेविल्या व ता.१०सप्टेंबर रोजीं इंग्लिश सैन्य सुमारें दोन मैल गेलें नाहीं तोंच या पितापुत्रांनीं मागून व पुढून हल्ले चढविले. इंग्लिशांनींही लढाईची शिकस्त केली पण तोफांच्या माऱ्यापुढें व घोडदळाच्या हल्ल्यापुढें कांहींहीं न चालून क. बेलीनें कत्तलबाजी थांबविण्यासाठीं आपलें निशाण नमविलें.

हैदरच्या लोकांनीं बेसुमार कत्तल केली. फ्रेंच लेखक असें म्हणतात कीं, "हैदरनें या लढाईत दोन हजार इंग्रजांना कैद करून श्रीरंगपट्टणला पाठविलें. क. बेली व क. बेर्ड ( Baird ) या दोघांसही कैदेंत खितपत पडावें लागलें." इंग्रज ग्रंथकार असें म्हणतात कीं, "हिंदुस्थानांत केव्हांही इंग्रजांचा इतका मोठा पराभव कोणींही केला नाहीं." दर्यादौलत महालांत या लढाईची चित्रें भिंतीवर काढलेली होतीं व त्यापैकीं, अद्यापही कांहीं शिल्लक आहेत.

या वेळीं कलकत्त्यास वारन् हेस्टिंगज् सारखा शूर मुत्सद्दी होता. त्याला इंग्रजीसत्तेचा उत्छेद होण्याची वेळ आली आहे असें वाटलें म्हणून इंग्रजीसत्तेचा बचाव करण्याची तो पराकाष्ठा करूं लागला. त्यानें लागलीच सर आयर कूट सारख्या घस्मर योध्यास सर्वाधिकार देऊन म्हैसोरच्या रणभूमीवर पाठविलें. कूट १७८१ च्या नोव्हेंबर मध्यें आला. कूट येण्याच्यावेळीं हैदरनें अर्काटला वेढा घातला होता. अर्काटच्या संरक्षकांनीं टिपूच्या सैन्याची खूपच नासाडी केली. तथापि हैदरनें हल्ला करून तें स्थल हस्तगत केलें. नंतर हैदरनें इंग्लिशांचे किल्ले घेण्याचा प्रयत्न केला पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. कूटनें चिंगळपेटचा वेढा उठविला व नंतर तो वांदिवाश येथें लेफ्टनन्ट फ्लिंटच्या मदतीस गेला. फ्लिंटजवळील दारूगोळा संपत आला होता पण कूटची मदत आल्या-

दा. क्र. ८५६०

मुळें हैदरचें सैन्य वेढा उठवून निघून गेलें.

इतक्यांत फ्रेंचांचें अरमार मद्रास जवळ आलें व त्यामुळें कूटला युद्धसामुग्री मिळणें कठीण झालें. फ्रेंच जहाजांना अडवून धरण्याकरितां कूट पांडीचरीकडे गेला पण त्याला आपलें हेतु सिद्धीस नेतां आलें नाहींत. कूट नंतर कुडालूरकडे गेला. हैदर कूटला चैन पडूं देईना. तो एकसारख्या घिरट्या घालून लचके तोडी पण प्रत्यक्ष समोरासमोर लढाईचा प्रसंग टाळी. अशा स्थितींत चार महिने निघून गेले. नंतर कूटनें चिदंबरम्‌वर हल्ला केला पण त्यावेळीं इंग्लिश सैन्यास माघार घेणें भाग पडलें. पुढें क. ह्यूगसचें अरमार मद्रासहून आलें त्यामुळें कूटला सामुग्री मिळाली व त्यानें पुन्हां चिदंबरम्‌वर हल्ला करण्याचें ठरविलें. ही बातमी हैदरला लागतांच २॥ दिवसांत १०० मैलांची भरारी मारून तो गुडालूर व इंग्लिश सैन्य यांचें मध्यें येऊन उभा राहिला.

ता. १ जुल सन १७८२ रोजीं सर आयरकूट यानें आपलें सैन्य हालवून शत्रूशीं सामना देण्याचा प्रयत्न केला. हैदरनें इंग्लिशांवर तोफांचा भयंकर मारा केला व घोडदळांचेंही हल्ले केले पण इंग्लिशांनीं शर्थीनें वाट काढली व कूट हैदरच्या सैन्यास पिटाळून पोर्टोनोव्होजवळ तळ देऊन राहिला. हैदरच्या सैन्यांतील सुमारें दहा हजार सैनिक ठार व जखमी झाले व म्हणून हैदरला लढाईतून पाय काढावा लागला.

ह्या यशामुळें बंगालमधून येणारे सैन्य कूटला मिळूं शकलें. यावेळीं टिपू वांदिवाशला वेढा घालून बसला होता, त्यास वेढा उठवून परत फिरावें लागलें. अशा तऱ्हेनें लहान मोठ्या चकमकी व कित्येकदां निकराचे सामने होतच राहिले. शेवटीं कूटला निश्चित यश मिळेल असें वाटेना व म्हणून तो सेनाधिपत्य सोडण्याच्या तयारीनें मद्रासला गेला.

कूट हा म्हातारा झालेला होता. मद्रासचा गव्हर्नर त्याला सोडीना त्यानें वेलोरचा वेढा उठविण्याची कामगिरी त्यावर लादली. हैदरनें वेलोर सर्व बाजूनें वेढले होते व तो शिवलिंगगड येथें होता. वेलोर येथील अन्नसामुग्री संपल्यामुळें तें पडण्याच्या बेतांत होतें. वेलोरवर तावडतोब हल्ला चढवावयाचा नसल्यामुळें हैदर थोडा स्वस्थ होता व त्यानें आपलें बैल व घोडे चारणीस पाठविलें होतें. कूट वेलोरकडे येत आहे असें समजतांच हैदरनें जनावरें आणविली व युद्धाची तयारी केली. कूटच्या आघाडीवर हैदरनें तोफांचा भयंकर मारा केला. परंतु इंग्लिश तोफखान्यानें यावेळीं फारच चांगली कामगिरी करून हैदरच्या सैन्यास मागं रेटले. इंग्लिशांच्या पिछाडीवर हैदरचें घोडदळ तुटून पडलें व इंग्लिशसैन्य गारद होण्याच्या बेतांत होते. तथापि इंग्लिशांनीं नेट करून हैदरच्या सैन्यास मागें रेटिलें. तेव्हां इंग्लिशांचा पिच्छा न पुरवतां हैदरचें सैन्य परत फिरलें. दोन्ही पक्षांची हानि बरीच झाली. हैदरचे पांच हजारापेक्षां जास्त लोक रणांगणीं पडले तथापि जयश्रीनें कोणत्याही पक्षाच्या गळयांत माळ घातली नाहीं.

कूटनें नंतर वेलोर येथें जें इंग्लिश सैन्य अडकून पडलें होतें त्यास रसद पोहोचती केली. याप्रमाणें हैदरशीं युद्ध चालले असतांच मद्रासच्या गव्हर्नरला कंपनीच्या डायरेक्टराकडून डच लोकांचें पारिपत्य करण्याबद्दल हुकूम आला. तेव्हां हैदरनें डच लोकांशीं तह केला व या तहान्वयें इंग्लिशांचा नागूर प्रांत डचांनीं हैदरास द्यावा व हैदरनें डचास मदत करावी असें ठरलें. परंतु क. ब्रथवेट यानीं नागूर शहर घेतलें व नागापट्टणही घेतलें यामुळें कांहीं काल हैदरास आपलें सैन्य घाटाखालील प्रदेशांतून काढून घ्यावें लागलें. श्री. सरदेसाई यांनीं लिहि-

लेल्या भारतवर्ष नांवाच्या पुस्तकांत कूटनें हैदरचा पराभव शिवलिंगगड येथें केला आहे असें म्हटलें आहे. परंतु इं. ग्रंथकार मि. लेविन बोरिंग ह्मणतो कीं, " The engagement can not, however, be said have been in any way decisive, although, Haidar's loss is alleged to have exceeded 5000 men" पण सन १७८२ च्या फेब्रुवारींत टिपूनें क. ब्रेथवेट याचा पूर्ण पराभव करून त्यास कैद केलें. ही लढाई तीन दिवस चाललेली होती व शेवटीं टिपूकडील फ्रेंच सैनिकांनीं बायानेट चार्ज करून इंग्लिश फौजचा नाश केला.

लढाइच्या पूर्वी जें चौकडीचें कारस्थान झालें होतें त्यांत निजामानें सरकार प्रांत, राजमहेंद्री व मच्छलीपट्टण इत्यादि भागांतून इंग्रजांस पिटाळावें असें ठरलें होतें. परंतु निजामानें कांहींच केलें नाहीं. तो अगदीं स्वस्थ राहिला व युद्धाचा सर्व भार एकट्या हैदरावरच पडला, हेस्टिंग्जला निजामाला चौकडींतून फोडावयाचेंच होतें. तेव्हां त्यानें गंटुर परगणा निजामास परत देण्याचें ठरविलें, त्यामुळें निजाम चौकडींतून फुटला. पुढें हेस्टिंग्जनें नागपूरकर भोसल्यास फोडून त्याच्या प्रांतांतून इंग्लिश फौज ग्वाल्हेरकडे नेण्याची परवानगी मिळविली. व कर्नल करनॅक यानें अचानक ग्वाल्हेर प्रांतीं जाऊन ग्वाल्हेरी पगडीवाल्यास धक्का दिला. महादजी शिंद्यास धक्का बसल्याबरोबर मराठे व इंग्रज यामध्यें १७८२ च्या १७ मे रोजीं महादजी मार्फत सालबाईचा तह झाला व मराठे युद्धातून दूर झाले.

चौकडीचें कारस्थान होतानांच कोणीही इंग्रजाशीं पृथक्पणें तह करूं नये असें आणा शपथा घेऊन ठरलें होतें. मराठ्यांनीं इंग्रजांशी सवता तह करून पूर्वीचें वचन मोडलें एवढेंच नव्हे तर तहांत नववें कलम असें

घातलें कीं, " हैदर अलीनें इंग्रजाचें व महंमद अलीचे घेतलेलें प्रान्त परत करावें. " व हें कलम हैदरास न विचारतां घालून ते कलम पाळण्याची जबाबदारी महादजीनें पत्करली.

चौकडीच्या कारस्थानांतील निजाम, पेशवे व भोसले यांनीं हैदर प्रमाणें जर मनापासून युद्ध चालविलें असतें तर, इंग्रजांना हिंदुस्थान सोडून जाण्याखेरीज दुसरा मार्गच नव्हता. महादजी शिंदे व इंग्रज यांच्या गेल्या सहा सात वर्षांत ज्या कटकटी झाल्या होत्या त्यामुळे उत्तर हिंदुस्तानांत इंग्रज मेटाखुटीस आले होते. हैदरनें दक्षिणेस इंग्रजास बेजार करून यांचा पुष्कळसा मुलूख काबीज केला होता. व म्हणून युद्ध सर्वांनीं सर्वत्र सारख्या नेटानें चालविलें असतें तर इंग्लिशांचे उच्चाटण होण्यास वेळच लागता ना.

हिंदराजे एकत्र झाल्यास आपणांस हिंदुस्थान सोडून जावें लागेल असें इंग्रज मुत्सद्यांना सतत वाटत होतें. ता. १६-४-१८१८ रोजीं एल्फिस्टन म्हणतो. " आम्ही एकेक राज्यें घशांत घातलीं, म्हैसुरास नवा राजा केला, नागपुरास केला आणि आतां साताऱ्यास केला. पण न जाणो शिंदे आपल्या वर उलटेल, होळकर त्यास सामील होईल. निजाम आम्हावर उलटेल. किंवा शीख आणि गुरखे हे सुद्धां फिरतील तर मोटा कठीण प्रसंग येईल. नुसती एक ठिणगी पडण्याचा अवकाश आहे कीं आमचें राज्य पत्त्यांच्या घराप्रमाणें कोसळून पडेल. अजीर्ण होईपर्यंत खाऊं नये हें बरें. इतकीं सगळीं राज्यें खालसा करून असलेल्या अंदाधुंदीत आम्ही भरच घातली आहे. बाजाराव केवळ आपल्या भित्रेपणामुळें आमच्या कबजांत आला. सन १८१४ त तो आमचेवर उठला नाहीं याचें कारण केवळ भित्रेपणा. थोडी छाती त्यानें केली असती तर त्यावेळीं आमचा निभाव लागला नसता."

एल्फिन्स्टननें ह्मटल्याप्रमाणें इंग्लिशांचें राज्य १७८२ मध्यें पत्त्यांच्या घराप्रमाणें पडण्याच्या बेतांत होतें. पण तें कां पडलें नाहीं? केवळ महादजीचा मित्रपणा, एकदोन धक्के बसल्याबरोबर तहास तयार झाला. हैदरची खंडेरावानें धूळदाण उडविली, माधवरावानें रटेहळ्ळी, अनवडी, इत्यादि ठिकाणीं भयंकर मार दिला. मोतीतलावाचे लढाईंत डोंगरा डोंगरानें पळून जावें लागलें तरी तो कधींच तहास सहजासहजीं तयार झाला नाहीं. पण महादजी मात्र एकदोन धक्क्याबरोबर तहास कबूल झाला एवढेंच नव्हे तर ' हैदरनें इंग्रजांचा व महंमदअल्लीचा मुलूख परत द्यावा ' असलें कलम हैदरची संमति न घेतां घालून बसला व शेवटीं तें कलम पार पाडण्याची जबाबदारीही त्यानें पत्करली.

हा तह झाल्याबरोबर सर आयरकूटनें १२–७–१७८२ रोजीं हैदरास इंग्लिशांच्या मुलुखांतून सैन्य काढून नेण्याची सूचना दिली. त्यावेळीं हैदरनें उत्तर दिलें कीं, मला मुळींच न विचारतां मला बंधनकारक गोष्टी ठरविण्याबद्दल तुमच्या व मराठ्यांच्या अकलेची तारीफ करावी तेवढी थोडीच. तथापि तहाची नक्कल घेऊन तुमचा वकील पाठवा व मग मी आपलें ह्मणणें कळवितो. कूटनें लागलीच श्रीनिवासराव या नांवाच्या वकीलास हैदरकडे पाठविलें.

हैदरनें इंग्रज कसे दगाबाज आहेत हें सर्व पुराव्यानिशीं प्रतिपादन केलें आणि निक्षून सांगितलें कीं, छाती असेल तर निजाममराठ्यांसह तुम्ही माझें सामन्यास या आणि माझी करामत पहा. आज दोन वर्षें जो मी या प्रांतांत तळ देऊन बसलों आहे, तो नुसतां हात हालवित तुमच्या सांगण्याप्रमाणें परत जाण्यासाठीं नव्हें आणि परत जाण्याचीच माझी मर्जी झाल्यास मग तुमच्या हुकमाची तरी मला काय जरूरी आहे? हल्लीं या प्रांतांतून

एका पैशाचीसुद्धां तुम्हांस प्राप्ति होत नाहीं व मी ती होऊं देणार नाहीं.

इंग्लिशांना हैदरचा पराभव करितां येईना व ता सालबाईच्या तहाचें नववें कलमही पाळीना. तेव्हां इंग्रजांनीं महादजीनें त्या कलमाची जामिनगिरी पत्करली होती म्हणून त्याचे मागें तहाची पूर्तता करून द्या म्हणून टुमणें लाविलें. महादजीनें सन १७८२ च्या आक्टोबर मध्यें हैदरास नवव्या कलमाप्रमाणें इंग्रजांचा मुलूख सोडून जाण्याबद्दल दरवडावणीचें पत्र लिहिलें. लाख दीडलाख फौज म्हैसोरच्या रणभूमीवर आणिली तरी जो यत्किंचित् भीत नस तो या महादजींच्या पांढऱ्या कागदाला व काळ्या शाईला थोडीच भीक घालणार? त्यानें महादजीच्या पत्रास केराची टोपली दाखविली.

असो. भोसले, पेशवे व निजाम हे सर्व युद्धांतून निघून गेले, व युद्धाचा सर्व भार एकट्यावरच पडला. फ्रेंचांची मदत येणें अशक्य होतें. साठ वर्षांचें वय होऊन गेलें होतें. पूर्वसंचित बल कांहींही नसता स्वतःच्या पराक्रमानें शिपायापासून वाढून तो आज लाख दीडलाख फौजेचा नायक झालेला होता. मृत्यु कॅन्सरच्या रूपानें पाठीवर स्वार झाला होता. तथापि हा मानी वीर डगमगला नाहीं. अत्यंत कठिण प्रसंगीं न डगमगणें हा गुण त्याचें ठायीं उत्कटतेनें वसत होता.
" आपत्काळीं शैलही आदळो कां- धांकेना जो गाजवी धैर्य डंका ".
हें वर्णन त्यास पूर्णपणें लागूं पडत असे. ' अनारंभोहि कार्याणाम् प्रथमं बुद्धिलक्षणम् । आरब्धस्यान्त गमनं द्वितीयं बुद्धि लक्षणम् ' अगोदर कोणतेही कार्य करण्याच्या भरीस पडूं नयें, व एकदां कोणतेही कार्य हातीं घेतल्यावर तें शेवटास नेल्याशिवाय राहूं नये ही त्याची वागण्याची

पद्धत होती. म्हणून सर्व बाजूंनीं जरी कोंडमारा झाला तरी त्यानें इंग्लिशांबरोबर चाललेलें युद्ध यशस्वी रीतीनें चालूंच ठेवलें.

मराठ्यांनीं इंग्लिशांबरोबर जो तह केला त्याबद्दल त्याला अत्यंत क्रोध आला. पूर्णय्या नांवाचा हैदरचा प्रधान होता त्याजजवळ तो असें उद्गारला कीं,

मी मोठी चूक केली असें मला वाटतें. लक्षावधि रुपये खर्चून मी काय मिळविलें ? इंग्लिशाचें आणि माझें कांहीं बाबतींत वितुष्ट आहे हें खरें, पण दीर्घ प्रयत्नानें कदाचित् मला इंग्लिशांशीं सख्य राखता आलें असतें. महमदअल्ली हा सर्वांत नीच आणि विश्वास घातकी आहे तथापि इंग्लिशांशीं सलोख्यानें वागतां आलें असतें. क. ब्रेथवेट क. बेली सारख्या अनेक सेनापतींचा धुव्वा उडवून व त्यांना कैदखाना दाखवून इंग्रजांना पादाक्रांत करणें कठीण आहे. मी जमीनीवर इंग्लिशांचा पूर्ण नाश करीन पण तेवढयानें काम कसें भागेल ? ज्या अथांग सागरांतून हे इंग्रज येतात त्या अगाध सागराला मी कोठें व कसा अडवूं शकेन ? मराठ्यांवर कोणत्याही शहाण्या माणसानें विश्वास टाकूं नये असें असतांना मी या युद्धांत पडतांना मराठयांवर किती विश्वास टाकावा याचा विचार करावयास पाहिजे होता तो केला नाहीं.

या उद्गारावरून मराठयांचेंबद्दल हैदरचें मत कसें झालें होतें याची स्पष्ट कल्पना येते. तसेंच इंग्लिशांच्या पराजयाची गुरुकिल्ली त्यांच्या अरमाराचा नाश करण्यांत आहे हें त्यास स्पष्ट दिसत होतें. तत्कालीन राजपुरुषांपैकीं कोणासही इंग्लिशांचा नाश काय केलें असतां होईल हें स्पष्टपणें समजल्याचें दिसत नाहीं. माही, मंगलोर वगैरे बंदरा-

बद्दल हैदरला जे अगाध प्रेम वाटत होतें व तीं बंदर ताब्यांत ठेवण्याचा त्याचा आटोकाट प्रयत्न चाललेला होता तो आरमार वाढविण्याकरितांच होय. इंग्लिशांशीं कांहीं काल सख्य राखावें हें जें हैदरला वाटत होतं तें आरमार वाढविण्याकरितां कांहीं काल मिळावा याकरितांच होय.

इंग्रजांना हिंदुस्थानांतून हांकून देणें हें काम जरी कठीण-नव्हे जरी, अशक्य प्राय होतें, तरी हैदर युद्धांतून पाय माग घेईना. यावेळीं फ्रान्समधून हैदरच्या मदतीला सैन्य येत होतें परंतु इंग्लिश अरमारानें त्यास रोखून धरिलें. फ्रेंच व इंग्लिश अरमारांच्या अनेक चकमकी झाल्या परन्तु निश्चित असें यश कोणासच मिळालें नाहीं. पण त्यामुळें हैदरास मदत मात्र वेळेवर मिळूं शकली नाहीं. शेवटीं फ्रेंचांचें एक जहाज किनाऱ्यास येऊन पोहोंचलें पण त्यांतून फक्त १२०० सैनिक आले. बुसी हा त्यांचा नायक होता. कूटची छावणी जवळच होती परन्तु कूट व बुसी यापैकीं कोणीच कोणावर हल्ला करीना. दोन बोके जसें उग्र चेहरे करून व शेपटी फेंदारून समोरासमोर उभे राहतात तशांतलाच हा प्रकार चाललेला होता.

अर्णी येथें हैदरचा दारुगोळ्याचा मोठा सांठा असे त्यावर एकदम झडप घालावी असा कूटनें बेत केला व तो अर्णीकडे गेला. लागलीच टिपू लालीसह मोठें सैन्य घेऊन निघाला. कूट किल्याजवळ येऊन टेकतों न टेकतों तोंच टिपू व लाली तेथें जाऊन थडकलें. स्वतः हैदरही दुसरें दिवशीं आला. यामुळें कूटचा अर्णीवर हल्ला घालण्याचा बेत फसला. नंतर कूटनें हैदरशीं युद्ध करण्याकरितां चाल केली. पण हैदर सारख्या भराऱ्या मारी. कूटला बरेंच फिरविल्यानंतर एकदां

मोठ्या युक्तीनें त्याला अडचणीच्या जागीं गांठलें व आपली घोडी इंग्रजावर घालून इंग्लिश सैन्य तुडविलें व त्यांचा चांगलाच धुव्वा उडविला.

सर आयरकूट हा इंग्लिशांकडील अत्यंत शूर व कसलेला सेनापति होता. त्याची व हैदरची ही शेवटची चकमक उडाली व तींत हैदरनें आपल्या अकलेच्या बळावरच कूटसारख्या सेनापतीस तंबी दिली. या चकमकीनंतर हे दोघेही शूर सेनापति एका वर्षाचे आंतच मृत्यु पावले.

नंतर आगष्ट महिन्यांत मुंबईहून क. हंबरस्टनच्या अधिपत्याखालीं मलबार किनाऱ्यावर इंग्लिश आरमार आलें. क. हंबरस्टन यानें कालिकत घेतलें. व दुसरेही लहानसान किल्ले घेतले तेव्हां टिपू अत्यंत त्वरेनें आक्टोबर मध्यें मलबारांत गेला व तेथें त्यानें इंग्लिश सैन्यास जोराचा प्रतिबंध केला. तथापि पावसाळ्यामुळें मोठ्या जोराच्या चकमकी झाल्याच नाहींत. दोन्हींकडील सैन्यें पावसामुळें स्वस्थच राहिलीं. इंग्लिश सैन्य मद्रासला गेलें. फ्रेंच सैन्य कुडालूरकडे गेलें व हैदर अर्काटच्या उत्तरेस सोळा मैलावर तळ देऊन राहिला. हैदरच्या पाठीला कन्सर झालेलें होतें व त्यामुळें नरसिंगगड येथें छावणींतच सन १७८२ डिसेंबर सात रोजीं तो मरण पावला.

# भाग ३ रा

## प्रकरण ९ वें.

# हैदरचा स्वभाव व कर्तबगारी

हैदर हा मध्यम उंचीचा पुरूष होता. त्याचें नाक अणकुचीदार असून डोळे लहान होते. खालचा ओंठ विशेष जाड होता. लहानपणीं नानाप्रकारचे कष्ट केल्यामुळें शरीर अत्यंत राकट बनलेलें होतें. तो दाढी किंवा कल्ले राखीत नसे. दागिन्यांचा त्याला शोक नव्हता. शेंदरी रंगाचें मोठें वसकट पागोटें तो घालीत असे. लढाईचे प्रसंगीं त्याचा पोषाख पांढरा असे.

सर्व सरकारी कामकाज तो स्वतः पहात असे व सर्व पत्रव्यवहार अत्यंत नियमितपणें करी. स्मरणशक्ति अत्यंत तीव्र असल्यामुळें एखादा कागद किंवा पत्रव्यवहार गहाळ करणें किंवा दडवून ठेवणें कारकुनांस अशक्य होत असे. पत्रव्यवहारावर ﮬ ﮬ याप्रमाणें तो सही करी. हें चिन्ह ह्मणजे अरबी अक्षर ه हय् हें होय.

हैदर अगदीं गरीबींतून वाढला. त्याला लहानपणीं कोणत्याही प्रकारचें शिक्षण मिळालें नाहीं तरी तो मोठ्या योग्यतेस चढला. हा एक मोठा चमत्कार आहे असें जर पुष्कळांस वाटलें तर त्यांत नवल नाहीं. घोड्यावर बसण्यांत तो अत्यंत तरबेज असे. एकदां २० तासांत ९८ मैल तो निघून गेला हें लक्षांत ठेविलें ह्मणजे त्याच्या शरीरसामर्थ्याची

कल्पना येते. हातांत तरवार घेऊन समोरासमोर लढाई करण्याच्या कामांत त्याचा हात धरणारा तत्कालीन वीर कोणीही नव्हता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. शिवाय त्याला उत्तम नेम मारतां येत असे.

शत्रूस अडचणींत कसें गांठावें, सैन्याच्या हालचाली कशा कराव्यात, हल्ला करण्यास कोणती रणभूमि पसंत करावी या गोष्टींचें त्यास उत्तम ज्ञान असे. घोडदळाचा हल्ला तर तो इतक्या उत्तम रीतीनें करी कीं त्यानें एकदा हल्ला चढविल्यावर यशःप्राप्ति हटकून होत असे. लढाईला सुरवात झाली ह्मणजे जिवाची पर्वा न करितां तो सर्व प्रकारच्या धोक्यांत स्वतःचा जीव घालून लढे, यामुळें त्याचे सैनिकांस वीरश्री येई. त्याला मनुष्याची पारख फार चांगली असे व या गुणामुळें नेमकीं उत्तम माणसें निवडून त्यांना लष्करी शिक्षण देऊन त्यानें आपले सेनापति तयार केले होते.

स्त्रियांच्या बाबतींत हैदरचें वर्तन गर्हणीय नव्हतें असें दिसतें. याचा अर्थ परकीय स्त्रियांचा त्यानें उपभोग घेतला नाहीं असा नव्हे. लढाईमध्यें एखादी अत्यंत सुंदर स्त्री मिळाली तर तिला तो जनानखान्यांत ठेवीत असे व असें करणें त्या कालीं निंद्य मानलें जात नसे. सुंदर स्त्रीच्या मोहानें हैदर कोठेंतरी कांहींतरी करीत राहिला असें मात्र कधींच घडलें नाहीं. स्त्रीकरितां कोणावर स्वारी केली नाहीं किंवा आपलें कोणतेंच बल खर्चीं घातलें नाहीं. सुप्रसिद्ध अकबर बादशहानें "भूप कल्याणराग" शोधून काढणाऱ्या, व अत्यंत मधुर गायन करणाऱ्या अशा सौंदर्य संपन्न राणी रूपमतीचा अभिलाष धरून तिच्या पतीला ह्मणजे बाझबहादूरला "तुझी पत्नि मला दे" असा निरोप पाठविला व बाझबहादूरनें ही अत्यंत अन्यायमूलक मागणी मान्य केली नाहीं

म्हणून त्याजवर स्वारी केली. दुसऱ्या चार्लसनें मुंबईच्या गव्हर्नरला "हिंदुस्थानांतून चौदा चौदा वर्षांच्या दोन शिद्दी मुली पैदा करून पाठवाव्या. त्या मिळतील तितक्या ठेंगू व सुंदर असाव्यात. विशेषत: मार्गांत खलाशी लोक त्या मुलींचें पातिव्रत्य भ्रष्ट करणार नाहींत अशी सक्त तजवीज ठेवावी" असें लिहिलें होतें. तसेंच नानासाहेब पेशव्यांनीं नारोशंकरास ११ जून १७४३ सांत आज्ञा केली कीं, 'दोन पोरी खुबसुरत दहादहा वर्षांच्या, हिंदु शुद्ध, जरूर खरेदी करून पाठवाव्या. "या शिवाय श्रीमंत स्वामीची हर्मास दिल्लीहून आणिली. चार हजार रुपये खर्च केले. पांच पोरी उत्तम आणविल्या. त्यांत दोन तीन काय जे स्वामीचे खुशीस येईल ते देऊं." तेव्हां हैदरच्या पूर्वकालीन, तत्कालीन, व उत्तरकालीन राजपुरुषांनीं कायकाय केलें हें जर सर्व लक्षांत घेतलें तर हैदरनें सहजासहजीं मिळालेल्या ४-६ स्त्रिया जनानखान्यांत ठेवून घेतल्या होत्या एवढ्यावरून तो मोठा स्त्री लोलुप होता असें म्हणण्याचें कारण नाहीं.

हैदरनें आपल्या धन्याशीं कृतघ्नपणानें वर्तन केलें व तो सर्वाधिकारी झाला. या मुद्याचें विवरण करतांना पुढील गोष्टी लक्षांत घेणें जरूर आहे.

(१) प्रथमत: म्हैसोरचें राणीनेंच खंडेरावाच्या मध्यस्तीनें नंदराजास [दिवाणास]दूर सारून हैदरचे हातीं सत्ता दिली. तिला पुढें हैदरचा त्रास झाल्यामुळें हैदरवर तिनें हल्ला चढविला व यावेळीं तो पळून गेला. खंडेरावानें विश्वासघात केला होता म्हणून त्यास हैदरनें कैद केलें.

(२) यापुढें नंदराजाच्या [ दिवाण ] मदतीनें त्यानें कांहीं सैन्याचें आधिपत्य मिळविलें. नंदराजानें पुढें मराठ्यांशीं

सख्य जोडण्याचा प्रयत्न केला ह्मणून त्याचा हैदरनें नाश केल.

(३) चिक्कृष्णराय मृत्युपावल्यानंतर १७६६ मध्यें त्याच्या वडील मुलाला ह्मणजे नंदराजास गादीवर बसविले. नंदरज स्वतः सर्व राज्यकारभार हातीं घेऊं लागला ह्मणून हैदरानें राजवाडा लुटला व नंदराजास नामधारी राजा केलें.

(४) नंदराजानें मराठ्यांशीं संधान बांधलें ह्मणून त्यास ठार केलें व चामराजास गादीवर बसविलें.

(५) चामराजाचे मृत्युनंतर राजकुलांतील सर्व मुलें जुळवून जो मुलगा शूर निघेल असें हैदरास वाटलें त्या मुलास त्यानें गादीवर बसविले. त्या राजपुत्राचेंही नांव चामराजच होते. एवंच हैदरनें सत्ता मिळविली पण ही सत्ता मिळवितांना त्यानें मूळच्या राजवंशाचा पूर्ण नाश केला नाहीं. किंवा आपण होऊन दुसऱ्याची सत्ता घेण्याचा प्रयत्न केला नाहीं. अल्लाउद्दिनानें सत्तेकरितां केलेला चुलत्याचा खून, औरंगजेबानें आपल्या भावांची केलेली दुर्दशा, अवरंगजेबानें अनेक राजपुत्र ग्वालेरच्या किल्यांत कैद करून ठेविले व विष घालून जिवें मारिलें. राघोबानें केलेला पुतण्याचा वध वगैरे निंद्य कृत्याप्रमाणें हैदरनें मूळच्या राजवंशांशीं निंद्य वर्तन केलें कीं काय हें वाचकांनींच ठरवावे. पेशव्यांनीं साताराची गादी राखण्याचा प्रयत्न शेवटपर्यंत केला तसेंच हें खूळ हैदरनेंही दाखविलें होतें, असें ह्मटल्यास चालेल.

हैदर हा साधू नव्हता तेव्हां त्याचें वर्तन अत्यंतिक नैतिक नियमांच्या कचाट्यांत घालून पहाणें योग्य होणार नाहीं. तत्कालिक जे पुरूष होऊन गेले, किंवा इंग्लिश राजवटींत आपल्या सत्तेचा उदय व्हावा ह्मणून ज्यांनीं दीर्घ प्रयत्न केले त्यांच्या वर्तनाशीं व कृत्यांशीं हैदरच्या वर्तनाचें व कृत्यांचें तुलनात्मक परीक्षण केलें तर तो मोठा दुष्ट किंवा कृतघ्न होता असें ह्मणतां येणार नाहीं. मूळ राजघराण्यांतील पुरुषांचा निष्कारण वध करणें वगैरे पाप त्यानें केलें नाहीं. नामधारी कां होईना पण राजा ही पदवी मूळघराण्याकडे त्यानें राहू दिली. धाडसी व महत्वाकांक्षी पुरुष सर्व सत्ता हातीं घेण्याकरितां जितकी सर्वसामान्यतः खटपट व लटपट करितो तितकीच हैदरनें केली. इतिहासकारांनीं जें मोठें पाप त्याच्या माथीं मारिलें आहे तें मात्र त्यानें केलें नाहीं.

अरमाराचें महत्व त्यास उत्तम पटलें होतें व ह्मणून बंदरें मिळविणें, जहाजें तयार करणें याकडेही त्यानें लक्ष दिलें. लिहितां वाचतां येत नव्हतें तरी जेव्हां ह्मैसोर दरबारीं पगार थकल्यामुळें शिपायांनीं बंड केलें, त्यावेळीं जमाखर्चांत लक्ष घालून त्यानें शिपायांचे पगार देऊन टाकण्याची युक्ति काढली. यावरून त्याची कुशाग्र बुद्धि दिसून येते. हैदरची स्मरणशक्ति अत्यंत दांडगी होती. बारीकसारीक सर्व गोष्टी त्याच्या लक्षांत रहात. अनेक गोष्टीकडे एकाच वेळीं त्यास अवधान देतां येत असें; उदाहरणार्थ नाटक, नाच किंवा गाणें चालू असतांना, कारकुनास महत्वाचीं पत्रें लिहिण्यास मजकूर सांगणें, व कारकुनांनीं वाचून दाखविलेली पत्रें ऐकणें हीं सर्व कामें तो एकदम करी व अशा अनेक गोष्टी एकदम करीत असतांना सुद्धां तो चुका करीत नसे.

निरनिराळे राजवाडे बांधून त्यानें सुखाचा उपभोग घेतला. लालबाग सारखी उत्तम बाग तयार केली, निरनिराळया ठिकाणचे किल्ले

दुरूस्त करून ते मजबूत केले. यावरून सारें आयुष्य जरी लढाईंत गेलें तरी सुखोपभोग घेण्याच्या कामीं तो बेफिकीर नव्हता असें दिसून येईल. सायंकाळीं बहुधा गायन आणि नृत्य यांत तो वेळ घालवीत असे.

हाताखालील नौकर जोपर्यंत आपलें काम प्रामाणिकपणें करीत आहे तोपर्यंत तो कोणत्या धर्माचा आहे याचा तो विचार करीत नसे. धर्माच्या बाबतींत तो उदासीन असे, असें ह्मणावयास हरकत नाहीं. ह्मैसोर जवळील चांमुडा टेकडीवर देवीस मनुष्याचा बळी देत असत ती दुष्ट चाल हैदरनें बंद केली. ह्मैसोरचा देवराज यानें हिंदूंच्या देवळांचा नाश करून पैसे मिळविले. मराठेही हैदरचा पराभव झाला असतांना त्याचा पाठलाग न करितां देऊळें लुटींत आणि त्यास आग लावीत बसले, मग हैदरनें कांहीं देवळास उपसर्ग दिला तर तेवढ्यावरून त्याला हिंदु धर्म द्वेष्टा असें म्हणतां यावयाचें नाहीं.

मलबारमधील अनेक लोकांना हैदरनें ह्मैसोरच्या पठारांवर हांकून आणिले, कुर्गमधील लोकाची कत्तल केली, चितळदुर्गकडील २००० हजार लोकांना पकडून नेले, इत्यादि हकीगतीवरून तो मोठा क्रूर होता असें वाटण्याचा संभव आहे पण वस्तुस्थितीचा निराळ्या रीतीनें विचार केला पाहिजे. जे लोक हैदरची सत्ता मानीत नसत, त्याला प्रत्यक्ष विरोध करीत, त्यांचाच फक्त तो नाश करी किंवा छळ करी. अकबर बादशहास आपण चांगला म्हणतो पण त्यानें सुद्धां चितोडवर स्वारी केली तेव्हां अनेक निरपराधि लोकांची कत्तल केली, विहिरींतून विष घालून कित्येक लोकांस मारिले. १८५७ सालीं निरपराधी इंग्लिश लोकांची हिंदूंनीं कत्तल केली तर बंड मोडतांना इंग्लिशांनीं निरपराधी हिंदूंची कत्तल केली. एवंच राजसत्तेशीं जेव्हां झगडा सुरू होतो तेव्हां कित्येक निरपराधी लोकांची कत्तल होणें स्वाभाविक असते. पोर्तुगीजांनीं तर एकदा कित्येक मागचांचे

हातपाय तोडून ते सर्व गलबतांत घालून कालिकतच्या राजाकडे पाठविले व भाजी करून खा असा निरोप पाठविला. तेव्हां हैदर क्रूर होता कीं नाहीं तें १९४० सालच्या दृष्टीनें न ठरवतां हैदरच्या वेळीं इंग्लिश, डच, फ्रेंच, मराठे व मुसलमान कसें वागत, तें पहाणें जरूर आहे व या सर्वांच्या कृत्यांचा विचार केला तर हैदरचें वर्तन क्रूर पणाचें होते असें निश्चयात्मक म्हणतां यावयाचें नाहीं. दुसरें असें कीं, हैदर जर क्रूर, जुलमी व लहरी असतां तर लाख दीडलाख फौजेचें अधिपत्य पत्करून अगदीं सुव्यवस्थित रीतीनें त्यास एकसारख्या लढाया मारित आल्या नसत्या. त्याला नानाप्रकारचीं संकटें येत गेलीं असतीं.

कितीही मोठें संकट आलें तरी तो गडबडून जात नसे. हैदरच्या जिवावरचे प्रसंग पुढील प्रमाणें आहेत.

१ खंडेराव व म्हैसोरची राणी यांनीं हैदरचा नाश करण्याचा प्रयत्न केला तेव्हां सर्वस्वाचा त्याग करून २० तासांत ९८ मैल पळून जावें लागले.

२ मराठ्यांनीं १७७१ मध्यें पूर्ण पराभव केल्यामुळें तो एकटा पळाला.

३ अफगाण शिपायांनीं रात्रीं एकदम तंबूवर चाल केली.

४ १७७२ सालच्या मराठ्यांच्या स्वारीमुळें त्यास बेदनूरच्या अरण्यांत पळून जावें लागलें.

पण या सर्व संकटांतून तो बचावला एवढेंच नव्हे तर पुन्हां तयारी करून त्यानें आपले हेतु सिद्धीस नेलें. लढाईच्या वेळीं तो अत्यंत शांत चित्तानें काम करी, प्रत्यक्ष हल्ला चढवितांना किंवा आलेला हल्ला

परत फिरवितांना तो आपल्या हालचाली इतक्या व्यवस्थेनें करी कीं, जणूं काय प्रत्येक बारीक सारीक गोष्ट त्यानें अगाऊ ठरविलेली आहे असें वाटे.

हैदरच्या सैन्याच्या हालचालीही अत्यंत तीव्रतेनें होत असत. त्यामुळें हैदरचे शत्रु कित्येकदां आकस्मिक रीतीनें त्याच्या तावडींत सांपडत व त्यांचा धुव्वा उडत असे. सहा हजार घोडेस्वार घेऊन ३॥ दिवसांत १०० मैलांची भरारी मारून तो एकदां मद्रास जवळ ५ मैलांवर दंड थोपटून उभा राहिला व त्यामुळें इंग्लिशांची तारांबळ उडाली. सन १७८० सालींही अशीच भरारी मारून तो मद्रासजवळ ९ मैलावर येऊन ठेपला. ही भरारी मारतांना त्यानें आपल्या हालचाली इतक्या गुप्त राखिल्या होत्या कीं प्रत्यक्ष मद्रासेजवळ जेव्हां आगी लागूं लागल्या तेव्हां इंग्रज लोक जागे झाले व त्यामुळेंही इंग्लिशांची धावपळ सुरूं झाली. सर आयरकूट बरोबर सामना देतांना २॥ दिवसांत १०० मैलांची मजल मारून हैदर इंग्लिश सैन्य आणि गुडालूर यांच्यामध्यें अचानक रीतीनें येऊन उतरला. यावेळीं हैदरचे वय ६० वर्षांचे होतें. हैदरच्या काळीं सैन्याच्या हालचाली जलदीनें करितां येतील अशा सडकाही नव्हत्या. धान्य, वैरण, तोफा व दारूगोळा बैलांच्या साह्यानें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेत असत. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे हैदर किती त्वरेनें सैन्याच्या हालचाली करी हें लक्षांत येईल.

हैदरच्या अंगीं राजकीय धोरण उच्च दर्जाचे होतें. इंग्लिशांशीं अनेकदां तहाच्या बाबतींत त्यास बोलणें करावें लागलें त्यावरून व मद्रासचे तहाचे वेळीं जी वाटाघाट त्यानें केली त्यावरून हैदर हा उपजत योद्धा व मुत्सद्दी होता असें अनेक इंग्रज लेखकांनीं लिहिलेलें आहे.

हैदर हा जसा उत्तम लढवय्या व मुत्सद्दी होता त्याचप्रमाणें तो युक्तिबाजही होता. त्यानें खंडेराव यांजकडे फंदफितुरीचीं पत्रें पाठवून त्यांस फसाविले. हवेरी येथें मराठी सैनिकास ताडी स्वस्त दरानें विकून झिंगावयास लाविले व नंतर त्यांस कापून काढिले. शिवाजीमहाराजांनीं कात्रजच्या घाटांत बैलांच्या शिंगास पोत लावून पाठलाग करणाऱ्या मोगली सैन्याची दिशाभूल केली त्याप्रमाणें धारवाडचा किल्ला घेतांना आपल्या सैनिकांना मराठा सैनिकांचा वेष देऊन त्यांचा किल्ल्यांत प्रवेश करून घेतला व मराठ्यांची दाणादाण उडविली. इंग्लशांशीं वागतांनाही त्यानें अनेकदां अनेक युक्त्या योजल्या. त्यावरून हैदर हा मोठा कल्पक, धोरणी व आपले बेत गुप्त राखणारा असा होता असें दिसतें. हैदर अगदीं मरणोन्मुख झाला असतांनां सुद्धां तो आजारी आहे ही गोष्ट त्याच्या ३-४ सरदाराशिवाय इतरांस माहीत नव्हती. हैदर मेल्यानंतरही कांहीं दिवस सैनिकांनां व सामान्य सरदारांनां मृत्यूची बातमी बरेंच दिवसांनीं कळाली. यावरून हैदर महत्वाच्या गोष्टी कशा गुप्त राखीत असे तें दिसतें. अतीशय कडक शिस्त असल्याखेरीज दरबारची बातमी गुप्त राखणें शक्य नसते. हैदरची शिस्त अत्यंत वाखाणण्यासारखी होती. शिस्त राखण्याकरितां तो प्रसंगविशेषीं कामगारांनांही चाबकानें चोपीत असे. प्रत्यक्ष टिपूलाही हा प्रसाद मिळालेला होता. असा कडकपणा पेशव्यांपैकीं फक्त माधवराव पेशव्यांमध्यें होता. गारपिरावर महादजी रेंगाळत बसलेला पाहून माधवरावानें " मी थेऊरहून परत येण्याच्या आंत जर तुमचा तळ हालला नाहीं तर मेखसू खालीं डोकें ठेचीन " असें त्याससांगितलें होतें अशी दंतकथा आहे. लढाईंत जे लोक पराक्रम करीत त्यांना हैदर सढळ हातानें पारितोषिक देत असे त्यामुळें त्याचें सैनिक अत्यंत एकनिष्ठेनें काम करीत असत. Haidar's remedy

for neglect of duty and for egregious plundering, to the detriment either of the peasantry or the treasury, was the Scourge which he applied freely, often perhaps justly.

Lewin B. Bowring. C. S. I.

हैदरचें चरित्र लिहिणारा Lewin B. Bowring म्हणतो कीं' Nevertheless, although his training had been defective, and his policy often dictated severe punishments, it does not seem that he was wantonly brutal or that he took pleasure in torturing his prisoners. हैदरचे शिक्षण जरी सदोष होतें आणि तो जरी जबर शिक्षा देत असें तरी कैद्यांचे हाल करण्यांत त्याला आनंद होत नसे किंवा तो सहजासहजीं क्रूरपणानें वागत नसे

कांहीं मंगल प्रसंगीं किंवा एकाद्या समारंभाचें वेळीं हैदरची स्वारी मोठ्या थाटानें बाहेर पडे. स्वारीच्या अघाडीस शेंकडो फ्रेंच व इंग्लिश स्वार असत, त्यांचे मागें उंटावर बसलेले ५०० स्वार चालत. त्यांच्या मागें दरबारच्या हत्तींची रांग असे. नंतर ॲबसीनियांतील सुंदर रीतीनें सजविलेले घोडे चालत. या घोड्यांच्या डोक्यावर शहामृगाच्या तांबड्या व काळ्या पिसांचे तुरे व पाठीवरील बाजूस पोलादी भाले खोविलेले असत. घोड्यामागून रेशमी वस्त्र परिधान केलेले भालाईत चालत. त्यांच्या भाल्यांना घुंगरें लाविलेली असल्यामुळें कर्णमधुर नाद निघत असे. भालाईतामागून चिलखतें चढविलेले व सुंदर पोशाख केलेले सरदार घोड्यांवर स्वार होऊन चालत. नंतर हैदरचे उत्तम रीतीनें शृंगारलेल्या घोड्यांना हातांत लगाम धरून मोतदार चालवीत. या घोड्यामागून पायदळाचें पथक चाले व त्यामागें खासगी कारभारी घोड्यांवरून जात. कारभाऱ्यांच्या गळ्यांत छातीवर रुळणाऱ्या सोन्याच्या साखळ्या असत. नंतर पांढऱ्या

हत्तीवरून हैदरची स्वारी चाले. हैदरच्या हत्तीमागें शेंकडों हत्ती असत. त्यापैकीं पांच हत्तीवर राजचिन्हें असत. एका हत्तीवर सोन्याची मशीद, दुसऱ्यावर 'माही मरातिब' ( हें मोगल बादशहानें दिलेलें मीन चिन्ह होतें. ); तिसऱ्यावर मोठ्या सोन्याच्या बैठकीवर बसविलेली जाड अशी पांढरी मेणबत्ती; चौथ्यावर दोन मोठे सोन्याचे चंबू व पांचव्यावर वाटोळी हस्तिदान्ति सोन्यानें मढविलेली खुर्ची अशी ही पांच राजचिन्हें होती. या हत्तीमागून ॲबिसीनियन घोडेस्वारांची दोन पथकें व त्यामागें ॲबिसीनियन पायदळांच्या पलटणी असा हा लवाजमा असे. अशा रीतीनें स्वारी चालली म्हणजे दोन्ही बाजूंच्या कडेनें पायदळ शिपायांची रांग असे. या शिपायांचा पोशाख पांढऱ्या रेशमाचा असे व त्यांच्या हातांत रुपेरी मुठीचे काळे भाले असत. हैदरचा हा थाटमाट आणि वैभव पाहून सर्व लोकांचे डोळे दिपून जात आणि तत्कालीन कोणत्याही राजवटींत इतकें ऐश्वर्य पहावयास मिळत नसे.

थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे हैदर कडक पण सुधारलेल्या मनाचा कोवळा पण करारी, रंगेल पण कर्तव्यदक्ष, राजधोरणी व राजकारणी असा होता. तो कत्तल उडवीत होता पण बेसुमार शिस्तीचा भोक्ता व बेहद्द अंमलबजावणी करणारा होता. कालचक्र आपला कराल जबडा उघडून हरघडीला उभ्या आडव्या अंगानें त्याला खाऊन टाकण्याचा प्रयत्न करीत असतां कधीं त्याला बगल देऊन तर कधीं त्याशीं बेगुमानपणें खेळून हैदर श्रेष्ठपदास चढला होता.

# हैदरचे अंगीं राजकर्त्यास लागणारे गुण होते काय ?

हैदरचे अंगीं राजकर्त्यास अवश्य लागणारे गुण होते काय ? चांगला राजा ह्मणवून घेणाऱ्याच्या अंगीं कांहीं विवाक्षित गुण असावे लागतात. राजाची मुख्य कर्तव्यें दोन आहेत. पहिलें राज्यरक्षण व दुसरें प्रजापालन या दोन अंगाचे पोटभेद पुढें दाखविल्याप्रमाणें आहेत.

| राज्यरक्षण | प्रजापालन |
|---|---|
| १ लायक सेनापति निवडणें. | १ प्रजेला शेती, व्यापार, कारखाने चालविणें वगैरे करितां लागणारी शांतता प्राप्त करून देणें. |
| २ सैनिकांत उत्तम शिस्त उत्पन्न करणें. | २ राज्यकारभार नीट चालण्याइतका नियमित कर घेणें. कराचा फाजील बोजा पडूं न देणें. |
| ३ सैनिकांना लष्करी शिक्षण देणें. | ३ कला कौशल्य, व्यापार वगैरेंच्या वृद्धिकरितां कांहीं तरी विवाक्षित शिक्षण प्रजेंत वाढेल अशी व्यवस्था करणें |

| | |
|---|---|
| ४ हत्यारें व दारूगोळा स्वत: तयार करणें | ४ न्यायदान पद्धति अल्प खर्चाची व निःपक्षपातिपणाची राखणें. |
| ५ धान्य, वैरण वगैरे पुरविणारें खातें कार्यक्षम राखणें. | ५ सरकारी नोकराकडून प्रजेचा छळ होऊं न देणें. |
| ६ शत्रूकडील बातमी आणणारे गुप्तपोलीस कार्यक्षम राखणें. | ६ परधर्मीय लोकांची मंदिरें, उपासना गृहें याबद्दल आदर दर्शविणें, त्यास आपले आचार मोकळेपणानें पाळूं देणें. |
| ७ सैन्यांत फितूरी न होऊं देणें. | |
| ८ उत्तम लढवय्यांच्या गुणांचे चीज करणें. | |
| ९ खर्चास लागणारा पैसा सालोसाल मिळत जाईल अशी व्यवस्था करणें. | |

वर जी तत्वें गोवली आहेत त्यापैकीं, राज्य रक्षणास अत्यंत जरूर असणारीं ९ तत्वें हैदरनें उत्तम प्रकारें आचरलेली दिसतात आणि त्यामुळेंच इंग्लिशांच्या एक डझन सेनानीस त्याच्यापुढें नमावें लागलें. व अनेक निकराच्या लढायात त्याला यश मिळालें.

प्रजापालनापैकीं सर्व तत्वें हैदरला पाळतां आली नाहींत. प्रजेला आपली सांपत्तिक स्थिति सुधारण्यास लागणारी शांतता हैदरला उत्पन्न करतां आली नाहीं. १७५९ पासून ते १७९८ पर्यंत म्हैसोर येथें प्रचंड

ाल्डच होता. या ४१।४४ वर्षांच्या काळांत सतत शत्रूच्या ातच गेल्या. यामुळें हैदरला शांतता राखतां आली नाहीं. प्रजेला मळाल्याशिवाय राज्य टिकणें शक्य नाहीं हें तत्व मात्र हैदरास लेलें दिसतें.

ज्यकारभार चालवितांना प्रजेवर कराचा फारसा बोजा पडूं नये ्दर जपत असे व त्याप्रमाणें वागण्यास त्यानें आपल्या हाता- ोकरांस हुकूमही दिलेले होते. परंतु ज्या लोकांकडे कर वसूली ोक पुष्कळदां जुलूम करीत. हैदर स्वतः रणांगणावर सतत उभा ळें त्यास आपल्या हातांखालील लोकांची अन्यायाची करण्यास पुरेसा वेळ मिळाला नाहीं.

ांत विवक्षित प्रकारचें शिक्षण प्रसृत करावें हें हैदरास सुचलें ों हें समजण्यास फारसा मार्ग नाहीं. मोगल, पेशवे, विजय- ागैरेनीं प्रजेंत विवक्षित प्रकारचें शिक्षण किंवा शिक्षणपद्धति असें दिसत नाहीं. तेव्हां हैदर सारख्याकडून एखादि शिक्षण करण्यांत आली नाहीं म्हणून त्यास दोष देण्यांत अर्थ नाहीं.

रला अन्यायाबद्दलची चीड असे. ज्या ज्या वेळीं तो न्याय देई ळीं अगदीं निःपक्षपातीपणानें वागे. टिपू हा संभाजी प्रमाणेंच एकदां टिपूला हैदरनें सर्व लोकांसमक्ष फटके मारिलें होते. ्रास अन्तर व्यवस्था पहाण्यास मुळींच वेळ न मिळाल्यामुळें, ाकाऱ्याकडून कधीं कधीं प्रजेस त्रास पोहोचत असे. हैदरचा मुख्य प्रधान पूर्णय्या कर्तबगार होता. तो अनेकवार अन्यायांचे परिमार्जन करी; यामुळें प्रजेंत असंतोष माजत नसे.

वसूलाची पद्धति, न्यायदान, व अन्तर्गत व्यवस्था हें पहाण्याचें काम पूर्णय्या कडे विशेषतः होते. पूर्णय्या हा कसलेला मुत्सद्दी होता व त्याच्या कारभारांत हैदरनें कधींच ढवळाढवळ केली नाहीं. हैदरचें धोरण सदासर्वदा चढाईचें होतें व म्हणूनच त्याचें सामर्थ्य अमर्याद वाढलें. बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांनीं चढाईचें धोरण स्वीकारतांच मराठ्यांचे घोडे पंजाब, बंगाल, वगैरे दूरच्या प्रांतां नाचूं लागले. तथापि अन्तर्गत सुव्यवस्था लावण्याचें काम पेशव्यांना उत्तम रीतीनें पार पाडतां आलें नाहीं.

येथपर्यंतच्या माहीतीवरून हैदरच्या अंगी राजकर्त्यास लागणारे गुण किती होते व त्याची योग्यता किती होती याबद्दल वाचकाने स्वतःचे मत बनवावें.

# श्री शिवाजी महाराज आणि हैदर यांचे प्रयत्नांची तुलना.

महाराष्ट्रामध्यें शिवाजी महाराज हे ज्या प्रमाणें अद्वितीय पुरूष होऊन गेले त्याचप्रमाणें म्हैसोर मध्यें हैदर हा एक थोर पुरूष होऊन गेला. मुसलमान राजे व योद्धे यांच्या संबंधानें महाराष्ट्रीय लोकांत आदर कमी व तो तसा असणें अगदीं स्वाभाविकही आहे. परन्तु खरा अभ्यासी व जिज्ञासू हा पूर्वग्रहदूषित असतां कामा नये. ऐतिहासिक गोष्टींचा सर्व बाजूनें विचार करून त्यानें आपलें मत बनविलें पाहिजे. जिज्ञासूला हैदरच्या कर्तबगारीची योग्य कल्पना यावी म्हणून या दोन पुरुषांच्या आयुष्यक्रमांतलि ठळक गोष्टी पुढें दिल्या आहेत.

| हैदर | शिवाजी |
| --- | --- |
| १ हा लहान असतांना याचें पालन पोषण आईनें मोल मजूरी करून केलें. जवळ पैसा मुळींच नव्हता. | १ शहाजी राजे यांची जहागीर पुण्यास होती; व ते स्वतः ४०।५० हजार फौज पाळून होते. दादोजी कोंडदेवाकडूनही शिवाजीस बराच पैसा मिळाला. दादोजीचा मोटा द्रव्य संचय शिवाजीस १७व्या वर्षी मिळाला. |
| २ लहानपणीं शिक्षण मुळींच मिळालें नाहीं. जगत्रूपि विस्तीर्ण अशा स्पर्धा क्षेत्रांत | २ दादोजी सारख्या मुत्सद्याकडून शिवाजीस शिक्षण मिळालेलें होतें. तत्कालिन मर्दुमकीचें |

| | |
|---|---|
| नानाव्यक्ति, नानाप्रसंग, नाना-अडचणी इत्यादिकांच्या प्रत्यक्ष अनुभवानें त्यानें शिक्षण मिळविलें. | शिक्षण, जमीन महसूल व हिशेब, लष्कर जमवून स्वतःचा आणि देशाचा बचाव-करण्याची आणि लोकांना संतुष्ट करण्याची युक्ति या गोष्टी दादाजीनें त्यास समजावून दिल्या (श्री. सरदेसाई यांची रियासद पहा.) |
| ३ हैदरला पिता किंवा माता यांच्याकडून कोणतेंच साह्य मिळालें नाहीं. | ३ जिजाईनें निजामशाही व अदिलशाही येथील निरनिराळ्या मुत्सद्यांचे व्यवहार पाहिले होते व त्यामुळें तिच्या अंगी पुष्कळच राजकीय धोरण आलें होतें. शिवाजीस जिजाई सारख्या कर्त्या मातेच्या उपदेशाचा फारच उपयोग झाला. असें इतिहासकार ह्मणतात. |
| ४ हैदरच्या राज्यस्थापने करितां पूर्व भूमिका कोणीही तयार केली नव्हती. | ४ महाराष्ट्रांत मराठी राज्य-स्थापनेस जरूर असणारी स्वराज्याची व स्वधर्माची पूर्वतयारी संत कवींनीं केलली होती असें न्यायमूर्ति रानडे प्रभृति इतिहासकार म्हणतात. |
| ५ हैदर परधर्मीय लोकांवर राज्य | ५ शिवाजीनें स्वधर्मीय लोकांवर |

स्थापूं पहात होता. परधर्मीय लोकांवर सत्ता गाजविणें हें केव्हांही कठीण काम आहे.

६ हैदरनें आपली सत्ता म्हैसोरच्या पठारावर स्थापन केली. प्रथमतः तो शिपाई होता. १७४९ मध्यें देवनहल्लीस त्याचें शौर्य दिसलें. १७५५ मध्यें तो दिंडिगलचा फौजदार झाला. व जराशी हालचाल करितो आहे असें दिसतांच. त्याजवर म्हैसोरची राणी व खंडेराव यांनीं स्वारी केली व त्यामुळें त्यास जीव बचावण्याकरितां एका दिवसांत ९८ मैल पळून जावें लागलें. थोडक्यांत सांगावयाचे ह्मणजे प्रतिकूल अशा परिस्थितींत हैदरचे प्रयत्न चाललेले होते व अगदीं आरंभापासूनच त्याला चिरडून टाकण्याचे प्रयत्न खंडेराव व नंदराज हे करीत होते. हैदरचे प्रयत्न

राज्यस्थापण्याचा प्रयत्न केला. स्वधर्मीयांचा पुढारी होणें व त्यांचा राजा होणें हें काम एका अर्थानें सोपें आहे.

६ शिवाजीनें ज्या ठिकाणीं राज्यस्थापण्याचा प्रयत्न केला त्या ठिकाणची परिस्थिती फार अनुकूल होती. मावळाचा किंवा सह्याद्रीच्या लगतचा प्रदेश ताब्यांत ठेवून तेथें आपली सत्ता दृढ करणें मुसलमानांस अशक्य होतें. स्वित्सरलंड, स्काटलंड, अफगाणिस्थान इत्यादि डोंगरी मुलखांत ज्याप्रमाणें अनेक पुरूष स्वतंत्रपणें वावरत होते त्याप्रमाणें मावळांतही अनेक मराठे सरदार स्वतंत्रतेनें रहात असत. त्यांतील येसाजीकंक, बाजी फसलकर, तानाजी मालुसरे, कान्होजी जेधे, गोमाजी नाईक पानसंबळ वगैरे सरदार आरंभापासूनच शिवाजीचे मित्र होते व त्यास

सुरूं होऊन ६ वर्षे पुरी झाली नाहीं तोंच त्याजवर आणीबाणीचा प्रसंग आला.

साह्य करीत होते. ही सर्व मंडळी शूर होती, त्यांचे जवळ थोडेफार सैन्य असे व संपत्तिही असे. मुसलमानांची सत्ता दळणवळणाच्या मार्गांच्या अभावी या प्रांतीं बसलेली नव्हती. यामुळें प्रारंभीचीं कांहीं वर्षे शिवाजीस जमवाजमव करण्यास फार उपयोगीं पडलीं.

७ हैदरनें बेदनूर लुटून संपत्ति मिळाविली.

७ शिवाजीनें सुरत सारखें संपन्न शहर लुटलें. जुन्नर शहरही दोनदां लुटलें.

८ हैदरच्या हैसोरला लागूनच (किंवा जवळच) इंग्रज, मराठे व निजाम यांच्या राज्याच्या सीमा होत्या व तिन्ही बलाढ्य शत्रू बरोबर त्यास झुंजून आपली सत्ता वाढवावयाची होती.

(अ) पाळेगार व इतर संस्थानिक त्याच्या विरुद्धच होते.

८ (अ) निजामशाहीचा अस्तच झालेला होता.

(ब) १६४६ ते १६५६पर्यंत महंमद अदीलशहा हा अजारी असल्यामुळें १० वर्षांच्या कालांत विजापूर दरबारनें फारशी हालचाल केलीच नाहीं.

[ब] म्हैसूर दरबार आंतून विरुद्ध पण वस्तुतः निर्बल असें मात्र होतें.

९ हैदरास सुरवाती पासूनच प्रबल शत्रूशीं सामना करावा लागला उदाहरणार्थ—

१ १७५७ निजाम व पेशवे यांशीं गांठ.

२ १७५९ मराठ्यांची स्वारी. गोपाळ हरी सेना नायक.

३ १७५९ खंडेरावानें हल्ला-करून धुळधाण उडवली.

४ १७६० पुन्हां मराठ्यांची स्वारी.

या पुढेंही अगदीं मरेपर्यंत हैदरच्यामागें इंग्रज व मराठे लागलेच होते.

९ (अ)शिवाजीस १६४९ ते १६५६ पर्यंतची कमींत कमीं १० वर्षे आपली स्वतःची सत्ता स्थापन करण्याच्या तयारीस मिळाली. या अवकाशांत त्याला प्रबल असा शत्रू भेटला नाहीं. चंद्रराव मोरे फारसा प्रबल नव्हता व त्याची आणि शिवाजीची गांठ १६५६ मध्यें पडून त्यांचे युद्ध झालें.

(ब) १६५७ मध्यें शहाजान मेल्यामुळें औरंगजेब दिल्लीस गेला व तेथें १६५९ पर्यंत घरचें भांडण भांडला.

(क) विजापूरचे दरबारी शिद्दिजोहार दरबारचे विरुद्ध कारस्थानें करीत होता. अफजलखान १६५९ मध्यें ह्मणजे शिवाजीस आपली कल्पना तडीस नेण्यास १२ वर्षांचा काल मिळाल्यानंतर आला.

| | |
|---|---|
| १० इंग्रज, मराठे व निजाम या शिवाय कुर्ग, मलबार, चितळदुर्ग, कडाप्पा, बल्लारी सावनूर, गुत्ती इत्यादि ठिकाणचे लहान लहान राजे व सरदार हैदरचे विरुद्ध होते व ते हैसोर जवळच होते. | १० शिवाजीस प्रत्यक्ष पुण्याजवळ कोणीच प्रबळ शत्रू नव्हता. |
| ११ हैदरची एकसारखी प्रबळ शत्रूंशी गांठ पडली. उदाहरणार्थ.<br>१ बाळाजी बाजीराव आले.<br>२ माधवराव पेशवे आले.<br>३ परशुराम भाऊ पटवर्धन आले.<br>४ कर्नल स्मिथ, कर्नल ब्रेथवेट<br>क. पींच क. निक्सन<br>क. वुड क. हारपर<br>क. लँग क. बेर्ड<br>क. बेली क. फ्लेचर<br>सर आयर कूट, सर हेक्टरमॅनरो<br>५ स्वतःपेशवे पराक्रमीच होते. परशुराम भाऊ पटवर्धन हा उत्तर पेशवाईतील अत्यंत प्रबळ योद्धा व अत्यंत स्वामि- | ११[अ] शिवाजीची गांठ अत्यंत प्रबळ शत्रूशीं फार थोडेवेळां पडली. उदाहरणार्थ.<br>१ अफजलखान<br>२ शास्तेखान<br>३ सिद्धि जोहार<br>४ दिलीरखान<br>५ जयसिंग. हेच काय ते बलाढ्य सरदार शिवाजीवर आले.<br>या पैकीं अफजलखान व शास्तेखान यांवर शिवाजीनें जय मिळविला. पण दिलीरखा व राजे जयसिंग यांपुढें त्यास वाकावे लागले व दिल्लीस जाणें भाग पडलें. |

भक्त होता व तसेंच हरिपंत फडके बरोबर ६० हजार घोडेस्वार घेऊन आला होता. असे असतां हैदरची सत्ता वाढतच गेली.

इंग्लिशाकडील कर्मांत कमी एक डझन उत्तम लढवय्ये हैदरवर आले. यांच्यापुढें हैदर नमला तर नाहींच पण उलट ब्रेथवेट, बेली, बेर्ड वगैरे सेनापतीस त्यानें कैद केले.

उभ्या हयातींत एक दिवसही त्याला तरवार खालीं ठेवितां आली नाहीं.

व औरंगजेबाची व शिवाजीची रणांगणावर गांठ पडलीच नाहीं. औरंयजेब कसा दिल्लीसच अडकला ते पहा.

१६५७ शहाजान मेला ह्मणून उत्तरेस जातो.

१६५९ पर्यंत घरचें भांडण.

१६५९ ते ६३ दिल्लीची व्यवस्था लावण्यांत गुंतला.

१६६४ अखेर राजा जयसिंग दक्षिणेंत येतो.

१६६६ मार्च शिवाजीचे अग्र्यास प्रयाण. १२ मे. औरंगजेबाची भेट.

२० नोव्हेंबर रायगडीं शिवाजी परत.

यापुढें औरंगजेब कसा गुंतला तें पहा.

१७६७ इराणशाहाची स्वारी.

१७६७-७० औरंगजेबाने हाल चाल केली नाहीं दिल्लीकडील व्यवस्था पहाण्यांत तो गुंतला होता.

यामुळें शिवाजीस पूर्ण ३ वर्षे

स्वस्थता मिळाली.

१६६१ दिलेरखा व मुअझम दक्षिणेंत होते पण त्यांचेंच भांडण औरंगजेबास तोडावे लागले दुसरे बहादुरखान व मोहोबतखान असे होते पण त्यांचे बरोबर ४०० काबूली कळावंतिणीचा तांडा होता. त्यांच्या नाच, तमाशाच्या मैफली झडत होत्या यामुळें ते शिवाजीचा मोड करूं शकले नाहींत.

१६७२ सत्नाम्यांचे बंड झाले अफगाणांनीं सरहद्दीवर गडबड केली.

१६७४ अफगाणहद्दीवर पुन्हां गडबड.

१६७५ बहादुरखान व खवासखान यांचे भांडण.

एवंच औरंगजेबाला प्रत्यक्ष दक्षिणेंत येतां आले नाहीं व त्याचे सरदार कमकुवत असल्यामुळें त्यांस शिवाजी बरोबर निकराचें युद्ध करितां आले नाहीं.

१२ हैदरची गांठ विज्ञान शास्त्रांत पुष्कळच प्रगति केलेल्या इंग्रजांशीं पडली. मराठे व निजाम यांनींही इंग्रजांची युद्धकला थोडीफार उचललेली होती. हैदर अशिक्षित असतांही त्यानें इंग्लिशांची युद्धकला उचलली येवढेंच नव्हे तर कित्येक वेळां इंग्लिशांचा पराभव करून त्यांचे कर्ते सेनापति कैद केले.

१२ शिवाजीची विज्ञानशास्त्रांत पुढारलेल्या लोकांबरोबर गांठ पडली नाहीं. शिवकाली मराठे व मोगल शास्त्रीयज्ञान व युद्धकला यांत तुल्यबल होते.

१३ हैदर विरुद्ध पुष्कळ लोक होते व त्याची सत्ता दृढ होऊं देऊं नये म्हणून सतत प्रयत्न करीत होते.

१३ शिवाजी शंकराचा अवतार आहे. त्यास भवानी प्रसन्न आहे असा लोकांचा समज झाल्यामुळें त्याला लक्षावधि लोक येऊन मिळत असत. आज १९४२ मध्येंही अमुक मनुष्य अवतारी आहे असें प्रसिद्ध होतांच त्याचें भोवती लक्षावधि लोकपैशाची गोळा होतात व त्याला मदत होते हें आपण पैशाची पाहतोंच.

१४ हैदरला कोणत्याही साधूनें मदत केली नाहीं व कोठे द्रव्याचे हांडे सांपडले नाहींत.

१५ हैदरनें हिंदूंच्या कांहीं देवळास उपसर्ग दिला तसेंच कांहीं देवळांचे रक्षण केले एवढेंच नव्हे तर कांहीं देवळांची गोपुरें बांधण्यास मदत केली. हैदर हा मुसलमान होता. मुसलमानांचा मूर्ति विरुद्ध अत्यंत तीव्र द्वेष स्वभावतःच असतो. महंमद, मालिकापूर वगैरेंनीं हिंदुस्थानांत आणि आटोमन तुर्कांनी युरोपमध्यें अनेक मूर्तींचा भंग केला. तेव्हां हैदर ज्या संस्कृतींत वाढला ती संस्कृतीच हैदरच्या हातून कांहीं देवळांना उपसर्ग देण्यास कारणीभूत झाली असेंच म्हणावें लागते. हैदरला हिंदुधर्म उच्छेदक म्हणण्या

१४ शिवाजी महाराजास राम दासानें. फार मदत केली असें अनेक लेखकांनीं प्रतिपादन केलेलें आहे.

१५ शिवाजी ज्या संस्कृतींत वाढला ती संस्कृति धर्मसहिष्णु अशीच आहे. आर्यांचा ज्या ज्या लोकांशीं संबंध आला त्या त्या लोकांच्या देवतांना आर्यांनीं आपल्या धर्मांत स्थान दिलें व त्यांना आत्मसात केलें असें देवदेवतेतिहासावरून दिसतें. मालोराजीराजे अहमदनगरांत शहाशरीफ नांवाच्या फकीराच्या भजनी होते व त्या फकीराच्या प्रसादानें मुलगे झाले असा त्यांचा समज असल्यामुळें एकाचें नांव शहाजी व दुसऱ्याचें नांव शरफोजी ठेविले होतें. शहाजी राजांसही मुसलमान साधु, मशीदी वगैरे बद्दल आदर असे. तेव्हां ज्यां ज्या

| | |
|---|---|
| इतकें त्यानें कांहींच केलें नाहीं. श्रीरंगाचें प्रसिद्ध देवालय प्रत्यक्ष त्याच्या राजधानींतच होतें व त्याचें रक्षण त्यानें केलें. | संस्कृतींत शिवाजी वाढला जे त्याच्या कुलावर संस्कार झाले त्यानें शिवाजी इतका बद्ध झाला होता कीं, त्याचे हातून मशीदीची अमर्यादा होणेंच शक्य नव्हतें |
| ६ हैदरचे राज्य फार दिवस टिकले नाहीं याचीं कारणें पुढें दिल्याप्रमाणें आहेत. दक्षिण हिंदुस्थानामध्यें मुसलमानांचा फारसा प्रवेशच झाला नव्हता. कारण विजयनगरकरांनीं मुसलमानांचा ओघ पुष्कळ दिवस थांबवून धरला होता. तालिकोटच्या लढाई नंतरही म्हैसोरकडे प्रबळ अशी मुसलमानांचीं सत्ता नव्हती. म्हणून हैदर व टिपू यांचे नंतर त्यांचे राज्याचा मागमूस राहिला नाहीं. | १६ शिवाजीचे राज्यपुष्कळ दिवस टिकलें याचीं कारणें पुढें दिल्याप्रमाणें आहेत शिवाजीच्या मृत्यूनंतर त्याच्या आश्रयानें वाढलेले व स्वतंत्रतेनें वावरणारे अनेक सरदार होते. विजापूर, गावळकोंडें, अहमदनगर येथील बादशहांच्या हाताखालीं जबाबदारीचीं कामें केलेलें असे छोटे व मोठे सरदार होते. या पैकीं कांहींना जहागिरीहि होत्या. शिवाजीचा उदयकाल हा दक्षिणेंतील मुसलमानी सत्तेचा अपकर्ष काळ होता या |

चालविणारे मुसलमान सरदार दक्षिणेत फारसे नव्हते; उलट अर्काट सावनूर येथिल नबाब त्याचे विरुद्ध होते.

दक्षिणेंत प्रबल आणि कर्तबगार असें मुसलमान सरदारही फारसे वावरत नव्हते. उलट रामगड, कुर्ग, त्रावणकोर, मिरज वगैरे ठिकाणीं लहान मोठ्या हिंदु राजेरजवाड्यांचीच सत्ता होती. त्यामुळे हैदर व टिपू हे निवर्तल्यावर पुन्हां इस्लामी राज्याची कल्पना तडीस नेणारे कर्ते पुरुषच शिल्लक नव्हते. म्हणून हैदरचें राज्य लवकरच लयास गेले.

मुळें त्याच्या अनेक ठिकाणीं पसरलेल्या शाखा कमकुवत झाल्या होत्या. बहुतेक मुसलमान बादशहांचे जनानखानें मोठे असल्यामुळें जे राजपुत्र उत्पन्न झाले होते त्यापैकीं अनेक जण आपल्याला बादशाही मान असावा याकरितां नाना खटपटी करीत व यामुळें कोणत्याच मुसलमान बादशाहीस पूर्वीचें तेज शिवकालीं दाखविणें शक्य नव्हते. अशा स्थितींत शिवाजीनें स्वतंत्र राज्य स्थापण्याचा उद्योग केल्यानंतर शिवाजीच्या सान्निध्यानें वाढलेले, जुन्या मुसलमानी राजसत्ता नष्ट झाल्यामुळें ज्यांनीं स्वतंत्र रीतीनें आपलें अस्तित्व कायम टिकविण्याचे प्रयत्न केलें असे, नवीन जहागीर संपादण्याच्या इच्छेनें जे उद्योगास लागले असे अनेक मराठे सरदार शिवाजीच्या पश्चात् महाराष्ट्रांत शिल्लक

राहिले होते तेव्हां या अनेक सरदारांनीं जहागिरीच्या आशेनें लढाया करून आपापल्या जहागिऱ्या राखण्याचा व लढविण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांना आळा घालण्या इतकी दुसरी प्रबल सत्ता नसल्यामुळे मराठ्यांचे राज्य पुष्कळ दिवस टिकलें.

१७ इंग्रज ग्रंथकारांनीं हैदरची स्तुति केली नाहीं. प्रत्यक्ष रणांगणावर इंग्लिशांनीं अनेकवार हार खावी लागली एवढेंच नव्हेतर त्यांचे कित्येक सेनापति हैदरनें कैद केले. इंग्लिश लोकांना कैद केल्यानंतर त्यांच्या सुन्ता केल्याच्या हकीकतीही जेम्स् स्करि ( Scurry ) आणि जेम्स् ब्रिस्टो यांनीं प्रसिद्ध केल्या आहेत. तेव्हां त्याची योग्यता इंग्लिश ग्रंथकारांनीं योग्य रीतीनें न करणें फार संभवनीय

१७ इंग्लिश लोकांनीं शिवाजी अत्युच्च दर्जाचा पुरुष गेला हें कबूल केलें तो तसा होताही. परं शिवाजीपुढें इंग्लिशांचे डझन जनरलसुना लागलें असते तर इंग्लिशांनीं शिवाजीची स्तुति केली असती किंवा याची शंकाच आहे.

आहे. इंग्लिश ग्रंथकारांनीं त्याची स्तुति केली नाहीं यावरून हैदरची योग्यता कमी होती असें ह्मणतां येणार नाहीं.

# भाग ४ था

हैदरचें चरित्र संपले व पुढील येणारा भाग हैदरच्या चरित्रांत अंतर्भूत होऊं शकत नाहीं. पण इतिहासाचें अध्ययन करितांना "इतिहआस" 'असे असें घडलें' एवढें समजून भागणार नाहीं. 'असें असें घडलें तें कां घडलें हेंही समजावून घेणें जरूर असतें म्हणूनच पुढील मजकुर मुद्दाम घालण्यांत आला आहे. माझ्या समजुती प्रमाणें हैदरसारखे अनेक आक्रमणशील पुरुष हिंदुस्थानांत उत्पन्न झाले व बाहेरूनही आले पण त्यांचा पराभव 'पूर्ण पराभव' हिंदूस कां करितां आला नाहीं याची कारण परंपरा समजणें जरूर आहे. मी दिलेल्या कारणपरंपरेपेक्षां जास्त चांगली विचारसरणी जर कोणी विद्वानानें पुढें मांडली किंवा ही कारणपरंपरा चुकीची आहे असें सिद्ध केले तर मला आनंदच होणार आहे.

## प्रकरण १ लें

हिंदुस्थानच्या इतिहासाचे प्राचीन काळापासून अवलोकन केल्यास असें दिसतें कीं अनेक धाडसी व शूर पुरुषांनीं हिंदुस्थानावर आक्रमण केले व येथून अलोट संपत्ति ते घेऊन गेले. शिकंदर आला, तैमूरलंग आला, अहमदशाहा अबदाली आला, नादीरशाहा आला. असेंच इतिहासांत वाचावयास सांपडतें. याच्या उलट एखादा रजपूत राजा उठला व आपल्या पराक्रमास हिंदुस्थान अपुरा आहे म्हणून तो अफगाणिस्थान, इराण, तुर्कस्थान, इत्यादि प्रदेश तुडवीत गेला असें मात्र आढळत नाहीं.

हिंदुस्थनांत अत्यंत शूर, धाडशी, कल्पक व बुद्धिमान असे अनेक लोक होऊन गेले. मराठ्यांचा इतिहास चाळला तर कोणत्याही देशांतील तत्कालीन सेनापतींच्या तोडीचे कदाचित् सरसही अनेक सेनापति होऊन गेले असें दिसतें. असें असतांना हिंदुस्थानच्या पराजयाची परंपराच कां दृष्टीस पडते. चंद्रगुप्तानें सेल्यूकस निकेटरचा पराभव केला, व पृथ्विराजानें पहिल्या खेपेस महंमद घोरीस पिटाळून लाविलें बाप्पारावळ यानें अनेक परकीयांना धूळ चारली अशा दोनचार गोष्टी सोडिल्या तर निदान ऐतिहासिक कालापासून हिंदीलोक पराकियांच्या आक्रमणास बळी पडलेलें दिसतात. सतराव्या व आठराव्या शतकांत मराठे व शीख यांनीं कांहीं काल पर्यंत स्वधर्मीयांचे राज्य स्थापन केलें. परन्तु इंग्लिशासारख्या बालिष्ठ सत्ते पुढें त्यांसही नमावें लागलें.

युद्धांतील जय किंवा अपजय सेनापतींची कुशलता, सैनिकांची संख्या, शस्त्रास्त्रांचा संभार, किंवा सैनिकांचे शरीरसामर्थ्य यांजवरच केवल अवलंबून नाहीं. मनुष्य हा 'शरीर आणि मन यां योगे' बनलेला असल्यामुळें युद्धमान लोकांची जय प्राप्ति करितां विशिष्ट प्रकारची मनोभूमिका असावी लागते. जें राष्ट्र या विशिष्ट भूमिकेसहित. कुशल सेनापती, शूर सैनिक, उत्तम शस्त्रास्त्रें, यांनीं सुसज्ज असेल त्यालाच जयप्राप्ति होते.

तेव्हां प्रथमतः हिंदिलोकांमध्यें कोणती मनोभूमिका नव्हती या बद्दलचा विचार करून नंतर इतर कोणकोणत्या साधनांच्या अभावी हिंदुस्थानवर अपजयांची परंपरा आली याचा साकल्ये-करून विचार करणें जरूर आहे.

आर्यलोक वैदिक धर्माचे अनुयायी असत व वैदिक धर्मामध्यें भौतिक व आधिभौतिक सुखांची योग्य सांगड घातलेली होती. आर्यांचें ध्येय पुढील प्रमाणें होतें.

आब्रह्मन् ब्राह्मणोब्रह्मवर्चसी जायताम्
आस्मिन् राष्ट्रे राजन्यः इषव्यः शूरो महारथो जायताम्.
दोग्ध्री धेनुर्वोढानड्वान् आशुसप्तिर्पुरंधिर्योषा जिष्णूरथेष्ठाः
सभेयूः युवास्य यजमानस्य वीरो जायताम्।
निकामे निकामे नः पर्जन्यो वर्षतु
फलिन्यः न ओषधयः पच्यन्ताम् योगक्षेमो नः कल्पताम्।

आमच्या राष्ट्रांमध्यें ज्ञानी पुरुष उत्पन्न व्हावेत. क्षत्रीय लढाऊ व शूर उत्पन्न व्हावेत. आमच्या गाई पुष्कळ दूध देणाऱ्या व बैल व घोडे त्वरेनें जाणारे असावेत. आमच्या स्त्रिया सुस्वरूप असाव्यात. आमचे पुत्र शूर व विजयी असावेत. आमच्या देशांत पर्जन्य वेळेवर पडावा व देशांत फळें व फुलें यांची समृद्धि व्हावी व आमचा योग[1] क्षेम[2] चांगला चालावा.

आर्यांच्या या घोषणें वरून वैदिककाळीं भौतिकसामर्थ्य वाढावे व ऐहिक सुखांचा योग्यलाभ मिळावा अशी वैदिक धर्माची शिकवणूक होती असें दिसतें. ऐहिक सुखाच्या लोभामुळें आर्यांनीं परलोक किंवा पारलौकिकसुख यांकडे दुर्लक्ष केलें नव्हतें योगक्षेम नित्य किंवा सतत चालावा अशी त्यांची महत्वाकांक्षा होती.

टीपः–(१) अलब्धस्य लाभः योगः
(२) लब्धस्यपरिपालन् क्षेमः

जें मिळालें नसेल तें मिळाविणें व मिळालेलें सांभाळणें हें काम आर्य कसें करीत असत तें समजावून घेण्यास ऋग्वेदांतील राष्ट्री सूक्ताचें अवलोकन करणें जरूर आहे. त्यासूक्तांतील पाहिला मंत्र असा आहे कीं,

अहं रुद्रेभिर्वसुभिश्चरामि अहमादित्यैरुत विश्वदेवैः
अहं मित्रावरुणोभा बिभर्मि अहमिद्राग्नी अहमाश्विनोभा

ऋ. १०।२५।१.

मी आभृणीवाक् म्हणजे व्यक्तीचें व राष्टाचें भरण पोषण करण्यास समर्थ अशी वाणी किंवा विद्या ज्यांनीं चोवीस वर्ष ब्रह्मचर्य पाळून अग्नि, वायु, पृथ्वी, अन्तरिक्ष, आदित्य, द्यौः चन्द्रमा व नक्षत्रें या आठ वसूंचें ज्ञान प्राप्त करून घेतलें आहे, ज्यांनीं आठवसू व पंचप्राण व उपप्राण यांचें ज्ञान प्राप्त करून घेतलें आहे, जे शत्रूंना रडवितात व जे विज्ञानानें आदित्याप्रमाणें शोभतात, अशा विद्वान्, दानशूर व मार्गदर्शक लोकांसह संचार करिते.

या वैदिक ऋचे मध्यें पुढील सिद्धांत गोविलेले आहेत.

१ व्यक्तीचें व राष्टाचें भरण व पोषण करण्याचें सामर्थ्य विद्येंत आहे. २ अग्नि, वायु, आदित्य चंद्रमा, नक्षत्रें, पंचप्राण आणि आत्मा याचा अभ्यास करणें म्हणजे विद्या. विद्येमध्यें अग्नि [ Heat ] वायु, ( Gases ), पृथ्वी, ( Mineralogy ) अंतरिक्ष, ( Ether ) चंद्रमा व नक्षत्रें ( Astrology ) या शास्त्रांचा व परलोक आणि आत्मा यांच्या अभ्यासाचा अंतर्भाव होतो. केवळ भौतिक शास्त्रांना किंवा केवळ पारमार्थिक ज्ञानाला

विद्या ही संज्ञा देतां येत नाहीं.

अहं राष्ट्री संगमनी वसूनां चिकितुषी प्रथमा यज्ञियानाम्
तां मा देवा व्यदधुः पुरुत्रा भूरिस्थात्रां भूर्या वेशयन्तीम् ।

मी [ विद्या ] राष्ट्रोन्नति करणारी शक्ति आहे, ब्रह्मचारी, लोकरक्षक व धनिक यांच्यात स्नेहभाव वाढवून त्यांना मी धन प्राप्त करून देतें. माझ्यासाठीं जे जें करावयाचें असेल ते तें सर्वांनीं योग्यवेळीं केलें पाहिजे. मी सर्व राष्ट्रीय उपास्यामध्यें श्रेष्ठ आहे.

या ऋचे मध्यें पुढील सिद्धांत ग्रंथित आहेत.

१ विद्या हें राष्ट्रीय शक्तिचें स्वरूप आहे.

२ कोणत्याही उपास्यदेवतेच्या उपासनेपेक्षां राष्ट्रीयशक्तीची म्हणजे विद्येची उपासना श्रेष्ठ दर्जाची आहे.

३ राष्ट्रीय शक्तिच्या म्हणजे विद्येच्या उपासनेनें मनुष्याच्या मानासिक व शारिरिक शक्तिस उत्तेजन मिळते.

४ इतर देशांतील विद्वान् या राष्ट्रशक्तिची उपासना करितात.

अहं रुद्राय धनु आतनोमि ब्रह्मद्विषे शरवे हन्तवाउ ।
अहं जनाय समर्द कृणोमि अहं द्यावापृथिवी आविवेश ॥

ऋ. १० । १२५ । ६

मी [ विद्या ] शूराला शस्त्र देते व त्योगे शूर पुरुष दुष्टाचा नाश करतो. मी लोकांमध्यें असा आवश उत्पन्न करिते कीं, त्यायोगें पृथ्वी व आकाश ही भरून जातात.

या खेरीज दुसरी महत्वाची शिकवण वेदानें अशी दिली कीं,

उच्चैर्वाजी पृतनाषाट् सभासाहं धनंजयम्

सर्वाः समग्रा ऋद्धयः सुवर्णेऽस्मिन् समाश्रिताः ।

सुवर्ण हें युद्धांत आणि सभेंत जय देणारे आहे. सर्व प्रकारच्या सिद्धि सुवर्णानेंच प्राप्त होतात. म्हणून सुवर्ण धारण व संचय करा सुवर्णाचें महत्व आर्यांस विशेष वाटत असल्यामुळेंच भोजनाच्या प्रारंभी सुद्धां " वयंस्याम पतयो रयिणाम् " आम्हीं संपत्तीचें धनी होऊं या अशी घोषणा करीत.

थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे आर्यांची शिकवण अशी होती. कीं, विद्येच्या योगानें व्यक्तीचें व राष्ट्राचें भरण व पोषण होतें. म्हणून प्रत्येकानें विद्येची उपासना केली पाहिजे. विद्येमध्यें भौतिकशास्त्रांचा व पारमार्थिक ज्ञानाचा अन्तर्भाव होतो. केवळ भौतिक शास्त्रें किंवा केवळ आत्मज्ञान यांना विद्या असें म्हणूं नये. सुवर्णाच्या योगानें सर्व प्रकारच्या सिद्धि प्राप्त होतात म्हणून सुवर्णधारण व संचय करा.

राष्ट्राच्या उन्नतीला व बळकटीला ऐहिक व पारमार्थिक शुद्ध ध्येयाची योग्य सांगड घालणें जरूर असतें. पारमार्थिक ध्येयाच्या अभावीं मनुष्य स्वार्थी, लोभी, अल्पदृष्टि व भोगी बनतो. त्याला कोणत्याही

प्रकारचा उच्च त्याग करितां येत नाहीं. पारमार्थिक ध्येयांच्या अभावीं सबल लोक दुबळ्या लोकांच्या सामर्थ्यांचा उपयोग आपल्या स्वार्थाकरितां करून घेतात. व त्यांना दैन्याच्या खोल गर्तेत ढकलून देतात व असें झालें कीं, कांहीं कालानें मानवी समाजाची शकलें उडून तीव्र कलह व तज्जन्य दुःख उत्पन्न होतें. याचें उलट ऐहिक ध्येयाकडे दुर्लक्ष झालें तर मनुष्य स्वसंरक्षणास आणि स्व पोषणास असमर्थ होतो, व त्या मुळें तो राष्ट्राच्या अभ्युदयास आणि रक्षणास निरुपयोगी ठरतो. जो मानवी समाज केवळ पारमार्थिक ध्येयाच्याच मागें लागतो. त्याच्या स्वातंत्र्याचा अपहार केवळ ऐहिक सुखाकडे लक्ष देणारा समाज करीत असतो.

ही विचारसरणी लक्षांत घेऊन आर्यांच्या धर्मात ऐहिक आणि पारमार्थिक ध्येयांना समान दर्जा दिला होता व कोणीहि केवळ ऐहिक सुखांत लोळत पडूं नये, किंवा केवळ परमार्थाच्या मागें सतत धावूं नये म्हणून गृहस्थाश्रमांत अमुक काळ घालविल्यानंतर वानप्रस्थ किंवा संन्यास प्रतिपादिलेला होता. जोपर्यंत आर्यांचा आचार याप्रमाणें होता तोपर्यंत त्यांचा सर्वत्र विजयच होता.

पुढें बुद्ध व जिन हे धर्मसंस्थापक उत्पन्न झाले व त्यांनीं सर्व देशभर आपल्या मताचा पुरस्कार करावयास सुरवात केली व देशांत हजारो मठ स्थापन झाले व सर्वत्र भिक्षु फिरूं लागले. बुद्धाची अपूर्वतता ज्ञानमूलक आचारमूलक नसून संघचालकत्व मूलक होती. त्याच्या उदयानंतर किंवा देशांत दहा दहा हजार भिक्षु राहातील असे विहार स्थापन झाले. भिक्षु झाल्यानें निर्वाणपद लवकर प्राप्त होते असा सामान्य समज झाल्यामुळें व राजे लोकांनीं जेवणाची फुकट सोय केल्यामुळें हें संघ फारच बळावले. या भिक्षूंपैकीं कांहीं अत्यंत नीतिमान् व बुद्धिमान् असत. पण बहुसंख्य वर्ग अज्ञानी व आळशी असा होता. इंद्रियदमन

करणें ही अत्यंत कठीण गोष्ट असल्यामुळें या मठांतून अनाचार, आळस व कलह यांचे बीज लवकरच रुजलें. ज्ञानाशिवाय मोठेपण मिळूं लागलें व निर्वाहाचा सोय झाली, यामुळें ज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांची वाढ खुंटली. भिक्षेवर चरितार्थ चालविणाऱ्या भिक्षूंनीं दानाची महती वर्णन करणाऱ्या पुस्तकांची व काव्यांची वृद्धि केली.

या कालीं ब्राह्मणांतही उपाध्यवर्ग उत्पन्न झाला होता. त्यानें बुद्ध धर्मास विरोध करण्याकरितां ब्रह्मा, विष्णु व महेश अशी त्रयी उत्पन्न केली व मूर्तिपूजा सुरू केली. बुद्ध भिक्षु व ब्राह्मण उपाध्यायवर्ग यांमध्यें सामान्य लोकांस आपल्या मताकडे ओढण्याची एकप्रकारची स्पर्धाच उत्पन्न झाली, व त्यांनीं सामान्य जनतेवर आपला पगडा बसविण्या- करितां भविष्य सांगणें, देणग्या मिळविण्याकरितां प्रौढी मारणें, भ्रामक समजूती पसरविणें, वैद्यकाचे ज्ञान नसतांना वैद्यकी करणें वगैरे आजचे बुवाशाहीचे प्रकार फार मोठ्या प्रमाणावर सुरू केलें.

ज्ञानाची जोपासना करणारा वर्ग प्रत्यक्ष दूर सारून कल्पनेच्या भराऱ्यानें आपलें श्रेष्ठत्व टिकविण्याच्या मागें लागल्यामुळें ज्योतिष, वैद्यक, रसायन, गणित वगैरे शास्त्रांचा अभ्यास बंद पडूं लागला व ज्ञानार्जनाला लागणारी प्रत्यक्षानुगामी पद्धति विलयास जाऊं लागली.

मलबार, सह्याद्रीची खोरी, तंजावर, बंगालचा पूर्वभाग वगैरे अनेक ठिकाणीं बुद्ध, ब्राह्मण व जिन उपाध्यांची अगदींच वन्यवृत्तीनें रहाणाऱ्या लोकांशीं गांठ पडली. त्यांच्यांत ज्ञानाची वाढच झालेली नसल्यामुळें हे लोक तेथें बडे विद्वान ठरले.

अर्येतर वंशामध्यें अनेक कलांचा उदय झालेला होता. बांधकाम धातुकाम, विणकाम, जडावाचे काम, शेती व व्यापार यांत त्यांनीं पुष्कळच प्रगति केली होती. पाश्चात्यांना त्यावेळीं धातु, रत्नें, धान्य, मसाला, कापड इत्यादिकांकरितां पूर्वेकडेच वळावें लागत असल्यामुळें त्यांना व्यापारांत फायदा होई तेव्हां अंशतः धन वैपुल्यामुळें व अंशतः मन दौर्बल्यामुळें ते ज्ञानांत भर घालूं शकले नाहींत. मदुरेच्या विद्या-पीठांत काव्य व वाङ्मय यांसच भरति येऊं लागली, व पंचपस्तितरम् ( पक्ष्यांच्या आवाजावरून शुभाशुभ पहाण्याचे शास्त्र ) असलीं पुस्तकें तयार होऊं लागलीं. अलुवारांची [ साधूंची ] संख्यामात्र एकसारखी वाढत गेली.

ज्या पराक्रमी चंद्रगुप्ताच्या राज्यांत आधुनिक राजवटींत दिसणाऱ्या बहुतेक राजकीय सुधारणा होत्या त्या चंद्रगुप्ताला भद्रबाहूनें [ जिन ] श्रमण बेळगोळा येथें बारा वर्षें तपश्चर्या करावयास लाविलें व अशोकाला उपगुप्तानें ( बुद्ध ) बुद्धक्षेत्रीं तीर्थयात्रा करावयास फिरविलें. कर्ते राज-पुरुष क्वचितच जन्मास येतात त्यांना राज्यधुरा खालीं ठेवण्यास सांगून जपतप करावयास लावणें, ह्मणजे स्वराज्य व आधिपत्य या कल्पनांवर अंगार ठेवून परकीय शत्रूस पाचारण करणें होय.

इसवीसनापूर्वीं पासून आर्यांच्या स्वराज्य व आधिपत्य या कल्पना

टीपः–(१) अनेक विजय संपादन केल्यानंतर मलिक काफूरला मक्केस जाऊन फकीर होण्याची इच्छा झाली तेव्हां त्याचें मेव्हण्यानें ' अद्याप अनेक रजपूत राजे प्रबल आहेत. त्यांना जिंकल्याशिवाय तूं संन्यस्तवृत्तीनें राहशील तर अधर्म होईल ' असें सांगून त्यास आपल्या निश्चयापासून परावृत्त केलें.

धार्मिक अपक्रांतिमुळें नष्ट होत चालल्या होत्या, धर्माबद्दल जेवढें ज्ञान तेवढीच विद्या अशी विद्येची विकृत व्याख्या बनूं लागली, ज्ञानसंपादनाची प्रत्यक्षानुगामी पद्धति बंद पडली व शाद्ब प्रामाण्याला विशेष महत्व आलें.

आर्यांचा धर्म इतरधर्मांप्रमाणें ग्रंथनिष्ठ नव्हता. त्यामुळें त्यांत ईश्वरवादी. निरीश्वरवादी व नास्तिक या सर्वांचा समावेश होत होता. आपआपलें मत सिद्ध करण्याकरितां ते भिन्नभिन्न पद्धतीनें विचार करीत व स्वतंत्र विचार पद्धतीनें शास्त्रांची वाढ होई. बुद्धोदयानंतर बुद्ध जें बोलला तें सत्य व इतर असत्य असें मानण्याची प्रथा पडली व या प्रथेप्रमाणें पुढें ब्राह्मणांनींही शद्ब प्रामाण्याला विशेष महत्व दिले. पुढें पुढें तर शंकरः उवाच, पार्वती उवाच अशी सुरवात करून अत्यंत अनिष्ट असें ग्रंथ निर्माण केलें व ते शाद्ब प्रामाण्याच्या जोरावर सामान्य लोक सत्य मानूं लागलें.

बुद्ध, जैन व ब्राह्मण हे जावा, सुमात्रा, आफ्रिका इत्यादि ठिकाणीं धर्म प्रचाराकरितां गेले पण तेथून परत आल्यावर त्यांना पृथ्वीच्या भोवती दधिसमुद्र आहे ही कल्पना नष्ट करितां आली नाहीं व जगाचा भूगोल तयार करितां आला नाहीं. महाराष्ट्रांत कांहीं काल राज्य करणारांची " चीनमधील घरांच्या भिंती काच बिलोरमय आहेत " अशी कल्पना होती.

एवंच सर्व देशभर ज्या मठादिसंस्था उत्पन्न झाल्या त्यांनीं विद्येबद्दल व स्वराज्याबद्दल अनास्था उत्पन्न केली व तीव्र जीवन कलहास अवश्य असणाऱ्या श्रमसहिष्णुता, दीर्घोद्योग व साहस इत्यादि गुणांचा अपकर्ष केला.

मध्ययुगीन कालामध्यें युरोपमध्येंही मठसंस्था प्रबल झाल्या होत्या व तेथील फुकट खाऊ धर्ममार्तंड शास्त्रज्ञाचा छळ करण्यासही उद्युक्त होत असत. परंतु युरोपच्या सुदैवानें ल्यूथरचा जय झाला व तेथील राजलोकांनीं मठांची वतनें बंद केली त्यामुळें युरोपमधील बुद्धिमालिन्य नष्ट झालें व भौतिक शास्त्रांचा उदय होऊन त्यांची वाढ झाली व त्यायोगें यूरोपचें वैभव वाढतच गेलें.

परन्तु दुर्दैवानें भारतांत तसें कांहींच घडलें नाहीं. जग हें मिथ्या आहे, जीवित दुःखमय आहे, सुखोपभोगाच्या मागें लागूं नका इत्यादि एकांगी शिकवण सर्वांच्या कानीं पडत गेली अभ्युदय आणि निःश्रेयस् प्राप्ति अशा धर्माच्या दोन बाजूंपैकीं एकीवरच जास्त भर देण्यांत आला गणित, ज्योतिष, रसायन, इत्यादि शास्त्रांची वाढ करण्याचें बंद पडून पूर्वजांनीं संपादन केलेल्या ज्ञानावरच लोक आपला कार्यभाग उरकून घेऊं लागले. त्यांनीं प्रतिपादिलेले सिद्धांत प्रत्यक्षादि प्रमाणांनीं पडताळून पहाणें जरूर आहे असें कोणासही वाटलें नाहीं.

जें मिळालें नसेल ते मिळवावें व मिळालेलें जतन करावें हें आर्यांचें ध्येय दृष्टिआड झाल्यामुळें हिंदुस्थान आपल्या पराक्रमास अपुरा पडत आहे असें वाटून कोणी हिंदुस्थानाबाहेर पडून अफगाणिस्थान तुर्कस्थान इत्यादि देश तुडवीत गेला नाहीं. मिळालेलें जतन करावें म्हणून राज्य रक्षणाकरितां कराव्या लागणाऱ्या संरक्षक योजनाही आंखल्या नाहींत.

बुद्ध व जैन संस्कृति ज्या ठिकाणीं असे तेंथें परकीय शत्रूस सहज शिरकाव मिळत असे विरोध ब्राम्हणधर्मीयांकडून होत असे. उदाहरणार्थ अलेक्झांडर आला त्यावेळीं त्यास प्रथमतः दिगंबर पंथीय

लोक भेटले त्यास त्यानें सहज पादाक्रांत केलें पण हरमाटेलिया येथें त्यास ब्राम्हणसंस्कृति नांदत असल्यामुळें निकराचें युद्ध करावें लागलें. महमदानें शिविस्थानावर स्वारी केली तेव्हां अहिंसारूपी मदिरेचें आकंठ पान केलेले बुद्धधर्मीय लोक रजपूत राजास ह्मणाले कीं, तुम्ही मुसलमानांशीं तह करा. युद्धामुळें हत्या होईल व ती आमच्यानें पहावत नाहीं. राजानें हें म्हणणें ऐकण्याचें नाकारल्यावर ते लोक राजाचा पक्ष सोडून मुसलमानास मिळाले.

" भौतिक शास्त्रांच्या अभ्यासास पारमार्थिक ज्ञानाइतकेंच महत्व देणें, त्वरेनें जाणारे घोडे व बैल यांची पैदास करणें, विद्वान् व शूर पुरुष उत्पन्न व्हावेत अशी शिक्षणाची व्यवस्था करणें, देशांत उत्तम प्रकारचीं धान्यें फळ व फुलें उत्पन्न व्हावीत अशी तजवीज करणें, ज्योतिष, गणित रसायन, वैद्यक इत्यादि शास्त्रांची वाढ करणें, विद्वान्, धनिक, आणि शूर यांमध्यें स्नेह उत्पन्न करून त्यांच्या सहकार्यानें शत्रूस जिंकणें, सुवर्ण धारण आणि संचय करणें, जें मिळालें नसेल तें मिळविणें व मिळालेलें असेल तें सांभाळणें ' या वैदिक ध्येयापासून भारतीय लोक च्युत झाल्यामुळें त्यांचे परकीय देशावर आक्रमण झालें नाहीं.

पुरुषार्थ विघातक अहिंसावादानें, परमार्थ आणि पुरुषार्थ यांच्या अनिष्ट भेसळीनें, अशुद्ध नैतिक कल्पनांच्या प्रसारानें व हीन त्यागाच्या पुरस्कारानें भरतखंड व त्यांतील आर्य सावकाश पण निश्चितपणें वैभवाच्या अत्युच्च शिखरापासून दैन्याच्या खोल गर्तेकडे इ. स. पूर्वीपासून मुसलमानांच्या आक्रमणापर्यंत जात राहिले.

इ. स. अकराव्या शतकापर्यंत मागें सांगितल्याप्रमाणे धार्मिक

अपक्रांति घडतच होती व ती मुळें भारतांतील विजिगिषा, ऐहिक सुखाची लालसा व तज्जन्य धैर्य, शौर्य, निश्चय, व एकी इत्यादि गुणांचा अपकर्षच होत होता.

मुसलमानांचे भारतावर जेव्हां आक्रमण झालें तेव्हां त्यांचा धर्म अगदीं तारुण्यावस्थेंत होता. ' लढाईंत मरण आलें तर स्वर्गप्राप्ति खास होणार; जय मिळाला तर ऐहिक सुखांचा आस्वाद लुटतां येणार ' अशी धर्माची शिकवणूक होती व धर्मश्रद्धा तीव्र असल्यामुळें ते मरेपर्यंत लढाईंत टिकून राहत असत. " हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् " ही शिकवणूक हिंदूंनांही मिळाली होती तरी धर्मश्रद्धा कमी झाल्यामुळें व धर्मतत्वांच्या आचरणापेक्षां रूढिमूलक आचारालाच जास्त महत्व आल्यामुळें सोवळ्यानें गीता पठण केल्यानें पुण्य लागतें याच हेतूनें भगवान् श्री कृष्णाचें वाक्य नेमळेपणानें हिंदु लोक घोकूं लागले होते. ऐहिक सुखोपभोग घेण्यास उत्सुक असलेले मुसलमान उत्तमोत्तम धान्य, फळें, व फुलें पिकणारे देश आपल्या ताब्यांत ठेवण्याची धडपड करीत असतांना चार घरीं भिक्षा मागून गोळा केलेले वाळलेले भाकरीचे तुकडे ओढ्याच्या कांठीं बसून चघळीत असतांना त्रिसुपर्ण म्हटल्यानें पुण्य लागतें याच हेतूनें रडवे तोंडानें ' वयंम स्याम् पतयो रयिणाम् ' असें हिंदु निःसत्वपणें बडबडत होते.

यामुळें मुसलमानी धर्माचे लोक भारतांत शिरूं लागतांच त्यांचे समोर हिंदुस्थानचे राजे पटापट हतप्रभ होऊं लागले. साम्राज्य व आधिपत्य या विषयींची इच्छा नष्ट झाल्यामुळें मलबारचा पेरुमळ राजा मक्केस जाऊन मुसलमान होऊन बसला तर मुसलमानांची युद्धाची हांक ऐकतांच बंगालचा राजा चंद्रसेन बायकामुलें टाकून मागील दरवाजानें पळन

जगन्नाथपुरींत बैरागी होऊन बसला. स्वाभिमान, व क्षात्रतेज रजपुतांतच कायतें होतें ह्मणून त्यांनीं नाना संकटें सोसून आपलें स्वातंत्र्य टिकविण्याचा प्रयत्न केला.

हिंदुस्थानांत घुसलेल्या मुसलमानांच्या हातीं एकाएकीं अचाट संपत्ति आल्यामुळें पुढें ते ही भोगी बनले. पूर्वीचें धर्माचें स्वरूप हळुंहळुं कमी होत चाललें. ऐषआराम पुष्कळच वाढला. जनानखाने वाढत गेल्यामुळें औरस आणि अनौरस राजपुत्रांची वाढ झाली, व त्यांपैकीं प्रत्येकाला आपल्या हातीं सत्ता असावी अशी इच्छा झाल्यामुळें बंडाळी फितूरी, विश्वासघात, खून व रक्तपात यांनीं त्यांचा इतिहास रंजित होऊं लागला. शहाजन, अकबर, व औरंगजेब यापैकीं एकानेंही इतर देशांच्या राज्यपद्धति अभ्यासिल्या नाहींत व शस्त्रास्त्रांत सुधारणा किंवा विद्येची वाढ केली नाहीं. विलास, पण्डित, पाद्रि, व मोलवी यांचे शुष्कवाद व परधर्म असहिष्णुता एवढ्यांतच ते रमले व पुढील कांहीं बादशहा तर प्रणयकाव्यें लिहूं लागले.

विस्तृतदृष्टिप्राप्त न झाल्यामुळें इंग्लिशादि लोक काय करीत आहेत हें त्यास समजलें नाहीं व राज्याच्या बळकटीला लागणाऱ्या सुधारणा त्यांस करितां आल्या नाहींत. मुसलमान राजे हिंदुस्थानात वाचाना आव आणीत पण परकीय शत्रूपुढें त्यांस मेंढापेक्षां जास्त शौर्य दाखवितां आलें नाहीं. एक लाख फौज व दोन हजार हत्ती घेऊन गोव्यावर जाणाऱ्या विजापूरच्या बादशहास पोर्तुगीजांनीं फक्त दोन हजार लोकांनिशीं कित्येक महिने दाद दिली नाहीं व हत्तीच्या कळपास शेपट्या हालवीत परत जाणें भाग पाडलें.

औरंगजेबाचें सैन्यही अत्यंत कमकुवत होतें. प्रो. य. सरकार म्हणतात कीं, " इराणी गोलंदाज जितके आपल्या कामांत तरबेज होते तितकेच मोगल गोलंदाज अडाणी होते. हिंदी गोलंदाजाला नेमच मारतां येत नसे. त्यांच्या गोलंदाजीचा तटबंदीवर यत्किंचितही परिणाम होईना. औरंगजेबाचे गोलंदाज इतके अडाणी होते कीं, त्यांनीं एकदां दोन मोठाल्या तोफांत खेचून दारू भरली व बत्ती दिली त्यामुळें त्यांचे तुकडे झाले. हिंदी लोक खरोखरीच इतके अडाणी होते कीं, हिंदिराजांची सर्व भिस्त यूरोपियन गोलंदाजावर असे व हे गोलंदाज आपल्या कामांत अत्यंत वाकबदार असत अशी त्याची तत्कालिन इतिहासकारांनीं मुक्त कंठानें स्तुति केलेली आहे. दिल्लिपतीला परदेशच्या वकीलांना किंवा प्रवाशांना आपला कोहिनूर हिरा, मयूर सिंहासन, किंवा संगमरवरी ताजमहाल दाखवून दिपवून टाकितां येई. परन्तु त्यांचे शत्रुशीं सामना करण्याचें बळ किती आहे याची यथार्थ कल्पना सर्व जगास येऊन चुकली होती.

दिल्लिपतीला एखादा किल्ला सुवर्ण मात्रेचा प्रयोग करून घेण्याची कारवाई करितां येईल परंतु रणक्षेत्रावर धैर्यानें दंड थोपटून एखादा किल्ला घेण्याचें सामर्थ्य त्यांत नाहीं असा जो इराणी शहांस अभिमान वाटत होता तो यथार्थ होता.

कित्येक वर्षे हिंदुस्थानच्या पश्चिमेस इराणी बागुलबोवा आं करून दिल्लिपतीस भेडसावीत होता, आणि जेव्हां एकादा शूर इराणी शहा मरण पावल्याची बातमी येई त्यावेळीं औरंगजेब आणि त्याचे प्रधान मंडळ यांना हायसें होई."

औरंगजेब कंदाहारला वेढा घालत होता त्यावेळची ही स्थिति.

ज्ञान पराङ्मुखतेमळें राज्याच्या बळकटी करितां ज्या योजना करणें जरूर होते त्या मोगल बादशहांस करितां आल्या नाहींत. इंग्रज, डच व फ्रेंच यांची शक्ति व संस्कृति त्यांस समजली नाहीं मोगल सरदारांचे व्यवहार संस्थानिष्ठ असण्याऐवजीं व्यक्तिनिष्ठ झाले. याच-वेळीं शिवाजी सारखा अत्यंत थोर पुरुष उदयास आला व त्यानें जरा जोर करतांच जुनाट बादशाही वृक्षांच्या सर्वत्र पसरलेल्या शाखा पटापट तुटून पडूं लागल्या.

मानवी बुद्धीस पूर्णपणें कुंठित करणाऱ्या प्रसंगीं थोर पुरुषाची बुद्धि चालते व येश मिळविते, अत्यंत प्रतिकूल परिस्थिति असतांनांही थोर पुरुष नवीन परिस्थिति निर्माण करतो. शिवाजी अशा थोर पुरुषांपैकीं एक होता व त्यानें अद्भुत कार्य केलें. शिवाजीची अद्भुतता आचारमूलक, विचारमूलक आणि संघचालकत्वमूलक होती. पण 'मालोजीला तुझ्यावंशांत शककर्ता होईल' असा देवानें वर दिला होता, शिवाजी हा शंकराचा अवतार होता, शिवाजीस देवी प्रसन्न होती असे अनेकांनीं लिखाण उत्पन्न केलें. कांहीं लोकांनीं भगवी-वस्त्रें धारण करणारा रामदास शिवाजीच्या मागें लावला, तर काणी संतमंडळीनीं स्वधर्माची ज्वाला महाराष्ट्रांत उत्पन्न केली होती म्हणून शिवाजीला स्वराज्याची कल्पना तडीस नेतां आली असें म्हटले आहे. वरील सर्व प्रकारची विधानें पूर्ण विचारान्ती केलेली नव्हत जो मार्ग इतरास दिसला नाहीं तो शिवाजीस दिसला. जी परिस्थिति इतरांस पालटतां आली नाहीं ती त्यानें पालटली व या कृत्यांतच त्याची अपूर्वतता आहे. महाराष्ट्रांत ज्या प्रमाणें ज्ञानेश्वरादि संत झाले त्याप्रमाणें मद्रासप्रांतीं अनेक अळुवार झाले. मग तेथें एखादा शिवाजी कां

झाला नाहीं[1] शिवाजीला जर देवी प्रसन्न असेल आणि तिच्या जोरावरच त्यानें जय मिळविले असतील तर त्याबद्दल शिवाजीस मोठेपणाही देतां येणार नाहीं पण ज्यांस थोर किंवा अलौकिक पुरुषांचे चरित्र समजत नाहीं त्यांनीं शिवाजी जवळ असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस मोठे ठरविले आहे व पर्यायानें शिवाजीची अपूर्वतता कमी केलेली आहे. डोंगरावर इकडे तिकडे लुकलुकणाऱ्या स्फटिकाच्या तेजानें ज्वालामुखीचें तेज वाढत नाहीं पण ज्वालामुखाच्या तेजानें त्यांचे तेज मात्र शतपट वाढतें. या न्यायानें शिवाजीनें आपल्या अतुल सामर्थ्यानें अनेक पुरुषानां खेचून पुढें आणिलें व त्यांचे कडून स्वराज्य स्थापविलें. शिवाजीनें जें नव चैतन्य महाराष्ट्रांत उत्पन्न केलें तें त्याच्या पश्चात् कांहीं काल टिकलें. पण हिंद-वासीयात अनादि कालापासून घुसलेल दुर्गुण, स्वार्थ, मत्सर व व्यक्तिनिष्ठा यांचा प्रादुर्भाव झाला व शिवाजीनें स्थापिलेल्या राज्यास खरोखर टिकाऊ पणाचें स्वरूपच प्राप्त झालें नाहीं व राज्य टिकाऊ कसें करावें हें कोणास कळालें कीं नाहीं याची शंकाच वाटते.

शिवाजीचें पश्चात् महाराष्ट्रांतील पेशवे, शिंदे होळकर वगैरे सरदारांनीं अतुल पराक्रम जरी केले तरी स्वराज्य कसें टिकवावें याची त्यास कल्पना आली नाहीं असें दिसतें. या विधानाच्या सत्यासत्यते-करितां पुढें दिलेल्या गोष्टींचा वाचकांनीं विचार करावा.

१] रजपुतांनां दिल्लीच्या बादशहाकडून अनेक प्रकारचा त्रास

टीपः–[१] शिवाजाबद्दल जी विधानें अनेक लेखकांनीं केली आहेत ती विचारपूर्वक केलेली नसल्यामुळें हैदरच्यापुढें शिवाजी कमी प्रतीचा भासतो.

पाहोचला होता. राणी कर्णावतीनें हजारों स्त्रियांसह केलेल्या जोहाराच्या अग्नीनें सर्व रजपुतांची अंत:करणें प्रदीप्त झाली होती. मराठ्यांशीं सख्य जोडण्यासाठीं उदेपुरकरानीं बाजीरावास पत्र पाठविलो होती. तेव्हां ब्राह्मण व मराठे सरदारांनीं रजपुतांशीं संधि केला असता तर दिल्ली विरुद्ध मराठे व रजपूत यांची भक्कम फळी तयार झाली असती कीं नाहीं ?

२] मुसलमानांनीं अनेकदां धर्म ही समान भूमिका उत्पन्न केली व तिच्या बळावर आपसांतील वैमनस्यें विसरून त्यानीं तालिकोट सारख्या लढाया जिंकल्या. शिंदे, होळकर, पेशवे, भोसले इत्यादिकांनीं हिंदूंचें काशीक्षेत्र मुसलमानांच्या ताब्यांतून परत घेण्याचा घाट घातला असता व त्याकरितां लोकांचीं मनें तयार केलों असती तर सर्व हिंदुस्थानांत प्रचंड लाट उत्पन्न झाली असती व त्या धर्मयुद्धामुळें अनेक व्यक्तिगत वैमनस्यें नष्ट झाली असती. पेशवाईच्या ऐन भरभराटींत पेशव्यांना विश्वेश्वराचें दर्शन झालें नाहीं.

३] जेरुसलेम मुसलमानांच्या ताब्यांत गेल्यावर ख्रिस्ति यात्रेकरूंचा छळ होऊं लागला. तो छळ बंद व्हावा म्हणून पीटर नांवाचा साधु सर्व राजे लोकांचे दरबारीं फिरला व त्यानें धर्मयुद्ध crusades उत्पन्न केलीं. आमचे साधू काशी ते रामेश्वर पर्यंत फिरले, त्यांनीं मूर्तींची, स्त्रियांची व क्षेत्रांची विटंबना पाहिली पण एकालाही ' धर्माचें रक्षण ' फक्त 'स्वधर्मीयांची राजवटी' करूं शकते. हठ योगाच्या बळापेक्षां मनगटाचें बळ धर्मरक्षण करूं शकतें." हें त्यांस समजलें नाहीं व म्हणून ठिकठिकाणच्या राजांकडे जाऊन त्यांना धर्मयुद्धास ते उभे करूं शकले नाहींत.

४] गोवें व वसई प्रांतीं बाटवून ख्रिस्ति केलेल्या लोकांस तेथील अनेक ब्राह्मण व प्रभु यांनीं पूर्व धर्मात प्रायश्चित्त देऊन घेतलें पण तत्कालिन कोणत्याही सरदारानें, किंवा साधूनें या ब्राह्मण व प्रभु लोकांस साह्य केलें नाहीं व धर्मरक्षण केलें नाहीं. उलट उत्तर पेशवाईत पराक्रमी व बुद्धिमान् अशा प्रभूंवर निष्कारण धार्मिक बंधनें घालून ब्राह्मण त्यांच्या सहकार्यास मुकले. आमचे साधु पवित्र व उच्च विचारांचे होते, पण त्यांचा धर्म व्यक्तिगतच होता. त्यांना धर्मरक्षण कसें करावें हें इतरांचें कार्य पाहूनही सुचलें नाहीं. आज ज्याप्रमाणें प्रेमकथा, प्रणयगीतें, काव्यगायनें, व कविसम्मेलनें यांचे बुडबुडे सर्वत्र दिसतात त्याप्रमाणें सर्वत्र भक्तिगीतें, साधुसंमेलनें, देवतास्तोत्रें व व्रतवैकल्यांची महात्में यांचीच गर्दी होत होती.

५] मराठे व ब्राह्मण सरदारांना राष्ट्राच्या बळकटी करितां "पैसा युद्धांत जय देणारे सुवर्ण उत्पन्न करितां आलें नाहीं." इंग्लिश लोक सुरत, मुंबई, वगैरे ठिकाणीं व्यापार वाढविण्याची खटपट काय करितात, कसबी लोकांना कसे उत्तेजन देतात याकडे कोणीही ढुंकून पाहिलें नाहीं. यामुळें पेशवे व पैसा यांचे सदैव वाकडे होते. शाहुराजे, बाजीराव, माधवराव व महादजी शिंदे यांना कर्जामुळें कांहीं सुचेनासे झाले अशीं अनेक पत्रें उपलब्ध आहेत कर्जाऊ रकमेवर त्यांना द. म. द. शे. २ टक्के व्याज द्यावे लागे.

1

शेती सुधारून उत्पन्न वाढविणें, व्यापार वाढविणें, कलाकौशल्यास उत्तेजन देणें याकडे पुरेसें लक्ष्य न दिल्यानें मराठे व ब्राम्हण सरदार नेहमीं अडचणींत असत. घोडा आणि स्वार मिळून दरमहा

टीपः—शेती सुधारण्याकरितां टिपनें सांप्रत जेथें शिवसमद्रमचें धरण

सरासरी ३० रु. खर्च येई. पन्नासहजार घोडदळ म्हैसोरकडे ६ महिने राहिले म्हणजे स्वारांकरितां व दारूगोळा वगैरेकरितां एकूण खर्च सुमारें दीड कोटी होई. हैदरसारखा शत्रू मराठ्यांस म्हैसोरमध्यें ८।१० महिनें रखडवून २०।२५ लाख रु. खंडणी पदरांत टाकी. खंडणी मिळाली म्हणजे सर्वजण यशोत्सव करीत,पण प्रत्येक खेपेस मराठ्यांचें बळ या क्षीण-कारक युद्धामुळें (Wars of Exhaustion) कमी होई. क्लाइव्ह-सारख्या लोभी माणसानें मिरजाफरच्या मृत्युपत्राप्रमाणें मिळालेला पैसा देशाच्या लष्करी अंमलदारांकरितां खर्च केला. डुप्ले यानें स्वतःचे २४ ते २८ लक्ष रु. आपल्या राष्ट्राकरितां खर्च केले. पण शत्रूंनीं मठ लुटून ब्राह्मणीं भ्रष्टविल्यावर शाहूकडे पळून आलेल्या ब्रह्मेंद्र स्वामींनीं आपला पैसा देशकार्याकरितां खर्च केला कां ? देशांतील अनेक धनिक देशाकरितां धन खर्चीत नसत. सर्व मुसलमानांनीं भाऊस पानपत येथें घेरल्यानंतर तो मामलत-दाराकडून परस्पर पैसा गोळा करूं लागला, त्यावेळीं पुणें दरबाराकडून भाऊस पैसा देऊं नका असे हुकूम गेले. परशुराम भाऊनीं सावशीचे लढाईचें वेळीं अत्यंत बिकट परिस्थितींत पुणें दरबारकडून मदत मागितली. शिवाजीपन्त म्हैसकर यांनीं सखारामबापू, नानाफड-णवीस, हरिपन्त फडके यांच्या घरांचे उंबरठे खेपा घालघालून झिजविले. तरी पुण्याहून[1] आणीबाणीच्या वेळीं भाऊंकडे पन्नास स्वार सुद्धां रवाना झाले नाहींत. या तिघांपैकीं दीडशहाण्यांवर भारत संरक्षण कायद्याखालीं Defence of India Act खालीं खटले भरावयास पाहिजे होते.

रयतेला " मराठ्यांचें राज्य हें आपलें राज्य आहे. मराठे आपले रक्षणकर्ते आहेत " असें वाटावे याप्रमाणें मराठे वागले नाहींत. सतत

टीपः=भाऊसाहेब पेशवे,[1] शाहूराजे, हरिपन्त फडके, महादजी शिंदे, यांची काय अवस्था होत होती तें इतिहासांत पहावें.

पैशाच्या अडचणींत असल्यामुळें स्वारीवर निघाले म्हणजे लुटालूट करीत. परकीय सत्ते खालील लोकांना मराठ्यांचें राज्य आपणावर असावे असें वाटलें कीं नाहीं याची शंकाच आहे. प्रजेला स्वप्रांतीं मराठे व ब्राह्मण सरदारांकडून संरक्षणाची खात्री नसे. उ. खालील पत्र पहा.

होळकरांचे पेंढारी कहीनें गांव लुटला. पैवें काढून नेलीं. कांहीं गांवांस आग लावली. एकगांवच्या दोन बायका नासल्या. फार अनाहूत केलें. रयतांची गुरें नेली. थाळा तांब्या सर्व लुटलें, गांवचे माणूस सांपडले म्हणजे धरून मारहाण करून पेवें काढली. परगण्यांत बाकी ठेविली नाहीं. हुकेरी प्रांतातून गणेशपन्त बेहेरे आले. त्यांनीं आणखी लुटलें. ही सरकारची फौज रखवालीस स्वार आले म्हणजे कांहीं चिंता नाहीं या विश्वासावर रयता, मुलें, माणसें, गुरें ढोरें घेऊन स्वस्थ होत्या. रानांतील वैरण व हंगामाचे दिवस खळ्यांतून दाणे-दुणे नेलें, पिकें ओलींच कापून नेलीं.

चित्रदुर्ग, होळिहुन्नर, शिमोगा इत्यादि जिल्ह्यांत लुटण्याचा व जाळण्याचा परशुरामभाऊनें असा कहर केला कीं, त्यांतून ५० वर्षेपर्यंत त्या प्रांतानें वर डोकें काढलें नाहीं.

लहान लहान सरदारांना व पाळेगारांना मराठे व ब्राह्मण सरदार आपत्कालीं आपल्या संरक्षणार्थ धांवून येतील व शत्रूला शासन करतील अशी खात्री वाटत नसे म्हणून ते निश्चितपणें मराठ्यांच्या बाजूस रहात नसत. नरगुंदकर भावे यांच्या स्त्रियांवर घोर प्रसंग आले, मुरारराव गुत्तीकर अडचणींत आले त्यावेळीं त्यांच्या शत्रूंचें पारिपत्य मराठ्यांनीं

काय केलें ?

विद्येच्या कामांत तर मेहेंदळे, विंचूरकर, पेशवे तसेच शिंदे, होळकर, भोसले इत्यादि सरदार फारच मागें राहिले. ' अथ शिक्षां प्रवक्ष्यामि ' या पलिकडे कोणाचें ज्ञान गेलें नाहीं. पर्वतीच्या रमण्यांत अथवा अन्यत्र उत्तम बंदुका करणारास किंवा उत्तम वस्तरा करणारास कांहीं मिळालें नाहीं. " **शस्त्र विद्येच्या रक्षणाशिवाय संस्कृति किंवा वेद रक्षण होत नसतें,** " हें ब्राम्हण व मराठे यांस समजलें नाहीं. पद्मपुराणाची पोथी शोधीत पेशव्यांचे घोडेस्वार धावले तसे एखादा रसायन शास्त्राचा ग्रंथ शोधण्यास धावले कां ! नारायणरावास पञ्चलिंग दर्शन शिकविण्यास शिक्षक नेमला होता तसा जगाचा भूगोल शिकविण्यास कोणी नेमला होता का ?

शस्त्र तयार करणारे, तोफांचे गोलंदाज, सैन्याबरोबर जाणारे वैद्य वगैरे सर्व परकी.

"साम्राज्य पाहिजे असेल तर शस्त्र पाहिजे, शस्त्र पाहिजे असेल तर शास्त्र पाहिजे, शास्त्र पाहिजे असेल तर शांतता पाहिजे." हें मराठे व ब्राम्हण यांस समजलें नाहीं. मराठे व ब्राम्हण यांना शांतता राखतां आली नाहीं शास्त्र वाढवितां आलें नाहीं व शस्त्रें तयार करितां व सुधारतां आलीं नाहींत म्हणून त्यांचे राज्य गेलें. इंग्लिशांच्या शूरपणामुळें किंवा भेद-नीतीनें गेलें नाहीं. मुसलमानांना किंवा इंग्रजांना निष्कारण दोष देऊं नये. हिंदू नेभळे राहिले म्हणून मुसलमानांनीं अत्याचार केले, हिंदू भोळे राहिले म्हणून इंग्रजांचे कपट किंवा भेदनीति यश पावली.

मराठे व पेशवे यांना सतत लढाया कराव्या लागल्या म्हणून त्यांना विद्येची वाढ किंवा शस्त्र सुधारणा करितां आली नाहीं असें अनेकजण म्हणतात तें खरें नाहीं. राज्यस्थापन करण्याची कल्पना आल्याबरोबर हैदरनें स्वतःचा युद्धसाहित्याचा कारखाना सुरू केला. 'रणांगणाची निवड कशी करावी, व्यूह कसे रचावेत, माघार घेतांना काय करावें तोफांची व पायदळाची मांडणी कशी करावी, इत्यादि गोष्टींचा उहापोह करणारें युद्धशास्त्रावरील पुस्तक स्वतः टिपूनें लिहिलें. आरमारांतील गलबतांची प्रतवारी ठरवून, तोफा कशा व किती बसवाव्यात याचा तपशील त्यानेंच लिहिला. त्याच्या पुस्तकालयांत, खगोल, अर्थशास्त्र, गणित, रसायन, युद्धकला वगैरे विषयावरील अनेक पुस्तकें सांपडली. पुस्तकांवरून त्याची ज्ञाननिष्ठा व अभिरुचि व्यक्त होते. हैदर व टिपू यांना एक दिवसही तरवार खालीं ठेवतां आली नाहीं असें असतांना त्यांनीं जी ज्ञाननिष्ठा दाखविली तत्सदृश ब्राह्मण किंवा मराठे यांकीं कोणी दाखविली ? हैदर व टिपू यांना ज्या गोष्टी करितां आल्या त्या ब्राम्हण व मराठे सरदारांना कां करितां आल्या नाहींत ?

'सुवर्ण धारण आणि संचय करणें' याकरितां कराव्या लागणाऱ्या उद्योगांत इंग्लिश राजवटींतही मराठे आणि ब्राह्मण मागेंच राहिले मुंबईसारख्या शहरांकडे पाहिल तर शेअर, सोनें, चांदी, कपाशी लोखंड, कातडी इत्यादिकांचे बाजार, गिरण्या, आयात व निर्गत वगैरे धनोत्पादक धंद्यांत ब्राम्हण किंवा मराठे विरळाच. पेशवाई बुडाल्याबरोबर तरवारीऐवजीं नांगराचा फाळ हातीं घेऊन मराठे पशुपाळ बनले तर भाल्याऐवजीं टांक हातांत घेऊन सेवावृत्तींत ब्राह्मण घुसले व सेवावृत्तीमुळें अल्पदृष्टि, मत्सर व लांगूलचालन इत्यादि दुर्गुणांचे भायदायी झाले.

विद्वान् , शूर व धनिक यांचे सहकार्य घडवून आणणें, अग्नि, वायु, पृथ्वी, इत्यादिकांचा अभ्यास करणें, उत्तमोत्तम धान्य, फळें, व फुलें उत्पन्न करणें, दुधाळ गाई व वेगवान् घोडे यांची पैदास वाढविणें, प्रजा शूर, धाडशी व ज्ञाननिष्ठ उत्पन्न होईल असा प्रयत्न करणें, सुवर्ण धारण आणि संचय करणें, जें मिळविलें असेल तें सांभाळणें, मिळालें नसेल तें मिळविण्याचा प्रयत्न करणें, हें वैदिक ध्येय पाश्चात्य लोकच अक्षरशः पाळीत आहेत आणि त्यामुळेंच आज त्यांचें साम्राज्य ठिकठिकाणीं आहे. पाश्चात्यांनीं वैदिक शिकवणुकींतील एक भाग उत्तम प्रकारें पाळला पण दुसऱ्या भागाकडे ह्मणजे 'त्यागा'कडे दुर्लक्ष्य केलें यामुळें कित्येक मानवीसमाज आज दुःखाच्या खोल गर्तेंत ढकललें गेले आहेत.

क्र. ८५९०

# -- दुरुस्ती पत्र --

| पेज नं | चुकीचे शब्द | बरोबर शब्द |
|---|---|---|
| १३९ | धाढसी | धाडसी |
| १४० | देनचार | दोनचार |
| ,, | केवल | केवळ |
| १४२ | राष्टाचे | राष्ट्राचे |
| ,, | घार्णी | वाणी |
| ,, | राष्टाचे | राष्ट्राचे |
| १४३ | दवा | देवी |
| १४४ | त्योगे | त्या योगे |
| ,, | आवश | आवेश |
| १४५ | किंवा | नको |
| १४६ | उपाध्य | उपाध्याय |
| १४८ | शद्ब | श्राद्ध |
| १५१ | वयंम | वयम् |
| ,, | पळन | पळून |
| १५२ | जनानखान | जनानखाने |
| ,, | मेंढा | मेंढी |
| १५३ | औरंगजेब | औरंगजेबाने |
| ,, | हाईना | होईना |
| ,, | खचून | खेचून |
| ,, | त्याची | त्यांची |
| ,, | धैर्यान | धैर्याने |

| पेज नं. | चुकीचे शब्द | बरोबर शब्द |
|---|---|---|
| १५४ | येश | यश |
| ,, | काणी | कोणी |
| ,, | नव्हत | नव्हते |
| ,, | सत | संत |
| ,, | झाल | झाले |
| १५५ | मिळावले | मिळविले |
| ,, | माठपणाही | मोठेपणाही |
| ,, | स्फाटकांच्या | स्फोटकांच्या |
| ,, | शिंद | शिंदे |
| ,, | शिवाजाबद्दल | शिवाजीबद्दल |
| १५६ | हाता | होता |
| १५७ | अले | आले |
| ,, | हेतो | होते |
| १६० | इत्याद | इत्यादि |
| ,, | ग्रजांचे | इंग्रजांचें |
| १६१ | नाहा | नाहीं |

REFBK-0008560